विषवृक्ष

*

आनंदी विजापुरे

उत्कर्ष प्रकाशन,
पुणे, ४

प्रकाशक,

श्री सु. वा जोशी

८८५ शिवाजीनगर,
भाडारकर रस्ता,
पुणे ४.

प्रकाशन क्रमाक ९.

अनत चतुर्दशी दिनाक ७ सप्टेंबर १९७६
मुखपृष्ठ – जोशी आर्ट.

मूल्य १२ रुपये

वि ना भंडारे

मुद्रक – स्वानद मुद्रणालय.
२०३ शनवार पेठ, पुणे ३०.

ती. दादा आणि सौ. सुधावहिनी परचुरे यांना,

छोटेसे भावपुष्प भेट

आनंदी विजापुरे.

प्रकरण पहिले

दुपारचं ऊन रणरणत होतं खोलीचं कुलूप काढत अमतानाच शेजारचे लालाजी एकदम दत्त म्हणून उभे राहिले. आणि म्हणाले, 'क्यों राजेश भय्या, आज ऑफिसमधून इतके जलदी वापस आले, काही खास प्रोग्रॅम ?'

प्रकृती बरी नाही असं सांगायचं त्याच्या मनात होतं पण तो तसं सांगू शकला नाही. कारण त्यावर होणाऱ्या प्रश्नोत्तरांची त्याला भीती वाटत होती.

'काय रे बाबा तोंड सुकलेलं दिसतंय ताप आलाय की काय ? फ्लूची साथ सगळीकडे चालू आहे म्हणून म्हणतो, चांगल्या डॉक्टरला दाखवून औषध घ्या. हयगय नको. तगडी जवान पोरं तुम्ही ! पण स्टॅमिना कसला तो तुम्हाला नाही. अरे भाई, तुमच्या वयाला आम्ही दहा माणसाला भारी होतो म्हटलं. काय ?'

वाक्य बोलून झालं की शेवटी 'काय' हे प्रश्नांकित वाक्य लालाजी उच्चारीत. पण ते त्यांच्या मात्र कधीच लक्षात येत नसे. थोड्या वेळाने परत लालाजी म्हणाले. मंजूची माँ घरी आहे. जा बेटा भूक लागली असेल तर खाना खावो. मंजू अद्याप स्कूलमधून आली नाही, तर खाना घेऊनच आली असती. अरे ओ मंजू की माँ राजूभय्याला खाना खिलाव. दुकानात

जायची वेळ झाली. मी आता जातो. असं म्हणून लालाजी चालू लागले. आणि काही तरी आठवल्यासारखे करून पुन्हा वर आले आणि म्हणाले, ' किती दिवस खानावळीचे अन्न खात रहाणार? यंदा लाडू पाहिजेच. वेळच्या वेळी दोनाचे चार हात झालेले बरे. चार दोन पोरं लवकर झाली की ती आपल्या लवकर बरोबरीला येतात.'

हे सर्व ऐकायचं त्याच्या थकलेल्या शरीराला अन् मनाला टाळायचे होते. तो एरव्ही लालाजीशी खूप गप्पा मारी लालाजीना तो कधीही दुखवत नसे आणि आजही लालाजीना दुखविण्याचं त्याच्या मनात मुळीच नव्हतं. म्हणून उसनं हसू आणत तो म्हणाला,

' आज माझा डे ऑफ आहे.'

' आज? आज तर शुक्रवार!' डोक्यावरचे पागोटे नीट बसवीत लालाजी म्हणाले.

ज्या गोष्टीला राजेश भीत होता तोच प्रश्न नेमका लालाजींनी विचारला होता. तो उसने हसू चेहऱ्यावर आणत म्हणाला,

' माझ्या मित्रासाठी माझी सुट्टी चेज करून घेतली.'

आणि पुढला प्रश्न येण्याच्या आधीच दार उघडून चटकन खोलीत आला. तेथे उभा राहिला असता तर शेटजीनी अर्धातास आणखी सहज घेतला असता कितीतरी चौकश्या केल्या असत्या. त्या दोघांची कधीतरी आठ–पधरा दिवसानी गाठ पडत असे आणि मग गप्पांना सुमारच राहात नसे. घरापासून राजकारण सर्व विषय हाताळले जात. इतर वेळी दोघेही आपल्या कामात गुंतलेले असत.

राजेशची चाळीतली पाचव्या मजल्यावरची खोली एका बाजूला होती. मोकळी हवा, भरपूर उजेड, पश्चिमेच्या बाजूला मोठी खिडकी. त्याच्या खोलीचा उजेड आणि वारा अडविला जाईल अशी इमारत बांधली जाण्याची शक्यता नव्हती. कारण खालून रेल्वे लाईन गेलेली होती. गाड्यांची सारखी येजा असल्यामुळे आवाज मात्र होत असे माणूस संवयीचा गुलाम बनतो. तसच राजच झाल होत गेल्या चार पांच वर्षांत या आवाजाची त्याला चांगली सवय झाली होती. त्याच्याकडे येणारा प्रत्येकजण त्याला पहिला प्रश्न विचारीत असे.

'या आवाजाचा त्रास होत नाही तुम्हाला ?'

तेव्हा राज हसून म्हणे,

'छे बुवा ! अहो, आता मला तर या आवाजाची इतकी सवय झालेय की, हा आवाज नसेल तर चैनच पडत नाही. चुकल्याचुकल्यासारखं वाटतं.'

वेळ जाण्यासाठी तो तासन् तास खिडकीत क्षितिजापलीकडे जाणाऱ्या सूर्यनारायणाकडे पहात विचार करीत उभा राही.

डोक्यावर पदर घेऊन खालच्या मानेने कंबरेवर घागर किंवा मूल घेऊन जात असलेली गंगू दिसली की, त्याचा जीव कासावीस होई. आणि त्याला आठवे–

एके दिवशी संध्याकाळी गंगू त्याच्या दारात येऊन रडत उभी राहिली होती. लहानगा मुलगा तापानं फणफणत होता. नवरा दारू पिऊन दुसऱ्या बाईच्या खोलीत पडला होता. 'राजूदादा, माझ्या बाळाला वाचवा' असे ती म्हणत आशेने त्याच्याकडे आली होती. तिची करुण परिस्थिती पाहून त्यानं लगेच मुलाला डॉक्टरकडे नेऊन औषध दिलं होतं. तिला वर खर्चाला काही पैसेही दिले होते. गंगूचं मूल सुधारलं होतं. गंगूच्या सांगण्यावरून त्यानं तिच्या नवऱ्याला खूप समजावून सांगितले होते. पण त्याचा बाई अन् बाटलीचा नाद सुटला नव्हता. शेवटी पैसे मिळविण्याचा मार्ग म्हणून त्यानं खटपट करून गंगूला नोकरी लावून दिली होती. त्यामुळे चार पैसे घरी येऊन तिच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला होता. राजचे उपकार ती विसरू शकत नव्हती! समोरून जाताना राजला पाहिले की गंगू आदराने नमस्कार करीत असे.

आज गंगूनी राजला पाहून दोन वेळा हात जोडले तरी त्याचं लक्ष नव्हतं. ती मनाशी म्हणाली, 'आज राजूदादाचं काहीतरी बिघडलेलं दिसताय.'

खोलीची परिस्थिती तर फारच भयंकर होती. जिकडे तिकडे अस्ताव्यस्त सामान पडलेले, पुस्तकं वेडीवाकडी धूळ खात पडलेली, वर्तमानपत्राची रद्दी साठलेली. त्यावर धुळीचा थर साचला होता. एका टेबलावर ॲश ट्रे होता. पण त्या ॲश ट्रेमध्ये जळकी सिगरेटची थोटकं किंवा राख झाड-

ण्याचे श्रम घेतलेले दिसत नव्हते. साऱ्या टेबलभर राख, अ‍ॅश ट्रे रिकामाच होता आणि सिगरेटची थोटकं पडलेली होती. जणू काही संपूर्ण खोलीच अ‍ॅश ट्रे बनली होती ! सिगरेट्स तरी सपूर्ण ओढलेल्या म्हणाव्यात तर तेही नाही. काही अर्ध्या, काही अर्ध्यापेक्षा सुद्धा जास्त तर काही निमित्त मात्र ओढून तशाच फेकलेल्या ! कोपऱ्या कोपऱ्यात जळमटांचे पुंजके साठलेले होते. कोळीष्टकं आणि झुरळांचं तर ते घर म्हणजे वसतिस्थानच झालं होत ! जागोजागी लेड्या पडलेल्या दिसत होत्या. सोफा-सेट क्षयी माणसासारखा अस्थिपंजर झाला होता. आतल्या स्प्रिंगा मधूनमधून फासळ्या-प्रमाणे डोकं वर काढत होत्या. जागोजागी फाटलेले कापड मधूनमधून काथ्या आणि मळकट कापसाचे पुंजके दिसत होते. कापडाचा रंग इतका वेगळा झाला होता की मूळ रग सागणे कठीण झालं होतं. आजूबाजूच्या फळ्या निसटल्या होत्या. रिकाम्या व्हिस्कीच्या बाटल्या, सोडयाच्या बाटल्या आजूबाजूला पडल्या होत्या. ती खोली नित्य वापर करूनही ३ । ४ महिन्यात झाडलेली नव्हती असे वाटत होते. कोपऱ्यातील पलंगावर लोळत पडलेल्या राजेशला या गोष्टीची दखलही नव्हती.

दार उघडून ता खोलीत आला तांब्याभर पाणी आणि ग्लास घेऊन तो बाहेर आला नळाच पाणी इतक गरम होत की थोडी आच दिली असती तरी चहा झाला असता. बाहेरच्या खोलीत येताच ग्लास, पाण्याचा लोटा टेबलावर ठेवला आणि कपाट उघडून आतली व्हिस्कीची बाटली काढली. बाटलीत तीन चार पेग शिल्लक होते सोफ्यावर बसून एक पेगभर व्हिस्की ग्लासमध्ये घेतली. ग्लासात थोडं पाणी ओतलं, एक दीर्घ श्वास सोडून निराशेनं स्वत:शीच हसला. भराभर दोन मोठे घोट घेतले, सिगरेट पेटवून एक दीर्घ झुरका घेतला पुन्हा ग्लास भरला. आणि सोफ्यावर मान टाकून समोरच्या टेबलावर पाय पसरले. डोळे मिटलेल्या स्थितीत त्याने ग्लास ओठाला लावला. एक–दोन घोट घेऊन मिटलेल्या डोळ्यांनीच ग्लास अंदा-जाने टेबलावर ठेवला. जळती सिगरेट तशीच त्याच्या हातात होती. डोळे मिटूनच त्याने सिगारेट जवळ केली. आणि भराभर झुरके ओढू लागला. इतक्यात खोलीत कोणीतरी आल्याची त्याला जाणीव झाली. परंतु डोळे उघडून येणाऱ्या व्यक्तीला पहाव, आणि काही बोलावं असं त्याला वाटलं

नाही. येणारी व्यक्तीसुद्धा आवाज न करता, पाऊल हळूच टाकत आत आली. कोण आलं असेल याचा अंदाज राजेशला आला. लालाजींची मंजू आली होती. पंधरा–सोळा वर्षांची मंजू राजच्या खोलीत कधीही येत असे; गप्पा मारीत असे, एखादं पुस्तक वाचायला नेई, गणिताचा प्रॉब्लेम अडला की राजला विचारायला त्याच्याकडे केव्हाही जाण्याचं स्वातंत्र्य तिला होतं. लालाजींचा आणि माताजींचा राजवर विश्वास होता. चाळीतल्या प्रत्येकाशी त्याचं वागणं मानवी स्वभाव धर्माला अनुसरूनच होतं. त्यामुळे त्याच्यावर सर्वांचा विश्वास होता. चाळीतील प्रत्येक लहान-थोरांचा तो आवडता होता.

'राजूभय्या' मंजूने जवळ येत हाक मारली. आणि हातातली जळकी सिगरेट काढून फेकत म्हणाली,

'तुला काही शुद्ध आहे का? बोटं भाजली असती म्हणजे?'

'हं!' म्हणून डोळे न उघडताच त्यानं केवढा तरी एक मोठा सुस्कारा सोडला. त्याला म्हणायचं होतं 'बोटंच काय संपूर्ण पोळून निघालोय, नुसत्या बोटांचचं काय घेऊन बसलीस' पण विचार झटकून टाकत त्याने कूस बदलली आणि पुन्हा किलकिले केलेले डोळे मिटले.

'राजूभाई, अशा भलत्यावेळी झोपतोयस कसला? रात्री तुला जागरण झालयं का? कोणता नाटक सिनेमा पाहिलास? आणि दिवसाढवळ्या तू व्हिस्की पितोस? तुझी अवस्था काय झालीय ती जरा डोळे उघडून आरशात पहा. आणि खोलीची कायरे ही दशा? खोलीची सफाई किती दिवसांत झाली नाही?'

तरीही–

राजेश एक शब्दही बोलला नाही. पुन्हा परत तीच बोलू लागली,

'किती तरी दिवसांनी आज दरवाजा उघडा दिसला. मी अभ्यास करीत बसले होते. माँ म्हणाली, 'राजूभय्या आलेला दिसतोय. मी हातातलं पुस्तक तसंच टाकलं आणि पळत आले. तर तू हा असा झोपलायस!' तो नुसता हुंकार देत होता. आणि मंजूची बडबड चालूच होती.

'राजूभय्या भांडीवाली किती दिवसांत आली नाही? खोलीची झाडलोट साफसफाईपण केली नाही.'

शेवटी तिच्या प्रश्नाला डोळे मिटूनच उत्तर देत राजू म्हणाला,

'अग, गेले पंधरा दिवस माझी दिवसपाळी होती ती मोलकरीण बिचारी येऊन परत जात असेल.'

'अरे ते मला माहीत आहे. तू भल्या पहाटे जात होतास ते! पण किल्ली माझ्याजवळ दिली असतीस तर मी नसती का खोली झाडून घेतली असती?'

मंजूने खोलीकडे न्याहाळून पहात पण विषय बदलत म्हटले,

'राजूभय्या, तू माझी नवी साडी पाहिलीस?'

'नाही!'

'अरे डोळे उघडून पहा तर खरी '

'ओहो, खूप सुंदर' असे म्हणत मोठ्या कष्टाने डोळे उघडले.

मंजूचा गोरा रंग, सरळ नाक, काळेभोर जाडसर केस, थोडेसे निळसर डोळे, जाडसर पण कमानदार भुवया! तिला तो साडीचा निळा रंग खुलून दिसता तर नवल नाही. पंजाबी ड्रेस, बेल बॉटम असे निरनिराळे पोशाख ती करी. त्यापेक्षा तिला साडीच जास्त चांगली दिसत होती.

'कशी दिसते माझी साडी? तुला आवडली?' असं म्हणून डोक्यावर पदर घेऊन त्याच्यासमोर ती उभी राहिली.

'खूप सुंदर! खूपच सुंदर!!' अस म्हणत त्याने परत कूस बदलली.

'राजूभय्या, काय झालंय तरी काय तुला? आज तुझं लक्षण ठीक दिसत नाही. तुला बरं वाटत नाही का? सांग ना? काय झालाय तुला? चहा करून आणू?'

त्याला वाटलं सांगावं मंजूला की मी फार वाईट मनःस्थितीत आहे. काही दिवसापूर्वी आमच लग्न ठरल होत, आणा शपथा झाल्या होत्या, लग्नाची खरेदी पण झाली होती, पण परवा तो नाटकाला गेला होता, पहातो तो समोरच्या रांकेत एक तरुण आणि भारती बसलेली. त्याला आश्चर्य वाटलं आणि गेले पंधरा दिवस बाहेरगावी गेलेली भारती परत कधी आली, अन् आपणाला भेटली कशी नाही की फोनही केला नाही. आणि हा तरुण कोण? असेल मावस नाही तर चुलत भाऊ.

दुसरा अंक संपताच ती दोघे चहा प्यायला बाहेर गेली. थोडया वेळाने राज तिला सरप्राईज देण्यासाठी बाहेर गेला. त्याला पहाताच ती चटकन पुढे आली आणि म्हणाली 'हॅलो राजेश, हे माझे मिस्टर डॉ. अनीलदत्त. कलकत्त्याला असतात. स्वत:चं नर्सिंग होम आहे आमचं औपचारिक वरवर हसू आणत नमस्ते म्हणत त्यानं हात जोडले.

तो धक्का अजूनही ओसरला नव्हता. आपल्या प्रेमाचा खेळ असा निर्दयपणी तिने उधळून का दिला असावा? हा प्रश्न त्याला बेचैन करीत होता पण हे तो मंजूला कसं सांगणार होता? तो आपलं दु:ख तिला सांगू शकत नव्हता. तो म्हणाला, 'माझी तब्येत ठीक आहे ग. जागरणांनी मी थकलोय. झोपावंसं वाटतंय.'

'राजूभय्या, तू डोळे मिटून झोप. मी तुला छानसं नवीन गाणं म्हणून दाखवते हं, शोरमधलं आहे. किती छान आहे म्हणून सांगू? आणि ती गाणं म्हणू लागली—एक प्यार का नग्मा है मौजो की रवानी है, जिंदगी और कुछ भी तेरी मेरी कहानी है,' एरवी ते गाणं राजला आवडले असते. परंतु प्यार का नग्मा मौजोकी रवानी सारं जळून गेले होते.

मंजूचा आवाज खूप छान गोड होता. गाण्याची नक्कल ती अगदी बरोबर करीत होती. समजदार पद्धतीने शब्दांचा ढंगदार उच्चार ती करीत होती. तिचं आताचं गाणं त्याला आवडलं होतच पण शिवाय—तिचं गाणं त्याला नेहमीच आवडे. अभ्यासात तिला मदत हवी असली की तो म्हणे आधी माझी फी कबूल कर, बिदागी घेतल्याशिवाय आपण कोणाचंही काम फुकट करणार नाही. असे म्हणत तो तिला गाणं म्हणायला लावीत असे आणि आज ती आपण होऊन गाणं म्हणतेय तर त्याला ते नको होत. आज त्याला एकांत प्रिय होता आज त्याला एकटं राहायच होतं. पुनः पुन्हा तो मनाशी म्हणे, 'भारतीने मला का धोका दिला? भारतीने मला का फसवलं?

'मंजू!'

'काय राजूभय्या बोल ना?'

'घरी जाऊन माताजीकडून मला खायला घेऊन ये. भूक फार लागलीय!'

मंजू खूष होत म्हणाली, ' आत्ता येते. पण तू खाल्ल्याशिवाय झोपू नकोस हं ' आणि मंजू निघून गेली.

दहा–पंधरा मिनिटातच बटाटेवडे व चिवडा–लाडू एका बशीमध्ये घेऊन तोंडानी ' तेरी मेरी जिंदगी ' हे गाण गुणगुणत आली. पहाते तो व्हिस्कीचा ग्लास टेबलावर भरलेला तसाच होता. आणि सोफ्यावर रेलून पडल्या स्थितीत राज पुन्हा गाढ झोपी गेला होता. दोन–तीन मिनिटं मंजूने त्याच्याकडे पाहिले. भरून आणलेली प्लेट झाकून ठेवली. आणि हलक्या पावलाने निराशेने दार ओढून घेऊन परतली.

जवळजवळ तासाभरानं त्यानं कूस बदलली. जडावलेले डोळे उघडले जात नव्हते. थकलेल्या शरीराने आळोखे पिळोखे दिले. मोठ्या कष्टानी त्यानं डोळं उघडले आणि खोलीचे निरीक्षण केलं. खोलीत दिव्याचा प्रकाश होता. आणि खुर्चीवर नरेश मासिकाची पान मागेपुढे करत बसला होता.

' कोण ? नरेश, तू कधी आलास ?' राजनी आश्चर्यचकित होत विचारलं.

' अॅट अबाउट सीक्स थर्टी. आणि आता आठ वाजलेत महाशय.' आपल्या मनगटावरच्या चकचकीत नवीन स्मगल्ड घड्याळात पहात म्हणाला.

' अरे बापरे ! इतका वेळ झोपलो होतो. आता मात्र कमालच झाली.' उठून बसत राज म्हणाला.

' अरे मी खालच्या खालीच परत निघालो होतो. कारण तुझ्या खोलीत काळोख दिसला. पण पुन्हा विचार केला तुला चिठ्ठी लिहून ठेवून जावं. पानवाल्याच्या गादीजवळ उभा राहून चिठी लिहिली वर आलो. चिठ्ठी कडीत अडकविणार तोच दार उघडलं गेलं. मला धक्काच बसला. वाटलं कोणी चोरांनी तुझी खोली साफ केली की काय ! म्हणून भीतभीतच दिवा लावला तर भिंतीकडे तोंड करून तू डाराडूर घोरत पडलेला दृष्टीस पडलास. व्हिस्कीचा भरलेला ग्लास टेबलावर तसाच पडलाय आणि शिवाय तिच्या सोबत ही बटाटेवड्याची भरलेली प्लेट !'

' माझ्या घरात चोराला काय मिळणार ? पुस्तक, रद्दी आणि रिकाम्या बाटल्या. बरं झालं असतं नेलं असतं तर, तेवढीच खोली साफ झाली असती.' राज हसत म्हणाला पण त्या हसण्यात निराशा डोकावत होती.

' अरे बाबा, आता माझ्याने रहावत नाही हे वडे, लाडू पाहून तोंडाला पाणी सुटलंय.'

' वडे अन् लाडू ?' चटकन राजेश उठून बसत म्हणाला, ' बिचारी मंजू भोळी पोरगी मला भूक लागली म्हणून खायला घेऊन आली असेल आणि मी झोपलेला पाहून निराशेने परत गेली असेल.' असं म्हणत त्यानं सिगरेट पेटवली.

' तू मागवलं नव्हतंस हे ?'

' हो मागवलं होतं मी ! मी साडेतीनलाच घरी आलो. काही सुचत नव्हतं. कशात मूड लागत नव्हता. थकवा तर विलक्षण वाटत होता. विचार केला एखादा पेग मारावा. त्यामुळे बरं वाटेल. म्हणून ग्लास तयार केला. एक दोन घोट घेतलेही ! तेवढ्यात लालाजींनी नवी आणलेली साडी मंजू नेसून आली होती; मला दाखवायला ! खुषीत होती. एकसारखी बडबडत होती. पण बोलण्याच्या मूडमध्ये मीच नव्हतो. तिला जा म्हणवेना. तिला टाळण्यासाठी मी म्हटलं, ' मला भूक लागली आहे काही तरी खायला आण' तेव्हा ती मोठ्या खुषीने खायला आणायला गेली आणि जेव्हा ती घेऊन आली असेल तेव्हा मी झोपलो असेन.'

' तू चार वाजल्यापासून झोपलास की काय ?'

' असं वाटतं ! '

' तुला भेटायला मी तुझ्या ऑफिसमध्ये गेलो होतो. तेथे समजलं तू आज दांडी मारलीस. ऑफिसला आला नाहीस. मग मी गिरगावातल्या फेवरीट कॉफी हाऊसमध्ये गेलो. म्हटलं चुकला पीर मशिदीत नक्कीच भेटेल. पण तेथेही तुझी भेट झाली नाही. दोनवेळा खोलीवर चक्कर मारली.'

' अरे बाबा गेले पंधरा दिवस मॉर्निंग ड्यूटी होती. आणि माझा मूड पण गेलाय ! '

' हूं ! अरे यार हम सब जानते हैं, मंजू तुझ्या मनात ठाण मांडून बसली आहे हो ना ?'

' नॉनसेन्स ! तुला दुसरं काही दिसतच नाही. नाही, असलं काही नाही. मंजू इज व्हेरी स्वीट गर्ल. जस्ट लाईक माय स्मॉल सिस्टर !' उदासपणाने सुस्कारा सोडत राजेश म्हणाला.

'तू काय वाटेल ते म्हण राज. ही मुलगी रेखीव, सुंदर नसेल पण भलतीच स्मार्ट आहे. बोलकी आहे. घरची चांगली. एकुलती एक पोरगी आयला पैसा तिच्या बापाचा भरपूर आहे. गटव पोरीला, तुला काय कमी. त्यातून त्या लालाजीचा भारी जीव आहे तुझ्याबर आणि बुढ्ढी माताजी तुझ्यावर जीव पाखडतेय नुसती. बेटा बेटा करतेय. ती पोरगी तर जेव्हा पाहावं तेव्हा ढीग-भर वह्या अन् पुस्तकं निमित्ताला घेऊन तुझ्या खोलीत ! देव देतं अन् कर्म नेतं म्हणतात ते असं ! मी असतो तर कधीच त्रिफळा उडवला असता. लालाजीची पोरगी प्रथम गटवली असती आणि मग लालाजीला लावल्या असत्या नाकदुऱ्या काढायला. आणि भरपूर वसुली करून कबूल झालो असतो लग्नाला ! पण आयला माझ्याकडे ती कधी डोळा वर करून पहात देखील नाही. इतकंच काय मी इकडे आलो की फिरकत सुद्धा नाही. तुझ्याकडे, आणि आलेली असली तर पुस्तक गोळा करून झटकन विजेसारखी निघून जाते. ते काही नाही भय्या मला वाटतं हे सर्व वरवरच आहे. प्रथम भाऊ म्हणून शिरकाव करायचा आणि मग प्रियकर म्हणून गळयात पडायचं ही अलीकडच्या पोरीची डिप्लोमसी आहे.'

'बराच अनुभव घेतलेला दिसतोस तू नरेश' आणि तो तुच्छतापूर्वक हसला. नरेशची जात तो ओळखून होता तेंवीस चोवीस वर्षांचा उल्लू, चंगी-भंगी, उथळ स्वभावाचा हा मुलगा शिक्षणाच्या दृष्टीने कॉलेजचा लाँग लाईफ मेंबर मुलींच्या घोळक्याजवळ घोटाळणारा, खर्डेघाशी करून अडीचतीनशे रुपड्या मिळविणाऱ्याच्या बाता मात्र हजारो रुपये मिळवीत असल्याच्या ! कपड्यात तर नरेश भलतेच छान–छोकीचे आणि भडक कपडे वापरीत असे. मानेपर्यंत केस ते सुद्धा न विंचरलेले. तोंडात आधुनिक शब्द साला, च्यायला, आयला. प्रत्येक शब्दाबरोबर उपपदाप्रमाणे हे शब्द असत. सिगरेट एकसारखी धुनी पेटवल्याप्रमाणे रूप देखणं, सरळ नाक, टप्पोरे डोळे, बोलण्याची आकर्षक ढब जणू जीभेवर सरस्वतीच खेळती आहे. कोणतीही मुलगी थोड्या सहवासातच अगदी फसली जात असे. घटकाभर करमणुकीला तो ठीक होता. राजचा तो मित्र होता. राजला त्याचे वागणे आवडत नव्हते, तरीही तो त्याच्याशी संबंध ठेवून होता, पण राजेश त्याच्या खाजगी आयुष्याबद्दल कधीच बोलत नसे.

राज नरेशच्या अगदी उलट ! तिशीच्या जवळपासच आलेला. स्वत. नानाविध प्रयत्न करून, अनेक संकटांना तोंड देत देत, बी. ए. पर्यंत शिकला. गंभीर, मितभाषी, शिष्टाचार, सभ्यता आणि प्रामाणिकपणा हेच जीवनाचं भांडवल व तत्त्व समजणारा. त्याचे बोलके डोळे, त्याच्या स्वभावाचं प्रतीक होते. त्याच्याशी दोनचार वेळा संभाषण झालं की त्याच्या सखोल विचारांचे दर्शन होई. तो एक गाढा विद्वान आहे याची खात्री होई. साहित्याची आवड. पुस्तकं हे त्याचे सोबती. कितीतरी नियतकालिकांतून, मासिकांतून त्याचे परखड विचारांचे लेख येत. प्रसिद्धीची हाव तर मुळीच नव्हती. आकर्षक व्यक्तिमत्त्व, बुद्धीचं तेज त्याच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाला उठाव आणीत असे. कधीकधी त्याला आश्चर्य वाटे की वयानी लहान, उच्छृंखल अशा ह्या नरेशची व आपली ओळख कशी झ ली, व ती आपण कशी वाढवली आणि तो इतक्याजवळ आला कसा ! आणि मग त्याला तो प्रसंग आठवत असे.

तो दिवस ! तो दिवस फारचे वेगळा होता—

लोकलमधून जाता-येता त्याची मधूनमधून भेट होई. बोलण्याचा प्रसंग कधीच आला नव्हता. त्यादिवशी व्ही. टी. स्टेशनवर टी. सी. आणि नरेशची काहीतरी बातचीत चालू होती आणि ते ऐकायला पाचदहा बघेही जमले होते. राज घाईगर्दीने पास दाखवून पुढे जात असता नरेश दृष्टीला पडला, नुसते स्मित करून तो पुढे गेला. इतक्यात मिस्टर अहो मिस्टर, म्हणून त्याने राजला हाक मारली आणि टी. सी. ला म्हणाला, 'याना विचारा रोज आम्ही बहुतेक एकाच ट्रेनला भेटतो.' आणि राजेशला उद्देशून नंतर म्हणाला, 'माझा पास गेलाय, कोणीतरी पैशाचं पाकीट मारलं हे मी जीव तोडून सांगतोय तरी हे साहेब पैसे भरल्याशिवाय सोडत नाही. पैसे आणू कुठून ? फक्त दोन रुपयाची नोट वरच्या खिशात ठेवली होती म्हणून ती तेवढी शिल्लक राहिली.

राजेशनी पाकिटातून पैसे काढून नरेशला दिले. नरेशनी त्याच्या घरचा अन् ऑफिसचा पत्ता घेतला. पुनः पुन्हा आभार मानले. आणि पैसे परत देण्याच्या निमित्ताने तो त्याच्या घरी आला. त्या वेळी नरेश म्हणाला,

'पास मी कधीच काढला नव्हता. आयला पैशाचं पाकीट मारलं ही

थाप दिली. आयला आज तुम्ही भेटला नसतात तर आमचे बारा वाजले असते.' ते त्याचं बोलणं ऐकून राजला वाईट वाटलं. त्यानं असं फसवावं याचं त्याला दु:ख झालं. असल्या बेछूट वागण्याबद्दल त्यानं त्याची कानउघाडणी केली. पुढे देखील परिचय वाढल्यानतर तो वरचेवर त्याला उपदेश करीत असे. पण काही माणसाची जातच वेगळी असते. बेछूट, बेदरकार वागणंच ते जास्त पसंत करतात, त्यातच भूषण मानतात, कोणी कितीही सांगितलं तरी त्याचा उपयोग होत नाही, तो एक प्रकारचा कैफच असतो. पालथ्या घडयावर मात्र पाणी !

आणि आता देखील मंजूचा विचार नरेशला सोडवेना, त्यानं विचारलं 'मग काय लालाजीचा जावई होणार ना ?'

'काही म्हण राज, आजकाल मंजू मोठी आकर्षक दिसते होय की नाही ?'

या विषयावर बोलण्याचे राजेश टाळीत होता. फक्त तो म्हणाला, 'मी त्यांच्याकडे माझे शेजारी या दृष्टीने पहातो.'

'तू पहात असशील रे. मंजूची पण हीच समजूत आहे ?'

राजला त्याचे हे बोलणे आवडले नाही. तरी आपली नापसंती प्रगट न करता तो गप्प बसला.

'राजूभय्या, काही जखमा व्यवस्थित मलमलपट्टी केली की कालांतराने बुजल्या जातात.'

त्याच्या बोलण्याने राजेशला खूप वाईट वाटले. जखमेवरची खपली पुन्हा चिघळली. तो आतल्या आत अधिक दु खी झाला. आपले दु:ख उघड न करता !

'जीवनात असे कितीतरी प्रसग येतात अन् जातात यापासून कितीतरी गोष्टी आपण शिकायला पाहिजेत दूर पळून जाण्याचा प्रयत्न केला तरी पळू शकत नाही. अरे, सकट आपल्या मागे पळत येणारच. मला एकच माहीत आहे, राजूभय्या, विष उतरविण्याचा इलाज विष पिऊनच केला पाहिजे.'

'नरेश, तुझं बोलणं मी समजलो नाही.' राज काहीशा रागाने पण साशंक मनाने म्हणाला.

'राजूभय्या, एका मुलीने तुला धोका दिला. याचा परिणाम म्हणून तू सर्व स्त्री जातीची नफरत करतोस हे काही योग्य नव्हे. प्रत्येक स्त्रीचा तू तिरस्कार करतोस हे ठीक नाही. एकीनी केलेली जखम दुसरी भरून काढू शकते असं नाही तुला वाटत ?'

राज चटकन उठून बसला. तो काही बोलणार पण त्यानं जिभेवरचे शब्द आतल्या आत परतवले. तो मनातल्या मनात म्हणाला, माझ्या आयुष्या-बद्दलचा विचार करण्याचा अधिकार या नरेशला कोणी दिला आहे. स्वतःही मी कधी विचार करीत नाही. माझ्या आयुष्यात एक मुलगी आली होती. तिने मला धोका दिला. सर्व स्त्रीजात वाईट आहे असं मी कधी म्हणत नाही आणि मी कोणा स्त्रीचा कधी तिरस्कारही केला नाही. माझ्या तोंडून असले अनुद्‌गार कधीच बाहेर आलेले नाहीत. परंतु काही माणसांची जातच असतें, दुसऱ्याच्या आयुष्यात शिरकाव करण्याच त्यात त्यांना कितपत समाधान मिळते कुणास ठाऊक !

'बस कर हा विषय. उगाच तर्कवितर्क करत बसतोस. असल्या चर्चेला माझ्या दृष्टीने मुळीच महत्त्व नाही. कोणत्याही मुलीसाठी मी तडफडत नाही. तू नवजवान आहेस. तुझ्याजवळ भावनांचे भांडार आहे. तू खुशाल या गोष्टीचा विचार करत बस ' राज म्हणाला.

'बरं बाबा ठीक आहें. अरे पण दिवा तर लावशील ? अंधारात किती वेळ तू बसणार आहेस व मला बसविणार आहेस ? आणि हा तुझा भरलेला ग्लास टेबलावर पाहून मला तहान लागली आहे. तू रिकामा करतोस की मीच तो रिकामा करू ?'

'का कोण जाणे दिवा लावावासाच वाटत नाही. ही बाटली घे आणि सुरुवात कर. '

'बाटली मी स्वतः आणली आहे ' आणि कोटाच्या खिशातून त्याने व्हिस्कीची बाटली काढली. ग्लास शोधू लागला. जवळच ग्लास मिळाला. ग्लास मिळताच बाटली उघडून एक पेग ओतून पाणी ओतले. आणि चिअर्स म्हणत ग्लास तोंडाला लावत म्हणाला,

'आयला पाणी पण मुतासारखं कोंबट '

'तुला पाहिजे असल्यास कोपऱ्यावरच्या इराण्याकडून अर्धा डझन सोड्याच्या बाटल्या आणि बर्फ घेऊन ये. मला सोडा आणि बर्फाची मुळीच गरज नाही.'

राजेश आता थोडासा ताळ्यावर आला होता. नरेशनी खाली जाऊन सोडा मागवला. आणि लाईट लावला. भराभर दोन घोट घेत म्हणाला,

'केव्हाची तहान लागली होती.'

'कोणाची? व्हिस्कीची की मैत्रिणीची? कारण गोकुळातल्या गौळणी असतात, सारख्या अवती भवती. म्हणून म्हटलं आज कुणीही नाही कसं? नरेश, आज तू एकटा कसा? मैत्रिणींबरोबर भांडलास की काय?'

'राज, खरं सांगू? मगाचपासून विचार करतोय तुला सांगावं की नाही? माझं खरं स्वरूप कळल्यावर सर्व माझा आजवर तिरस्कार करीत आले. पण मी कसाही असलो तरी तू माझा कधीच तिरस्कार केला नाहीस. म्हणून तुला सांगतोय. राज, माझी एक मैत्रीण आहे. तिचं नाव गीता!'

'वा! फारच सुंदर नाव आहे.'

'अरे यार नुसतं नावच सुंदर!'

'का ती मुलगी सुंदर नाही?'

'मला असं म्हणायचं नाही. ती एका गरीब घरची मुलगी आहे. सुंदर आहे. गव्हाळी रंग, लांब सडक केस, अपरं नाक तरीही रेखीव आणि अप्रतीम बोलके डोळे. तशी ती झकास आहे रे पण ...'

त्याचं अर्धवट वाक्य सोडतच राज म्हणाला,

'मग तू असा उदास का? तिचं लग्न झालंय का? आणखी काय भानगड? तिने तुला नकार दिलाय का?'

'नकार? आणि मला? आयला पोरीकडून मी नकार घेणार? या जन्मात तरी शक्य नाही. लग्न कर म्हणून जीव खातेय माझा ती!'

'मग अडलाय कुठे घोडं? सुंदर आहे. ती लग्नाला तयार आहे. मग अडचण कसली? दे बार उडवून!'

'सुंदर! तारुण्यात गाढवीचं पोरही सालं खुबसुरत दिसतं, मग वयात आलेली मुलगी न दिसली तरच नवल! तो प्रश्न नाही रे, माझ्यापुढे प्रॉब्लेम फारच वेगळा आहे.'

'तिचं कुलशील तुला पसंत नाही ?' राजनी सिगरेट पेटवीत विचारलं.

'जात तर अगदी हलकी आहेच माझ्या दृष्टीने त्यालाही महत्त्व नाही.'

'मग अडलय कुठे ?'

'घरची गरिबी फार आहे. जावयाचं कोडकौतुक तर राहोच पण गीताशी लग्न केलं की म्हातारा–म्हातारीची धोंड आणि चार पोरी गळ्यात पडतील. कारण ती त्यांची एकुलती एक मिळवती पोर! म्हातारपणची त्यांचा आधार ती आहे. साले चार पैसे मिळण्याचीही आशा नाही तिच्याकडून !' पाच पाठोपाठच्या लहान बहिणी नसतं लचांड.

'अरे पण तू गीतावर प्रेम करतोस, ती तुझ्यावर प्रेम करते. या दोन्ही गोष्टी तुमच्या वैवाहिक जीवनाला पुरेशा नाहीत का? तिला ॠ गरिबी ह्या कारणासाठी नकार देणार ?'

'एक दीर्घ उसासा सोडत नरेश म्हणाला,

'गीता जास्त हुशार आणि तेज आहे. माझ्यासारखा कारकुनाला भारी जड आहे.'

'याचा विचार आधी करायचा. अरे वयच तसं आहे. प्रत्येक मुलामुलीचं रक्त सळसळत असतं. मागचा पुढचा विचार नसतो. आणि यांचचं नाव तारुण्य ! स्त्री–पुरुषांचं आकर्षण ही एक और बात आहे. ना वयाचा विचार ना परिस्थितीचा. अरे बाबा, मोठे मोठे तपस्वी हरलेत. तिथं तुझी–माझी काय कथा ? 'ती रहाते कोठे ?' राजनं विचारले.

'माझ्याच शेजारी.'

'शिकते की नोकरी करते ?'

'सीनिअर बी. ए. करते आणि शिवाय पार्ट टाईम नोकरी करतेय.'

'अरे बापरे ! तुझ्यापेक्षा अधिक शिकलेय की ! बाकी तू तर कॉलेजचा लॉंग लाईफ मेंबरच आहेस म्हणा. तसा विचार केलास तर तुझी आजची परिस्थिती पहा. एक साधा कारकून म्हणून तू तीनशेच्या आसपास मिळवतोस. डिग्री घेऊन कधी बाहेर पडशील तर ते अगदी शक्य नाही. घरचं काही नाही म्हणतोस. अशा परिस्थितीत एक हुशार देखणी मुलगी तुझ्यावर प्रेम करते. उद्या तो ग्रॅज्युएट होईल. तिला कुठेही चांगल्या पगाराची

नोकरी मिळेल. तुमचं घर थाटलं जाईल मी तर म्हणतो तिला स्पष्ट सांगावीस तुझी परिस्थिती. त्यानंतर जर ती लग्नाला तयार असेल तर मी म्हणेन केवळ तुझं भाग्य !'

'अरे बाबा, मी तिला सारं समजावलं तर ती साली म्हणते मला पैशाशी लग्न करायचं नसून नरेश या व्यक्तीला मी माझं प्रेम दिलंय. त्याच्या सुख-दु:खाची, चांगल्या–वाईट परिस्थितीची मी वाटेकरी आहे. लव्हमॅरेज आपले आहे. मुळीच खर्च करायचा नाही. फक्त रजिस्टर लग्न करायचं म्हणजे खर्च येणार नाही. प्रथम आपण घर थाटू आणि मग सर्वांना देऊ मस्त पार्टी.'

'चांगली सुविचारी आणि तुझ्यावर मनापासून प्रेम करणारी दिसतेय.'

'अरे यार, माहीत आहेत या पोरीचे सुविचार मला ! एकदा का लग्न लागलं की ब्याद मागे लागली. मग फर्मान सोडेल हे आणा न ते आणा. रोज नव्या आर्डेरी, रोज नव्या कटकटी. आणि अरे यार कुणा पोरीकडे चुकूनही डोळा वर करून पहायची सोय नाही. आणि तिथंच तर आमचं घोडं अडेल ! इनका वेळ कुठे गेलो होतो याचा जाब द्यावा लागेल. एकदा का शृंखला पायात अडकली की हुकमाचं दार उघडेच राहील नेहमी ! पहिला जमाना राहिला नाही आता ! आठदहा मुलं झाली, अर्धा संसार झाला तरी स्त्री नवऱ्याच्या डोळ्याला डोळा देत नसे. मग हुकूम करणे तर सोडाच. अरे राज प्रेमाविवाह काही निराळा आहे काय रे ? याचा अर्थ आजकाल माझ्या दृष्टीने तरी मुलांबरोबर बरोबरीने फाजील वागणूक ठेवणे, फाजील खर्च करणे, भलत्या आकांक्षा आणि अपेक्षा बाळगणे हाच दिसतोय. ते काही नाही. आपणाला तूर्त लग्न करावयाचं नाही. सध्या माझं वय मजा करण्याचं आहे रोज नव्या पोरीची संगत मिळते. मी त्यांच्यासाठी दिडकी खर्च करत नाही पोरीच खर्च करतात. कधी सिनेमा तर कधी बाहेर जेवण इतकंच काय त्यांच्याकडून वाटेल ते मिळंत. राजू-भय्या, तुला सांगितलं तर आश्चर्य वाटेल एखादी बिअरची बाटली. एखादा सिनेमा एखाद्या हॉटेलात थोडया पैशात झकास पोरगी झोपायला मिळते तुला ठाऊक आहे ? मजा करायचे हेच दिवस आहेत. मग आहेच बायको एके बायको म्हणून मी आत्तापासून पायात बेडी अडकवून घेणार नाही.

जेव्हा लग्न करीन तेव्हा खूप पैसे घेऊन येणारी पोरगी पसंत करीन. मग ती रंगारूपानं कशी का असेना !'

'वा ! फार छान आहेत लग्नाबद्दलचे तुझे विचार. तुझ्या लहरीप्रमाणे तू मुलींना खेळवणार. त्यांच्या पैशांवर मजा मारणारे' राज गंभीर होऊन त्याच्याकडे रागाने पहात म्हणाला.

'नाही रे बाबा, लग्नापर्यंत मजल येईल तेव्हा बघू. परमेश्वरालाच माहीत माझं लग्न होणार की नाही ते. या गोष्टी नशिबाच्या आहेत. माझ्या मनात ढीग असेल.'

'मग गीताशी मैत्री का करतोस ? तिला का भेटतोस ? तिला फसवतोस का ?'

'मी तिला फसविणार नाही. पण समाजाविरुद्ध जाऊ शकत नाही. राज, उद्या कोणाचं मन बदलेल सांगता येत नाही. तिचे आई-बाप सुद्धा नकार देऊ शकतील. तुझंच पहा, तू दिलाचा सच्चा, नेहमी प्रामाणिक रहाणारा, धीर गंभीर, नीच प्रकारच्या गोष्टी तुला माहीत नाहीत, पैशाच्या अपेक्षा नाहीत. इतका सद्वर्तनी, चांगल–वाईट ओळखणारा मग असं असताना ज्या मुलीवर तू प्रेम केलंस तिने तुला फसवले ना ? त्या वेळी जाणकार नव्हतास का ? त्या वेळी तुझं शहाणपण, तुझी सचोटी, तुझे सारे गुण कुचकामी ठरले ना ?'

'तुला कोणी सांगितलं माझ्या आयुष्यात एक मुलगी आली होती ? माझा प्रेमभंग झालाय म्हणून ?' राजने उसने हास्य तोंडावर आणत विचारलं.

'मी चुकीचं बोललो का ? पैज लावतोस ? लाव माझ्या डोळयाला डोळा आणि सांग हे सर्व खोटं आहे म्हणून !' नरेश नीट उठून बसत म्हणाला.

'मी ही गोष्ट स्वीकारू शकत नाही. मला काही कळतही नाही.'

'ठीक आहे. मग एक क्षण माझं बोलणं खोटं आहे असे समजतो. मग सांग, तू लग्न का करीत नाहीस.'

राजेश ह्या त्याच्या प्रश्नांवर काहीच बोलत नाही.

'आज या गोष्टीचा सोक्षमोक्ष मला करायचा आहे. कधी गोष्ट काढली की उडवाउडवीची उत्तरे करतोस. आज तुला तसं करता येणार नाही. मी सत्याग्रह करीन. उपोषण करीन. अस्मादिकांचे आमरण उपवास!' असं म्हणून एक बटाटावडा एकदम तोंडात कोंबला. आणि व्हिस्कीचे भराभर घोट घेऊन ग्लास रिकामा केला.

राज हसत म्हणाला,

'हाच का आमरण तुझा उपवास? आता ऐक, अरे मी लग्न न करण्याचे कारण मुख्य माझी आर्थिक परिस्थिती. दुसरं कारण माझी नोकरी. कधी रात्रपाळी तर कधी दिवसपाळी. आणि तिसरं कारण मला हवी तशी मुलगीच मिळत नाही. आणि चौथे.

'त्याचं अर्धवट वाक्य तोडत नरेश म्हणाला,

'बस! बस!! तुझी कारणं मी समजू शकतो. या अडचणी तुझ्या तू निर्माण केल्या आहेस. अरे तुला चांगली नोकरी आहे. हा छोटासा फ्लॅट आहे!'

'मग तुला काय म्हणायचंय?'

'लग्न झाल्यावर संसार कोठे थाटावा असा प्रश्न तुला नाही. नवरा बायको, एखाद–दुसरं मूल या फ्लॅटमध्ये आनंदाने रहातील. खरच राज, तुझी जागा किती सुंदर आहे, चाळीतल्या इतरांच्या खोल्या बघ. एकेका खोलीत दोनतीन जोडपी, पाच-सहा मुलं आणि तीन चुली कशी रहातात कोण जाणे! त्यांना प्रायव्हसी तरी कशी मिळते कोण जाणे! परंतु पोरांच्या सख्येवरून वाटतं की त्यांना वैवाहिक सुख भरपूर मिळत असावं.'

'बरीच माहिती दिसते तुला चाळीतल्या लोकांची.

'अरे निवडणुकीच्या वेळी मतांची मागणी करायला खोल्या खोल्यांतून हिंडलोय मी.'

'वा! हा उद्योग केव्हांपासून करायला लागलास?'

'फुकट नाही केल. आमचा माणूस आला की खूप पैसे मिळणार होते. त्यानं कबूल केलं होतं. पण साला चांगला हापटला. पैसे कसले नी कसलं काय? आठ-पंधरा दिवस खाल्लो-प्यायलो मात्र भरपूर. पण ते जाऊ दे

मुख्य विषय बाजूला राहिलाच. मी म्हणतो तुझा पगार चांगला आहे; निरनिराळ्या पेपरमधून तू नेहमी लिहितोस, रेडिओवर काही ना काही तुझा कार्यक्रम असतोच ती मिळकत शिवाय आहेच. यावरून कल्पना येते तुम्हा दोघांचा संसार उत्तम चालेल.'

'हूं ! एखादी अशिक्षित मुलगी निभावेल येवढ्या पैशात.'

'तुझ्याशी वाद घालण्यात काहीच अर्थ नाही. राजूभैय्या, तू का करत नाहीस तुझं एका मुलीवर प्रेम होतं, तिने तुला फसवलं, ती जखम इतकी खोल झाली आहे की त्यामुळे पुन्हा लग्न करण्याची तुला इच्छाच होत नाही.' नरेशनी त्याचा पिच्छाच पुरवला.

एक दीर्घ श्वास घेऊन राज म्हणाला 'माझी अन् तुझी ओळख काही महिन्यापासूनची ! माझ्याबाबत तुला फार थोडं माहीत आहे. मी सोळा वर्षांचा होतो. नुकताच मॅट्रिक चांगल्या मार्कांनी पास झालो. कॉलेजमध्ये नांव घातलं त्या वेळी माझ्या आईचा आनंद काय सांगू ? डोळ्यात तेल घालून जपायची मला. न जेवता माझी वाट पहात दाराकडे टक लावून बघत बसे. केवढी तिची अपार माया. पण मी दुर्दैवी ! एकाएकी सारा संसार टाकून ती निघून गेली. आमच्या शेजारी एक विधवा मास्तरीण रहात होती. आई गेल्यावर ती मधूनमधून घरी यायची. खायला करून घालायची. माझ्याशी फारच प्रेमाने वागायची. मी बहुतेक, माझा वेळ कॉलेजच्या व वाचनालयाच्या ठिकाणी घालवीत असे. तिचं बाबांच्या बरोबरचं वागणं मला खटकलं. पण मी बोलणार कसा ? एके दिवशी बाबांनी मला सांगितलं की काही जरुरीच्या कामासाठी परगांवी जाणार आहे. घरी लक्ष ठेव. आणि ते निघून गेले, दोन दिवसांनंतर संध्याकाळी मी आणि माझी मित्र-मंडळी आमच्या घरी जमलो होतो. चहा फराळाचे जिन्नस बाहेरून आणले होते. तोच दारासमोर एक टॅक्सी उभी राहिली. बाबा आले या आनंदात मी पुढे झालो. आणि काय सांगू नरेश माझी जीभ टाळ्यालाच चिकटली, घसा कोरडा झाला, घेरी येऊन पडतोय असं वाटलं म्हणून भिंतीचा आधार घेतला. बाबा लग्न करून त्या विधवा मास्तरणीला सधवा करून घेऊन घरी आले होते. तिच्या अंगावर माझ्या आईचे दागिने होते. माझ्या आईची भरजरी पैठणी, नाकात नथ होती. मला सहन झालं

नाही. बाबा म्हणाले, 'राजू ही तुझी आई. हिच्या पाया पड.' मी तसाच माझ्या आईच्या फोटोकडे धावलो. तिला नमस्कार केला. पोटभर रडलो. माझ्या मित्रांनी मला त्या दिवशी हॉस्टेलवर नेलं. माझी आई जाऊन सहा महिने झाले नाहीत तोच बाबांनी आईच्या जागी दुसरी बाई आणावी. माझ्या आईशी वीस वर्ष केलेला संसार ते इतक्या लवकर विसरले. माझ्याशी विश्वासघात केला. मला त्यांनी केवढा मोठा धक्का दिला होता.

मी घरी जाऊ लागलो. कारणपरत्वे बोलू लागलो. पण त्या बाईने अखेर आपली वाघनखं बाहेर काढली. घरात ती सत्तेनं आली. सत्तेन येताच तिनं माझ्याशी उभा दावा मांडला. तिच्या छळानं, बोलण्यानं मी वैतागलो. बाबा तर तिच्या हातातलं बाहुलं बनले होते. तिला खूष करण्यासाठी तिचं ऐकून तेही मला बोलू लागले. मग त्या घरात रहायचं कोणासाठी ? कोणाच्या आधारावर ? आणि एक दिवस रागानेच मी घरातला एक पैसा न घेता नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडलो. स्त्री जातीबद्दल त्या दिवसापासून मला तिरस्कार वाटू लागला स्त्री म्हटलं की मी घाबरतो. चार हात लांब पळतो. आज तू मला हैराण केलेस ?' राजने सिगरेट पेटवून एक मोठा दीर्घ श्वास घेतला. आणि राज परत बोलण्याच्या रंगात आला.

'आणि काय बरं म्हणत होतो मी. सतरा वर्षांचा असताना मी घर सोडलेला. शिक्षण अपुरं, कोणाचा आधार नाही, सहारा नाही, आता तूच अंदाज कर मी काय हालअपेष्टा काढल्या असतील त्या ! मला घर सोडून एक तप झालं. माझे आईबाप जिवंत आहेत की नाही, सावत्र भावंडं किती, त्यांची परिस्थिती काय, काही मला माहीत नाही. आमची खूप श्रीमंती नव्हती. रहातं चांगलं घर, शेती सुव्यवस्थित होती. माझ्या वडिलांना शाळेत पगारही चांगला होता त्या घराची आज काय अवस्था असेल देव जाणे ! मला त्या इस्टेटीचा लोभ नाही. घर सोडल्यानंतर मी पंधरा रुपयांची नोकरी केली. मिळेल ते काम केलं आणि माझं शिक्षण पुरं केलं. रात्रंदिवस केलेल्या परिश्रमाच फळ आज मी माझ्या कर्तृत्वावर मिळवले आहे. व सर्वसाधारण पैसा मिळवतोय.

या एवढ्या मोठ्या जगात माझं असं स्वतःचं कोणी नाही. ना मित्र, ना सगेसोयरे, तुझ्यासारखे मित्र आयुष्यात वर्ष, दोन वर्ष येतात आणि

जातातही ! माझा बँक बॅलन्स दोन–अडीचशेहून अधिक नाही. जो पैसा मिळतो तो कॉफी हाऊस आणि ही बाटली, रोजचा खर्च आणि कपडे यात खर्च होतो. हा फ्लॅट, हे मोडकं फर्निचर चार–दोन भांडी ही माझी संपत्ती. आता तूच सांग ? लग्न करायचं म्हटलं तर ते सुद्धा अगदी गरीब मुली-बरोबर. दोन–चार तोळे सोनं. चार–दोन साड्या हे करणं मला शक्य आहे काय ? शिवाय ती मुलगी समजूतदार असेलच असं कशावरून ? अरे बाबा, दोन मनांचा मिलाप झाला तरच सहजीवन शक्य होतं. दोघांनीही समजूत-दारपणा दाखवावा लागतो. मिळतं जुळतं घ्यावं लागतं. राजनी आपले विचार सांगितले.

'तुझा असा कोणी मित्र नाही का ? लग्नासाठी दोन–तीन हजार उसने देईल !'

'तू देतोस का ?'

'मी कोठून देणार ?'

'माझ्या मित्र मंडळींची अशी आहे परिस्थिती. शिवाय लग्न कशासाठी करायचं ? सुख, शांती, समाधान यासाठी की ते नष्ट करण्यासाठी ? आणि ऋण काढून सण करण्याच्या मी विरुद्ध आहे. कर्ज काढून लग्न केल्यावर माझ्या बायकोच्या मागे कर्जाची काळजी लावू ? ती समजूतदार संयमी असेल तर ठीक नाहीतर आज एकटा जीव सदाशिव, मजेत खानावळीत जेवतो. कॉफी हाऊसमध्ये विश्रांती घेतो. वाटेल तेव्हा बाटली, सिगरेट या दोघींना विसाव्याला जवळ घेतो. डोक्याला त्रास नाही. पाठीमागे जबाबदारी नाही, रुसणं–फुगणं नाही, माझ्यावर कसलंही बंधन नाही. सांग माझ्या इतका कुणी आहे सुखी ? मग मी कशाला त्रास लावून घेऊ हा माझ्यामागे ?'

'राज, मला आश्चर्य वाटतं ते हे की इतकी वर्षं नोकरी करतोस, लिहि-तोस. दोनतीन हजार पण शिलकीत नाहीत ?'

'दोन-तीन हजार सहज होते. दहा तोळे सोनं घेतलं, दोनतीन दागिने केले, पाचसहा साडया घेतल्या आणि कधी नव्हे तो हौसेने मला स्वतःला एक सूट सुद्धा केला. पण…….' आणि व्हिस्कीचा घोट घेऊन सोफ्यावर मान टाकून राज एकदम् गप्प झाला. त्याला म्हणायचं होतं नको ती आठ-वण !

'पण काय ? बोल ना ?'

'काही नाही.' एक दीर्घ सिगरेटचा श्वास घेऊन राजेश गप्प बसला.

'इथपर्यंत गोष्ट आली की पडदा पडतो. मला माहीत आहे हे रहस्य तू बोलणार नाहीस तुझे उदास हास्य, मधूनमधून शून्याकडे लागणारी तुझी नजर हे तुझ्या यातनांचं प्रतीक मला कळून चुकलाय.'

नरेश वयानी, अनुभवानी लहान असला तरी हुशार होता, चाणाक्ष ! त्यानं आज राजेशचा पिच्छाच पुरवला होता.

'दागिने, साडया केलेस तर मग ते कशासाठी ? आणि त्याचं केलंस काय ?'

'अरे आमच्या सोसायटीत नाटयसंस्था स्थापन झालीय. काहीतरी हात-भार लावायचा म्हणून संस्थेला साडया देऊन टाकल्या दागिने मोडून टाकले आणि पैसे कधीच संपले.'

'गृहस्था, दुकानदाराला साडया परत का नाही देऊन पैसे घेतलेस ?'

'खरंच की माझ्या हे लक्षातच आलं नाही. राज म्हणाला त्याच्या मनात आलं पण उघडपणे नरेंद्रला तो एवढंच म्हणाला. जी गोष्ट जीवनात प्राप्त होत नाही तिचं नाटय रूपांतर स्टेजवर व्हावं. यासाठीच नाटक-सिनेमांचे प्रयोग दाखविले जातात पण आपल्या जीवनातला चॉर्म संपला, मनात उभारलेला किल्ला ढासळला आता ना खंत, ना खेद ! तसे पैसे आहेत ठेवलेले ! शेवटच्या यात्रेसाठी..

'अरे यार सोड ही भाषा आता तर तुझ्या जीवनाची यात्रा सुरू होत आहे एखादं वळण चुकलं म्हणून कुणी माघार घेत नाही. कुणास ठाऊक पुढच्या वळणावर तुला कुणी भेटेल आणि तुझा सारा मार्ग उजळून निघेल..

❃ ❃ ❃

प्रकरण दुसरे

आळसावलेली रविवारची सकाळ. दहा वाजण्याच्या सुमारास कॉफी हाऊसमध्ये खूप गर्दी जमली होती. रविवार आणि सुटीच्या दिवशी कॉफी हाऊस भरलेलं असे. लेखक–प्रकाशक आणि मित्रपरिवार टेबलापाशी चार· सहा लोकांचा ग्रुप बसलेला असे. वादविवाद, गप्पा, चर्चा यांनी सारं कॉफी हाऊस दणाणून जाई. खाण्याकडे फारसं कुणाचं लक्ष नसे. कॉफीचे कप किती रिकामे झाले हे बिल आल्यावर लक्षात येई. प्रकाशक–लेखकांचा कॉफी हाऊसमध्ये अड्डाच असे. धूम्रवलयांनी साऱ्या कॉफी हाऊसमध्ये क्षणभर धुकं पसरल्याचा भास होई. राजीवची फेरीही कधी चुकत नसे. जणू कॉफी हाऊस त्याचं एकमेव विश्रांतिस्थानच होतं !

बऱ्याच वेळापूर्वी राजीवनी घरी जाण्याचा विचार केला होता पण थोडी चुळबुळ करून पुन्हा कॉफीची ऑर्डर देऊन सिगरेट ओढत खुर्चीत तसाच बसून होता. तसं पाहिलं तर घरी त्याची वाट पहाणारं होतं कोण ? खोलीच्या भिंती, दारं, खिडक्या ती रिकामी खोली जणू त्याला खायला उठे. काहीतरी चाळा म्हणून त्यानं खिशात हात घातला तो त्याला पैसे असल्याची जाणीव झाली. महाराष्ट्र टाइम्समध्ये बुवाबाजी या विषयावर त्यानं लेख

लिहिला होता.त्याची बिदागी त्याला मिळाली होती. त्यानं विचार केला. व्हिस्कीची बाटली खरेदी करावी. तिची चव घेऊन आठवडा झाला होता.

इतक्यात नरेश त्याला शोधत कॉफी हाऊसमध्ये आला. राजला पहाताच कोपरापासून हात जोडून नरेश म्हणाला,

'चुकला पीर मशिदीत ?'

'ये बैस. कॉफी बरोबर खायला मागवू ?'

'नो खाना. ओनली पीना. कप ऑफ कॉफी इन फॉर मी. काय विचार आहे राजबाबू ! खोलीवर जायचं की आणखी काही निराळा बेत आहे तुझा ?'

चल म्हणत राजनी बिल भागवले ओळखीच्या लोकानी वुश केलं आणि नरेशबरोबर कॉफी हाऊसबाहेर पडला.

जानेवारी महिन्यातले दिवस. सकाळचे दहा वाजले तरी थंडीचा स्पर्श सुखद वाटत होता. स्वेटर सारखा करून गळ्याभोवतालची पोलो कॉलर नीट केली.

'यावर्षी थडी अगदी मस्त पडली आहे नाही ? मनात येत अशीच बारा महिने मुंबईची हवा राहील तर काय मजा होईल ?' नरेशनी राजकडे पाहात म्हटल.

'मुंग्याच्या थव्याप्रमाणे माणस वाढतील. बेसुमार लोकवस्ती, जावं तिथ माणसच माणस.'

'मी मुद्धा याच विचारत होतो. हे पहा आज अस्मादिकाचा खिसा जड आहे. आणि गरमही आहे. पुरी अख्खी बाटली आणलीय. आणि तुला शोधत आलो. आज जिवाची मुंबई करायची. प्रथम स्टर्लिंगचे Iymala Douce पिक्चर पाहू. गेले दोन महिने तोबा गर्दी ! मी दोन दिवसापूर्वीच त्या शोची दोन तिकिट काढून ठेवली आहेत. आत्ताचा क्षण आपला. दुसऱ्या क्षणाच भवितव्य काय ललाटी लिहिलायं क्या मालूम ? मिळेल तो क्षण आयला आनंदात, मजेत घालावायचा.. अस मी ठरवलाय ' नरेश म्हणाला.

'प्रथम टॅक्सी मिळवू या.' पिक्चर पाहू. मग जेवू या मस्तपैकी. दोन तास झोप काढू आणि रात्री पिण्याचा झकास प्रोगॅम करू ' असं म्हणत राजेशनी टॅक्सी थांबवली. ती टॅक्सी स्टॅर्लिंगच्या दिशेने धावू लागली.

पिक्चर सुरू झालं होतं. Shirly maclane च्या जागी राजला शुभांगीच दिसू लागली. तिचे मिस्किल डोळे, सडपातळ बांधा, खांद्यापर्यंत रुळणारे केस, सिगरेट ओढण्याची ढब, शर्लेच्या ऐवजी शुभांगीचा भास सारखा होत होता आणि तो मनाशी म्हणाला, फार दिवसात शुभा भेटली नाही. आज संध्याकाळी तिला भेटायचं आणि खुर्चीवर रेलून बसत पिक्चर पाहण्यात गुंग झाला. पिक्चर संपले. दोघांनाही खूप भूक लागली होती...

हॉटेलात जाऊन दोन चिल्ड बिअरची ऑर्डर दिली. थंडगार बीअर आणि जेवण घेऊन पुन्हा टॅक्सीने खोलीवर आले. दोघांच्या डोळ्यांवर झोपेचा अंमल चढला होता. नरेशनी स्वतः सिगरेट पेटवून राजला दिली. तोंडात सिगरेट धरूनच कपडे बदलले आणि कॉटवर स्वतःला लोटून दिलं. सोफ्यावर नरेश थोड्याच वेळात घोरू लागला. राजला झोप येईना. त्याला पुन्हा तीव्रतेने शुभांगीची आठवण झाली. ती काळोखी रात्र, तो जुहू किनारा आणि ती शुभांगी सारंसारं आत्ता घडत असल्याप्रमाणे डोळ्यापुढे उभं राहिलं.

त्या दिवशी नाटकाचा पहिला अंक संपताच भारतीने मिस्टर दत्तांची ओळख करून दिल्यानंतर तो जो नाटकगृहातून बाहेर पडला तो अत्यंत विमनस्क स्थितीत जुहूला खूप लांब एकांत अशा ठिकाणी बसला होता. त्याच्या मनाची तळमळ पाण्यातून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणे होत होती. गेली चार पाच वर्षं त्याचं लग्न ठरलं होतं. नाटक-सिनेमा, पिक्‌निक्-पार्टी सार दोघांनी मिळून केलं होतं. भारतीचा एम्. ए. चा रिझल्ट लागतांच लग्न होणार होतं. मित्र-मंडळी त्या दिवसाची वाट पाहात होती. मितभाषणी, मधुर हंसणारी, काळीसावळीच पण आकर्षक भारती त्याच्या डोळ्यासमोरून हलेचना टप्पोरे डोळे रोखून पहायची संवय त्याच्या अंतःकरणात बाण घुसून वेदना झाल्याप्रमाणे जाणवली. त्यानं कूस बदलली. मन विचार करीत राहिलं. माझ्याशी भारतीने का जीव घेणारा खेळ केला, मला का फसवलं? दोघांनी घराबद्दल केवढं चित्र रंगवलं होतं. तिची गाढ मिठी, ती आलिंगनं, ते चुंबन सारंच खोटं फसवं होतं तर! विचाराबरोबरच झपाट्याने मार्ग आक्रमीत करणारा सूर्य क्षितिजापलीकडे कधीच गेला होता. अंधाराचे गडद आवरण सगळीकडे

पसरलं होतं. सारा बीच निर्मनुष्य होता. लांब दूरवर भेळपुरी आदी दुकानातील दिवे चमकत होते. छुपी जोडपी. त्यांच्या पुसट हालचाली दिसत होत्या. समुद्राला भरती यायला बराच अवधी होता. पाणी खूप लांब गेलं होतं. आकाशात चांदण्या विखुरल्या होत्या. तोच काय तो प्रकाश साऱ्या आसमंतात पसरला होता. लांबवर दिव्याच्या अलंकाराने नटलेल्या इमारती चकाकत होत्या. जाहिरातीचे रंगीबेरंगी दिवे क्षणांत विझत व क्षणात चकाकत. राज शून्यपणे बसला होता. त्याला ना भूक, ना तहान, इतक्यात त्याला त्याच्या पुढून कोणीतरी झपाझप इकडे तिकडे न पहाता सरळ पाण्याच्या दिशेने एक व्यक्ती जाताना दिसली. त्याच्या एकाग्रतेचा भंग झाला. नाहीतर तो तशा स्थितीत किती वेळ बसला असता कोण जाणे! राजेश सारी शक्ती डोळ्यात आणून झपाझप पावले टाकणाऱ्या आकृतीकडे पहात राहिला. सडपातळ उंचशी व्यक्ती भराभर पुढे चालली होती. इतक्या अंधाऱ्या रात्री निर्मनुष्य अशा काळोखात भीतीची तमा न बाळगता पाण्याकडे धाव घेणे याचा अर्थ उघडच होता. राज चटकन उठला पावलांचा आवाज होऊं नये म्हणून पायातले बूट काढून हातात घेतले आणि त्या व्यक्तीच्या मागोमाग ठराविक अंतर ठेवून चालू लागला. आत्तापर्यंत गप्प असलेला वारा जोरात आवाज करू लागला. आणि निस्तब्ध सागराच्या लाटांनी तांडव नृत्य सुरू केले. जणू कोणाला तरी गिळकृत करण्यासाठी मगरीसारखा जबडा पसरून लाटांची धावपळ सुरू होती. प्रत्येक वेळी येणारी लाट मोठी येत होती. भरती सुरू झाली होती. ती व्यक्ती पुढे जाण्याची थांबली, डोळे मिटून हात जोडले आणि लाटेनं स्वत ला झोकून देणार इतक्यात राजेशने त्या व्यक्तीला खसकन मागे खेचले आणि फरफटत पाण्यापासून दूर ओढत नेले.

त्या व्यक्तीने खूप झोंबाझोंबी केली. त्या वेळी राजेशला कळून आले की कोणीतरी तरुण मुलगी प्रेमभंगाच्या निराशेने जीव द्यायला निघाली असावी. ती नुसतीच तरुण नव्हती तर सुंदरही होती तरुणी राजकडे वळून संतापानेच म्हणाली,

'कोण मला तुम्ही अडवणार? पुरुष? घे माझ्याकडून तुला हेच हवे आहे ना? त्रस्त समंधा शांत हो! मग तरी माझा रस्ता सोडशील?'

असे म्हणत तिने आपले कपडे वर केले व चोळीची बटणे फटाफट ओर-बाडून काढली. त्याच क्षणी राजने त्या मुलीच्या फाडकन थोबाडीत मारली. तिचे कपडे त्याने नीट सावरले आणि हातांचा आधार देऊन त्या तरुणीला बीचवर घेऊन आला आणि तिला धीर देत म्हणाला,

'तुझ्याकडून मला कशाचीही अपेक्षा नाही, आपली ना ओळख, ना देख. मनाचं मीलन मी फार महत्त्वाचं मानतो. आणि ते जर नसेल तर पशूत आणि आपल्यात कोणताही फरक नाही. विश्वास बाळग. तुझा एक हित-चिंतक म्हणून माझ्याकडे पहा. तुझी खुषी असेल, तुझी इच्छा असेल तर आपलं नाव कळावं अशी अपेक्षा बाळगतो.'

'माझं नाव शुभांगी '

'ओहो ! किती सुंदर नाव. चल रात्र झाली आहे. मी तुला तुझ्या घरी पोहोचवतो.'

'माझ्या घरी ?' आणि ती ओक्साबोक्शी रडू लागली.

हे सर्व विचार मनात येता येताच त्याची तंद्री भंग पावली. त्याने घड्याळाकडे पाहिले. साडेसहा वाजून गेले होते. असे बापरे ! ताडकन कॉटवरून तो उठला. नरेशला उठवलं. आतापर्यंत बाहेर चांगलाच अंधार पडला होता. कपडे करून दोघेही जिना उतरून खाली आले आणि टॅक्सी थांबवून दोघेही टॅक्सीत बसले. 'कोळीवाडा चलो ' असे राजेशने ड्रायव्हरला सांगितले आणि नरेशकडे पाहात म्हणाला 'काय रे बाटली पूर्ण भरलेली आहे ना ?'

'बिलकुल सीलबंद.'

'बहुत अच्छा, माझा विचार आहे. प्रोगॅममध्ये थोडासा बदल करावा.'

'आणखीन् काय करायचे आहे तुला ?'

'सांगतो थांब.' हॉटेलच्या दारात टॅक्सी थांबवून दोघेही खाली उतरले. हॉटेल अगदीच मामुली. स्वच्छता बेताताचीच. प्रवेशद्वारात मोठमोठ्या कढया ठेवून पदार्थांचे तळणे भाजणे चालले होते. राजेश नरेशकडे पहात म्हणाला,

'इथल्या तंदुरी चिकनची चव तुझ्या ओबेराय शेरेटन अगर सन् ॲण्ड सँड सारख्या पॉश हॉटेलच्या मुरगीलाही येणार नाही.' असं म्हणत त्यानें

कबाब तंदुरी, चिकन फ्राइड फिशची आर्डर दिली. 'येथील पदार्थांची चव मार डाला ! मी तर नेहमीच येतो. वेळी-अवेळी, अपरात्री, दिवसा कधीही या बंदची पाटी कधीही दिसणार नाही. भय्या, इथली दुनिया अगदीच वेगळी आहे बघ ' नरेश म्हणाला.

राजेशने थंड बिअरची बाटली हातात घेतली आणि दोघेही टॅक्सीत येऊन बसले. चेंबूर म्हणून राजेशनी ड्रायव्हरला सांगितले. टॅक्सी चेंबूरच्या दिशेने धावू लागली.

'अरे ! इतक्या लांब ? तिथे काय काम तुझं आहे ?'

'जे आहे ते नुसतं पहा. आपण चेंबूरहून परत येईपर्यंत दिलेली ऑर्डर तयार होईल. आता वाजले किती ?'

'बरोबर आठ वाजून दहा मिनिटे झाली आहेत.'

चेंबूरला टॅक्सी पोहोचताच लेफ्ट, राईट, सीधी, अशी बरीच टॅक्सी पळविल्यानंतर रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली टॅक्सी थांबवली. त्याच्या हातात बिअरची बाटली उघडून देत राजेश म्हणाला, 'तू ही संपवायच्या आत मी आलोच ' आणि टॅक्सीचे दार उघडून राजेश समोरच्या अरुंद रस्त्याने चालू लागला. दहा मिनिटांच्या आतच राजेश परत टॅक्सीत येऊन बसला.

'चलायचं ? '

'पाच मिनिटं थांब ! '

'आणखीन कोणी येणार आहे का ?'

'होय '

'राजेश, आज मला तुझ्याशी खूप बोलायचं होतं. पण परक्या व्यक्ती-समोर ते बोलता येणार नाही.'

'काही हरकत नाही. त्या व्यक्तीसमोर तू मोकळेपणाने बोलू शकतोस '

'कोण आहे ती व्यक्ती ?'

'पहाशीलच आता '

मागच्या बाजूचा टॅक्सीचा दरवाजा उघडला गेला.

'ये आत ' राजेश म्हणाला.

एक सुंदर तरुणी टॅक्सीत येऊन राजेश जवळ बसली.

नरेशला आश्चर्याचा धक्का बसला. त्याच्या स्वप्नांतही कधी आलं नाही की राज अशा तऱ्हेने आपलं आयुष्य घालवीत असेल. तो राजला सोज्वळ सुविचारी अशी आदरणीय व्यक्ती मानत होता.

'ड्रायव्हर, फिर कोळीवाडा चलो.'

टॅक्सीत शुभांगी राजेशच्या शेजारी बसली होती. 'शुभा, हा नरेश माझा मित्र! आणि नरेश ही शुभांगी' राजेशने दोघांची ओळख करून दिली. दोघांनी एकमेकांना नमस्ते केल. हॉटेल समोर टॅक्सी उभी राहिली.

'नरेश, प्लीज पाकीट आणतोस.' चटकन् नरेश उतरला व बांधलेलं पाकीट घेऊन आला. घरापासून एक फर्लांगभर राजेशनें टॅक्सी उभी करायला सांगितली. बरीच रात्र झाल्यामुळे रस्त्यावर शांतता पसरली होती. इमारतीत राजेश राहात होता त्यात अनेक जातीधर्मांचे लोक राहात होते. दिवसभरच्या थकावटीने हैराण झालेले जीव घासभर खाऊन झोपी गेले होते. त्यातून जानेवारी महिन्याची रात्र!" मस्त थंडी पडली होती. दारं-खिडक्याही लोकांनी बंद केल्या होत्या. उन्हाळा असता तर खाटल्यावर-जमिनीवर बायका, मुलबाळं अस्तावस्त्य पडलेली दिसली असती राजेशने दरवाजा उघडून दिवा लावला. शुभा आणि नरेश आत येताच दरवाजा बंद केला.

'सोड्याची काय व्यवस्था?'

नरेशने शुभांगीला न्याहळत राजेशला विचारले. बावीस-तेवीस वर्षांची, गौर कांतीय, सडसडीत बांध्याची बेताचा मेकआप्, लाल शर्ट, मॅचिंग बेल-बॉटम्. तो ड्रेस तिला अगदी शोभून दिसत होता.

'बैस ना.' शुभाला उद्देशून राज म्हणाला.

'आज बरीच थंडी पडलेय नाही.' शुभांगी काहीतरी बोलायचं म्हणून बोलली.

'माझ्याजवळ सर्दीवर रामबाण औषध आहे. घाबरू नकोस. नरेश, प्लीज आतून तीन ग्लास, पाणी व मोठया दोन डीश घेऊन ये'

'मी आणते की!'

'छे! छे! तुम्ही बसा मी आणतो' असे म्हणत नरेश ग्लास आणायला आत गेला.

शुभा आणि राज एका कोचावर बसले. नरेश समोर बसला होता. राजेशने तीन ग्लासात व्हिस्की घातली आणि पाणी घालून तीन ग्लास भरले. चिअर्स म्हणत तिघांनी ग्लास तोंडाला लावले, शुभांगी आणि राजेशनी एका दमात ग्लास रिकामे केले. नरेश घोट घोट पीत होता. तो आवाक होऊन त्या दोघांच्याकडे पाहात राहिला. विशेषत: शुभाबद्दल त्याला आश्चर्य वाटले. मनात म्हणाला, ' चांगली मुरलेली दिसतेय स्वारी ? '

' राजबाबू, बरोबर एक वर्षानी मी येथे आले नाही का ?' ओठ रुमालाने टिपत राजेशकडे पाहात शुभांगी म्हणाली.

' खरंच शुभांगी, मध्यंतरी मला सवडच झाली नाही. फारच कडकी होती. आज नरेशनी बाटली आणली. आणि मी तुला घेऊन आलो. '

' बाबूराव, कडकी वगैरे गोष्टीची अडचण कशाला सांगता. मी इथे आले की या गोष्टी हव्यातच असं गृहीत तुम्ही का धरता ?'

' शुभा, हा तुझा चांगुलपणा आहे. तुला माझा स्वभाव, परिस्थिती सारं ठाऊक आहे. तुझ्यासाठी खूप करावंसं वाटतं पण जाऊ दे. '

' राजबाबू, तुम्हाला जेव्हा मी हवी असेन तेव्हा तुम्ही बोलवत जा. तुमच्याकडून व्हिस्की, पैसे कशाचीही मला गरज नाही. जगात जोपर्यंत निरपेक्ष प्रेम करणारी माणसं आहेत तोपर्यंत विश्वास आहे. बाकी इतर गोष्टी गौण आहेत. मी स्वतःला भाग्यवान समजते. मला केवढ्या सन्मानानं तुम्ही वागवता ?'

' धन्यवाद ! आदा बर्जे है '

' धन्यवादाची मुळीच गरज नाही. बाबूराज संकोच करून काही मिळत नसतं. तुम्ही संकोच्याचा बुरखा पांघरून बसलात तर तारुण्य आणि शरीर दोन्ही केव्हाच निघून जाईल, खलास होईल. राजबाबू, तुमच्यावर मी प्रेम करते असं मी कसं म्हणू ?. माझी जीभच टाळ्याला चिकटून बसते. प्रेम या शब्दाबद्दल हसू येतं. ती माझी लायकी नाही पण पूर्वजन्मीचा तुमचा आणि माझा जरूर ऋणानुबंध आहे. शरीर विकणं हा माझा धंदाच मी केला आहे. '

' धंदा ?'

'चुकीचा शब्द बोलले. माफ करा. हेतू एकच तुम्ही समजता तोच ! एक म्हण आहे. 'घोडा गवतावर प्रेम करू लागला तर भुकेनं मरून जाईल' राजबाबू मी तुमच्याकडून कधी कधी पैसे घेते. पण माझ्या अंतःकरणाला यातना होतात' आणि तिच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू ओघळू लागले.

'शुभा, एक गोष्ट लक्षात ठेव. मी कष्टानी पैसे मिळवतो. इतर लोक ब्लॅक अगर अनैतिक मार्गांनी पैसे मिळवतात. आणि त्या पैशातून ते आपलं मनोरंजन, चैन करतात. मी रात्रंदिवस कष्ट करतो आणि फक्त तुझ्याकडे येतो. मनोरंजन, जरुरी आणि निकड यात खूप अंतर आहे.' असं म्हणून डोळे मिटून त्याने कोचावर मान टाकली.

नरेशच्यापुढे व्हिस्कीचा तिसरा ग्लास भरलेला होता. तसं पाहिलं तर सर्वांचीच तिसरी फेरी चालू होती. नरेशने अनेक मुली खेळविल्या होत्या. पण इतका मोकळेपणा, खुल्लमखुला कारभार, त्यानं कोणत्याच मुलीत पाहिला नव्हता. राजेशला तो सरळमार्गी, सचरित्र समजत होता. तिसऱ्या पेगनी संकोच्याचा पडदा दूर झाला. आदरयुक्त आवरण त्याने फेकून दिलं आणि राजेशला तो आपल्या बरोबरीचा समवयस्कच समजू लागला. ही मोकळीक आणि वातावरण व्हिस्कीमुळे निर्माण झालं होतं.

'तुम्ही लग्न करत का नाही ?' नरेशनी विचारलं.

'मला काही म्हणालात मी आणि लग्न ?' आणि ती हसू लागली. त्या हसण्याच्या सुरात जे कारुण्य होतं. ते फक्त राजेशला माहीत होतं

'पण, तुम्ही इतक्या सुंदर आहात, तरुण आहात, तुम्हाला वाटत नाही का ? आपणाला चांगला जोडीदार असावा. आपलं घर असावं, अशा पद्धतीनं आयुष्य घालवणं म्हणजे स्वतःच्या आयुष्याचा आपल्या हातानी होम करणं. आणि असं हे तुम्हाला पाप वाटत नाही ?'

'पाप ? कोणतं पाप ?' त्याच्याकडे रोखून ,पाहात शुभानी विचारलं. तिच्या डोळ्यातून नुसत्या ठिणग्या उडत होत्या. तिचा तो अंगार पहाताच नरेश घाबरला

'तू ...तु ...तुम्ही ज्या पद्धतीन जगता ते पा ...पा ...पाप आहे' नरेशनी चाचरत आपलं वाक्य कसं तरी पुरं केलं.

'आणि पुण्य कोणतं ?' त्याला वेडावत उपरोधात्मक शुभाने विचारलं
'पाप-पुण्य ... !' नरेशच्या कंठातच ते शब्द अडकून पडले.
'नरेश भय्या, अद्याप तुम्ही फार लहान आहात.'
'मला वाटतं तुमचं आणि माझं वय जवळपास सारखंच असावं.'
'असेलही कदाचित ! परंतु जीवनातला खडतर अनुभव तुमच्यापेक्षा मी जास्त अनुभवला आहे.'
'शुभा नरेशचं बोलणं वाईट समजू नकोस.'
'नाही राजबाबू, जो कोणी पुरुष सहानुभूतीने मला सांगू लागला तर तो माझा भाऊ आहे असं मी समजते'
नरेश राजेशकडे हसत पहात म्हणाला, 'ऐकलंस नरेश शुभाने कसं पकडलं तुला ! काय उत्तर देणार ?'
नरेश गप्प बसला. त्याच्याजवळ कोणतंही उत्तर नव्हतं.
'नरेशभय्या, मी तुमच्या भावाचं नात लावताच केवढे घाबरलात. पण ह्या नात्याचा बुरखा समाजाच्या डोळ्यात धूळ फेकण्याकरिता असतो. त्यात नानाविध लोकांचा समावेश आहे पगडीवाले, गंधाचा टिळा लावून जपजाप्य करणारे, समाज सुधारकांचा हातात झेंडा घेणारे, एक ना अनेक, प्रत्येकाच्या बुरख्याआड काहीना काही काळंबेरं आहे पण हीच माणसं दुसऱ्याचे चटकन् वर्म शोधून त्यावर बोट ठेवतात मी बरोबर बोलले ना बाबूराज ?'
'शुभा, या गोष्टी मला कशाला सांगतेस ? त्या गोष्टी मला नवीन आहेत का ? अग तुला एक गोष्ट सांगायचीच राहिली.'
'मग सांग ना ?'
'नरेश, एका मुलीच्या प्रेमात पडलाय.'
'अरे वा ! मन:पूर्वक अभिनंदन !' तंदुरी चिकनचा तुकडा तोंडात घालत शुभा म्हणाली. 'तरीच एवढे उच्च विचार दिसतात.
'राजबाबू, आज तुम्ही मला सिगरेट दिली नाहीत.'
'ते सिगरेटचे पॅकेट, ती काडयाची पेटी टेबलावरच आहे.'
'मी आपण होऊन सिगरेट कधीच घेणार नाही. तुम्ही दिलीत तर मी माझा सन्मान समजीन.'

राजने सिगरेट तिला दिली आणि काडी ओढून पेटवीत तो म्हणाला; 'बायकी हट्ट यालाच म्हणतात.'

शुभाने सिगरेटचा दीर्घ श्वास आत घेतला. आणि तिला जोरात ठास लागली. त्यामुळे तिचे प्राण कासावीस झाले. खोकला थोडा कमी झाल्यावर राजनी विचारलं,

'काय ग तूं बरी आहेस ना ?'

'हो.'

'तुझा हा खोकला मला तरी ठीक वाटत नाही.'

'राजबाबू, म्हणून म्हणते की संकोचाचे आवरण काढून फेकून द्या. आणि तुम्हाला वाटेल तेव्हा मला बोलत जा. तुमच्या सहवासात मला एक प्रकारची शांती मिळते. कुलीन स्त्रिया साधूसंतांचे व्याख्यान ऐकतात. पुराण कीर्तनाला जातात. त्यांना त्यामुळे समाधान मिळतं. पण माझ्यासारख्या रस्त्यावर पडलेल्या स्त्रीला तुमचे विचार ऐकून बरं वाटते. समाधान लाभतं. मला माहीत आहे. तुम्ही कोणी साधुसंत नाही. तरीसुद्धा तुमचे विचार ऐकले की मला समाधान मिळतं. त्या शान्तीची मला अत्यंत जरुरी आहे बाबूजी व्यवहाराच्या पातळीवरून सुद्धा तुम्ही मला बोलावू शकता. फक्त तीनचार वर्षंच !'

'तीनचार वर्षानंतर संतीण बनण्याचा विचार आहे वाटतं तुझा ?'

'तस समजा.'

'इतक्या लवकर संन्यास ?' नरेशनी विचारलं.

'याचं उत्तर समाज देऊ शकेल. मी देऊ शकत नाही. ज्या पद्धतीने मी माझं जीवन घालवते त्याचा विचार केला तर तीनचार वर्षांत क्षयासारख्या भयंकर रोगाच्या जबड्यात जायला मुळीच वेळ लागणार नाही.' हे बोलत असताना तिच्या स्वरात जराही खेद वा दुःख नव्हतं.

'शुभांगी, तू म्हणालीस ते अगदीच अशक्य नाही.'

'मला मरणाची मुळीच भीती वाटत नाही. जगण्याची इच्छा तर मुळीच नाही. स्वतःवर भरपूर सूड उगवून झालायं. मला पक्कं माहीत आहे. माझ्या विपत्तीच्या काळात कोणीही मला विचारलं नाही. इतक्या मागमांना मी

वि... ३

तृप्त करून पाठवलं एकाला सुद्धा माणुसकीची भावना निर्माण झाली नाही. भक्ष दिसताच गिधाडाप्रमाणे तुटून पडणारी ही माणसं ! त्यांच्याकडून माणुसकीची अपेक्षा ठेवणं चुकीचंच आहे म्हणा. बाबूजी मात्र माझा तुमच्यावर विश्वास आहे. तुम्ही धावत याल आणि जे जे शक्य आहे ते ते कराल. मग कोणाची पर्वा करणार नाही. आणि खिशाकडे पहाणार नाही याबद्दल मला खात्री आहे.

आजची सुंदर रात्र दुःखाच्या आठवणीने भयानक बनविण्याची माझी इच्छा नाही. मी येथे येते ती माझा रोजचा दिवस विसण्यासाठी आणि समाधानाचं गाठोडं बांधून घेऊन जाण्यासाठी ! वेळ फुकट घालवण्यासाठी नाही. अरे हो नरेशभय्या, मी तुम्हाला गोष्ट सांगणार होते ना ? या व्हिस्कीमुळे कोठल्याकोठे आपण आलो. मी सांगत होते की, मी वेश्या नाही. वेश्या जी स्त्री असते की जिचे चरित्र निर्मळ नसेल ती. पण ज्या मुलीला चांगलं-वाईट चरित्रातील फरकही कोणी शिकविला गेला नाही. ती वेश्या होऊ शकत नाही.'

'शुभाताई, तुमची कहाणी, तुमचे विचार ऐकून मी तर बधीर झालो आहे.'

'ठीक आहे. आता मी तुम्हाला माझ्याबद्दल काही सांगणार नाही. तुम्ही आपल्यासंबंधी सांगा. मला समजेल तरी चांगल्या घरंदाज मुली-मुलं कोणत्या पद्धतीनं प्रेम करतात. एकेकाळी मी पण एक स्वप्न रंगवलं होतं. माझं हक्काचं छोटसं घर, माझा पती, आमची मुल. खूप छान स्वप्न मी पहात असे. तासन् तास ते चित्र मी पहात गुंग होऊन जाई. पण ते चित्र कधीच आकारलं नाही. माझ्या संसाराचं शीड कधीच मोडून गेलं. विवेकाचं शीड त्याच बरोबर कधीच फाटून चिंध्या उडाल्या. उरलं होतं एकच प्रवाहाबरोबर वहात जाणं, आणि प्रचड भोवऱ्यात बुडून जाणं. ऋतुचक्र फिरतं होतं. कठोर जीणं नियतीन माझ्या नशिबी लिहिलं होतं. तो मला टाकून गेला. माझं सारं लुटून ओरबाडून गेला. त्यान आपली छाया वृक्षाप्रमाणे माझ्यावर धरली नाही. माझं स्वप्नं उधळले. हे तारुण्य, हे सौदर्य विक्रीसाठी बाजारात द्यावं लागलं. आत्महत्येचा माझा प्रयत्न फसला. अरे हो, पण मीच बडबड सुरू केली पुन्हा.'

'शुभा, नरेश मला तीन महिन्यांनी आज भेटतोय. मागच्या खेपेला भेटला तेव्हा त्याचं प्रेम नुकतंच स्टार्ट झालं होतं. आणि आज संध्याकाळी माझ्याजवळ त्याला काही एकांतात बोलायचं होतं. म्हणून ही बाटली घेऊन आला. काही गंभीर घटना घडली असावी. शुभा, तुझ्याप्रमाणे हा मला सल्लागार मानतोय.'

'तुमच्यासारखा सल्लागार दुसरा कोणी मिळणार नाही. त्यांची अड-चण काय आहे हे समजलं तर बर होईल. मलाही काही मदत करता येईल.'

'असं काही विशेष घडलेलं नाही.'

'नरेश, घाबरण्याचं मुळीच कारण नाही. मोकळ्या मनानी जे काही सांगायचे ते सांग. तू जे सांगशील ते गुप्तच राहील. शुभाजवळ मोठमोठी रहस्य लपलेली आहेत. अरे हिच्या ऐवजी सांसारिक स्त्री असती तर नक्कीच नवऱ्याचं रहस्य सुद्धा गुप्त राहिलं नसतं. काय नाव आहे तुझ्या प्रीतिदेवतेचं? पूर्वी एकदा तू मला सांगितलं होतंस पण मी विसरून गेलोय.'

'गीता'

'नाव फारच छान आहे. कधी लग्न करणार आहात?'

'लग्न?' म्हणून नरेशनी गंभीर चेहरा केला.

'काय रे सर्व ठीक आहे ना? केवढा मोठा उसासा टाकलास म्हणून विचारतोय. तिचं दुसऱ्या कोणाबरोबर लग्न ठरलं की काय?' नरेशनी विचारलं.

'नाही रे बाबा, असलं काही नाही.'

'अरे, पण जे बोलायचं, सांगायचं ते मोकळ्या मनानी सांग ना!'

'नरेशभय्या, तुम्हाला काही सांगायचं असेल तर ते राजबाबूजवळ एकांतात सांगा. मी दुसऱ्या खोलीत जाते.' आणि ती आतमध्ये निघून गेली.

'हं, आता सांग.'

सांगण्याची सुरुवात करण्यापूर्वी नरेशने आतल्या दरवाजाकडे पाहिलं. आणि हळूच आवाजात म्हणाला,

'मी फार मोठ्या संकटात सापडलोय.'

'सांग तर खरं! तुला माझ्याकडून होईल ती मदत करीन असं आश्वा-सन देतो.'

त्याच्या हातावर आपला हात ठेवत नरेश म्हणाला,

'म्हणून तर तुझ्याकडे आलोय. अशा प्रसंगी तुझ्याशिवाय मला दुसरा कोणीही मदतनीस नाही.'

'तू माझ्यावर केवढा विश्वास टाकलास मग सांग पाहू काय ते.'

'गीता...' म्हणून तो गप्पच झाला.

'पट्कन् बोल. आता शुभांगी येईल.'

'गीता...गीताला दिवस गेलेत.'

राज आ वासून नरेशकडे पहातच राहिला. त्याला असं काही घडेल अशी मुळीच कल्पना नव्हती.

'राजेश, आता काय करू ? मी कोणत्याही लेडीज डॉक्टरला ओळखत नाही.'

'खिशात भरपूर गल्ला असला की जगात कोणतीही अडचण रहात नाही.'

म्हणून तर मी काळजीत आहे. माझ्या दुसऱ्या एका मित्राला मी ही गोष्ट सांगितली. त्याच्या ओळखीची एक लेडी डॉक्टर आहे. तिला त्यानं विचारलं तर तिने पाचशे रुपये मागितले. इतके पैसे कोठून आणू ? रात्रं-दिवस हाच विचार करतोय.'

'स्वाभाविकच आहे. परंतु तुझी गीता तुझ्यापासून गरोदर असल्याची खात्री आहे ?'

'डेफिनेटली ! गीता कुलीन घरंदाज मुलगी आहे.'

'कमाल आहे नरेश तुझी. तीनचार महिन्यात इतक्या पुढे तू गेलास ?' जबाबदारी ओळखली नाहीस. अगदी मूर्ख, रानटी, माणसासारखं बेजबाबदार वागलास' राजेशनी त्याला सुनावलं

खालच्या मानेनी नरेश म्हणाला, 'भय्या, चूक झाली खरी. एकदोन आठवडे ही गोष्ट गुप्त राहील. आणि नंतर सर्वांना कळून येणारच. आई-बाप तिचे काय करतील याची कल्पनाही करवत नाही. त्याचीच काळजी जास्त वाटतेय.'

'थांब घाबरू नकोस. धीर धर. शुभांगीची मदत जरूर मिळेल. मी तिच्याजवळ बोलतो. ती एकच काय डझनभर लेडी डॉक्टरांना ओळखते.'

' शुभांगी ?' नरेश नाराजीने म्हणाला.

'तू का घाबरतोस ? शुभा शरीर विकते परंतु ती लोकांची रहस्य विकत नाही; अब्रू विकत नाही. माझा तिच्यावर गाढ विश्वास आहे. म्हणूनच मी सांगतोय.' आणि त्यानं शुभांगीला हाक मारली.

मी आता बाहेर येऊ का ?' शुभांगीने आतूनच विचारणा केली.

' ये ये तुलाच हाक मारतोय.'

शुभा बाहेर येत म्हणाली,

' दोघा मित्रांच्या खूप दिवसांच्या गुप्त गोष्टी, पोटभर बोलून झाल्या का ? '

' हो पण नरेशला माझ्यापेक्षा तुझीच मदत पाहिजे.'

' कमाल आहे. एवढ्याशा गोष्टीला इतकं लाजण्याचं काय कारण ?' नरेशबाबू, तुम्ही राजेशबाबूचे मित्र. तुम्ही हुकूम करायचा.' चला आत शुभांगीने हात पुढे करून आदाबर्ज़ है असा आविर्भाव करून त्याला विनंती केली.

' शुभा, तुझा गैरसमज झालायं. नाही नाही माझ्या मित्राला किंवा इतर कुणालाही मी माझ्या घरात असं कधीही वागू देणार नाही व वागवणार नाही. लक्षात ठेव हे शुभा.'

शुभांगीने राजेशकडे अभिमानाने पहात विचारलं,

' बाबूराज या एका कामाव्यतिरिक्त आणखी कोणतं काम नरेशभय्यासाठी मी करू शकते.' आणि तिने नरेशकडे पाहिलं. त्या वेळी त्यानं आपली मान खाली घातली होती.

' शुभा, तुझ्या ओळखीची एखादी लेडी डॉक्टर आहे का ?'

' कमालकी बात करता आहात राजबाबू !'

' म्हणजे ?'

' अहो माझ्यासारखी शरीर विकणारी बाई लेडी डॉक्टरला न ओळखेल तरच नवल ! मग काय सीता–सावित्री का तिच्या माहितीच्या असतील ?' शुभा उपरोधिकपणे हसत सुटली.

' अग बये, मी विचारतोय की एखादी लेडी डॉक्टर तुझ्या चांगल्या परिचयाची आहे की नाही ?' राजेशनी विचारलं.

' बाबूराज, असले तेढे प्रश्न विचारू नका. सरळ सांगा काय काम आहे ते आणि तुमच्यासाठी मी काय करू ?'

' नरेशला लेडीज डॉक्टरची अत्यंत निकडीची गरज आहे.'

' अरे राम !' म्हणत तिने नरेशकडे पाहिले.

' शुभा, ज्या मुलीवर तो प्रेम करतोय. तिला दिवस गेलेत.'

' अरे बापरे !' म्हणत शुभाने नरेशवर नजर रोखली.

' का ग इतकी विचारात का पडलीस ? इतकं का कठीण काम आहे ?'

' नाही राजबाबू, मी निराळाच विचार करीत होते. अनादिकालापासून चालत आलेला हा झगडा काही महिन्यापुरता असता तर मामुली गोष्ट होती.'

' काय विचार करत होतीस ?'

' नरेशभय्या, माझ्याकडे पहा !' हुकमी आवाजात शुभांगी नरेशला म्हणाली.

नरेशनी लज्जायुक्त दृष्टीने तिच्याकडे पाहिलं. त्या नजरेत गुन्ह्याची कबुली होती. ती केविलवाणी नजर पहातच शुभा म्हणाली,

' नरेशभय्या, मी तुम्हाला जरूर मदत करीन. केवळ राजबाबूंनी सांगितले म्हणून ! त्यांचा शब्द मी कधीही खाली पडू देणार नाही. पण एका अटीवर. आहे कबूल ?'

' अट ?'

' होय बाबूराज नरेशभय्याला एक शपथ घ्यावी लागेल. गीताशीच लग्न करायची शपथ ? आहे तयारी ?'

' मी ही अट मानली ' नरेश म्हणाला.

' शपथ सुद्धा घेतलीत ?' राजेशकडे पहात शुभांगी मग म्हणाली, ' बाबूराज, गोष्ट शपथेपर्यंत येऊन पोहोचली. पण संपली नाही. गोष्टीला खरी सुरुवात आता झाली आहे. मी माझ्यावरून जग जाणतेय. आजपर्यंत राजेशबाबूंनीसुद्धा ऐकली नाही. ऐका माझी कहाणी. '

आणि मग कुठेतरी पूर्वी गेलेल्या आयुष्याकडे पहात ती आपली कहाणी सांगू लागली--

एक लहानसं दोन खोल्यांचं घर, ज्यात नवतारुण्याने बहरलेली नुकतीच उमलू लागलेली सुंदर, तेजस्वी शुभांगी ! सुंदर, तरुण, देखण्या मुलाच्या बाहुपाशात तृप्त मनानं विसावली होती. तो शुभांगीला सारखा दिलासा देत होता. म्हणत होता, ' शुभा मी तुझाच आहे. विश्वास ठेव. माझी ही शेवटची परीक्षा चार महिन्यांवर आली आहे. ती परीक्षा संपताच मी तुझ्याशी लग्न करीन. मी नोकरी करीन व पैसे मिळवीन. तुला उन्हाचीही झळ लागू देणार नाही. हे नाजूक फूल कोमेजून जाता कामा नये.' ओठाचे, गालाचे, मिटलेल्या डोळ्याचे किती मनसोक्त पापे घेई. तो म्हणे, ' माझ्या या खोलीत आपला हक्काचा संसार मांडू .' सुरुवातीला ! ' विश्वनाथ ' त्याचं नाव असूनही त्याला मी ' विशू ' म्हणत होते. विशूचे दंड पिळदार होते, मनगटं रुंद होती. मनात विचार आला या मनगटात माझं संरक्षण करण्याची केवढी शक्ती आहे. आणि या रुंद खांद्यावर विसाव्याला ही खूप जागा आहे. त्याच्या खांद्यावर मी मोठ्या विश्वासानं मान टाकली. नरेशभय्या तुम्ही गीताशी लग्न करण्याबद्दल शपथ घेतली आहात पण लक्षात ठेवा अशाच प्रकारची शपथ ' विशने ' माझा हात हातांत धरून घेतली होती. आम्ही दोघं एकमेकांना बरेच दिवस ओळखत होतो. रोज आमच्या गाठी-भेटी होत होत्या. फिरणं, सिनेमा, हॉटेल्स सारी मजा चालू होती. त्यासाठी घरी आईला सांगण्यास रोज नवनव्या युक्त्या करत होते. थापा शोधत होते. आम्ही अधिकाधिक जवळ येत होतो. आमची शरीरं लांब रहायला तयार नव्हती. दिलेली वेळ तो कधीही चुकवत नव्हता. छान छान उंची कपडे करून यायचा. खूप देखणा होता. मी तर त्याच्यावरून जीव ओवाळून टाकत होते. चार महिन्यांनी तो माझा, अगदी माझा होणार होता. मी दिवस मोजत होते. आम्ही वचनबद्ध होतो. किती आर्जवी, गोड लव्हाळी वागणूक होती त्याची ! आणि मला त्याची फसवणूक करावयाची नव्हती. एक दिवस मी त्याला माझी कहाणी सांगितली.

एका श्रीमंत व्यापारी माणसानं आईला सांभाळलं होतं, माझी आई देखणी आहे. तो गोव्याला राहात होता. घरदार बायका–मुलं सारं गोव्यात आणि मुंबईला धंद्यानिमित्ताने विमानानी बरेच वेळा वरचेवर यायचा. आईला व मला त्यानं संभाळलं होतं. आमच्यासाठी उत्तम घर घेऊन दिलं.

आणि ऐषाआरामात ठेवलं होतं. पैशाला तोटा नव्हता. सर्व आबादीआबाद होती. मी मोठी होत होते. शालेय शिक्षण संपून कॉलेजच्या दारात नुकतंच पाऊल टाकलं होतं. त्या माणसाचं येणं मला आवडेनासं झालं मी त्याचा राग राग करायची. बाहेर निघून जायची. आई त्या माणसाशी नीट वाग म्हणून सांगायची. पण मला त्याचा राग येई. माझा संताप होई

हे गृहस्थ घरी आले की मला मोठ्या प्रेमानं आपल्या जवळ घेत. माझ्या गालाचा पापा घेत. त्यावेळी वाटे एक मुस्कटात भडकावून द्यावी. मिठी मारण्याच्या निमित्ताने माझे उरोज दाबी. मी पलंगावर वाचत पडले असले की शेजारी येऊन मिठी घालून मला घट्ट दाबून धरी. मला त्या माणसाच्या पाशवी वृत्तीचा राग आला होता. खूप वस्तू माझ्यासाठी ते गृहस्थ आणीत. उंची उनी साड्या, मला त्यातलं काही नकोसं वाटे. संशयाने मला घेरलं होतं आईचा आधार वाटत नव्हता तिला मी ज्या ज्या वेळी सांगे तेव्हा तीच माझ्यावर चिडत असे. म्हणे ' त्यांचं वय तरी लक्षात घे. पन्नाशी उलटून गेली. तुझ्या एवढीच त्यांची मुलगी आहे. वेड्यासारखं कांहीतरी बरळू नकोस. अग तू लहान वर्षा-दीड वर्षांची होतीस. तेव्हा तुझ्या बापानं माझ्यासाठी यांच्याकडून खूप पैसे घेतले. आणि त्यांच्या स्वाधीन मला केलं. दारूचं आणि बायकांचं व्यसन तुझ्या बापाला ! त्यामुळे चांगली नोकरी गमावली आणि शेवटी त्यांतच त्यांना मृत्यू आला. माझ्या सौंदर्यावर हे मोहीत झाले. स्वतःच घरदार, प्रतिष्ठा संभाळून माझ्या सुखात तिळमात्र उणीव भासू दिली नाही. आज वीस वर्षं तेच माझा नवरा, तेच माझं सर्वस्व आहेत माझ्याप्रमाणे तुलाही त्यांनी कधी कमी पडू दिलं नाही. तू म्हणतेस तसा संशय जराही मला येत नाही, येणार नाही. स्वतःच्या मुलीप्रमाणे त्यानी तुझा संभाळ केलाय. वेडे पोरी. विचार कर. उद्या तू लग्न होऊन एकदोन वर्षांत जाशील. मी एकटी त्यांच्या आधाराशिवाय कशी राहू ? किंवा तू रागाच्या भरात त्यांना दुखावलंस आणि त्यांनी आपणाला अशा अर्धवट अवस्थेत सोडलं तर आपलं काय होईल. त्याना थोडक्यासाठी दुखवू नकोस.

ही गोष्ट मी विशूला सांगितली होती. मला त्याचा मुळीच विश्वासघात करायचा नव्हता. आमचं एकमेकांवर खरं प्रेम असेल तर कोणतीही गोष्ट

आड येणार नाही. असा माझा विश्वास होता. माझ्या नवऱ्यापासून मला काही लपवून ठेवायचं नव्हतं. आम्ही मनानी खऱ्याखुऱ्या अर्थानी एक होऊन मग पतिपत्नी या रूपानं आमचं मीलन होणारं होतं. मी त्याला रोज म्हणे, लवकर परीक्षा दे आणि मला माझ्या हक्काच्या घरी घेऊन ये. एक खोली का असेना गरिबीत सुखाने संसार करू या आणि त्यानंही माझी हकिगत ऐकून वागण्यात जराही फरक केला नाही. उलट आधारच दिला. मनातल्या मनात मी माझ्या भाग्याचा हेवा करी. माझ्या संसाराचं शिल्प मी केवढ्या तरी भव्य प्रमाणात उभं करी. आमची छोटी सुंदर मुलं रांगत. धावत येत असल्याचे स्वप्न पाही. विशूला म्हणे, ' आपली मुलं खूप सुंदर होणार कारण करता करविता तू किती रे देखणा आणि सुंदर आहेस ' तो म्हणे, आणि तू किती सुंदर परीसारखी आहेस. अशी गोड गोड मोहून टाकणारी संभाषणंही आमची चालत असत.

अशीच एक भयानक संध्याकाळ आली. दिवस संपतो आणि रात्र सुरू होते. तीच कातरवेळ. आठवण झाली की अद्याप माझा थरकाप उडतो. त्या दिवसापासून संध्याकाळच्या भयानक कातरवेळी मी कधीच घरी थांबत नाही. त्यावेळेचा धसकाच मी घेतलाय. आणि हो काय सांगत होते, मी तुम्हाला ? अलीकडे दोन तीन खेपेला ते गृहस्थ आले की काहीतरी घुसफूस त्या दोघात चाले. आईचे रडवे डोळे मला दिसत. ती गप्प गप्प असे. एक दोन वेळा मी विचारलं तर तिनं मला उडवून लावलं. कधीतरी पटकन म्हणे- ' कधी एकदा लग्न होऊन तू आपल्या घरी सुखानं जाशील असं मला झालंय. मी म्हणे ' आई इतकी का मी तुला जड झालेय.'

मला पोटाशी धरून म्हणे, ' नाही ग शुभा माझं हे सुंदर रत्न कोण्या मेल्याच्या बुभूक्षित नजरेला येण्याआधीच देव्हाऱ्यात योग्य जागी बसावं असं वाटतं. कोणत्या आईला आपल्या मुलीला लांडग्या-कोल्हयांनी ओर-बाडून टाकावी असं वाटेल ?' आई कसल्यातरी भयंकर काळजीत असावी इतकंच मी हेरलं होतं. आणि त्या भयानक संध्याकाळी माझी आई सिनेमाला शेजारणीबरोबर गेली होती. तसं तिने मला सकाळीच सांगितलं होतं. मी कॉलेजमधून घरी आले होते. विशूला काही महत्त्वाचं काम होतं. तो भेटणार नव्हता. मी वाचत पलंगावर पडले होते. मला कधी झोप लागली. किती

वेळ मी झोपले काही पत्ता नव्हता. मी जागी झाले ती कोणाच्या तरी स्पर्शांनी ! त्या व्यक्तीनं मला घट्ट मिठी मारली होती. मला परिस्थितीची कल्पना आली. आमचा पोशिंदा काका हा लांडगा माझे लचके तोडणार, माझं भक्षण करणार. दिवा उशाशी जळत होता. मी म्हणाले, 'तू ... तू तुम्ही काका मी तुम्हांला पित्यासमान मानत होते. तशी माझ्या आईची शिकवणही आहे. आणि ही पाशवी नजर तुमच्या मुलीसमान असणाऱ्या मुलीवर ?'

खो खो हसत तो म्हणाला, 'वेडे, मुलगी असणं आणि मुलगी मानणं यात फार अंतर आहे. जास्त वटवट करून वेळ घालवू नकोस. आईला मीच सिनेमाला पाठवली. नोकरांना घालवून दिलं' त्या वेळी आईच्या खिन्न-तेचे कारण मी समजले. वास्तविक तिनं मला सावध करायला हवं होतं. तिनंही आपला स्वार्थ शेवटी साधला होता.

तू मुकाट्याने मला कबूल झाली नाहीस तर एका क्षणात तुला आणि तुझ्या आईला रस्त्यावर फेकीन. आणि त्या पशूने माझा हात धरून मला खाली पडली. माझे कपडे ओरबाडू लागला. इतक्यात माझ्या हाताला टेबल लॅम्प लागला. त्याला वाटलं मी दिवा मालवते आहे. 'दिवा घालवण्याची मुळीच जरुरी नाही. दुसरे कोणी माझ्याशिवाय येथे येणार नाही. फूल हुंगण्यापूर्वी त्याला प्रथम मी मनःसोक्त पहाणार आहे. आणि नंतर नंतर– त्यानं माझा ब्लाऊज ओढून फाडला. बाबूजी, माझ्या अंगात कोणतं अवसान आलं होतं म्हणून सांगू ? तो खाली वाकला असताना त्याच्या मनगटाला मी कडकडून चावले. त्या तिरीमिरीत त्यांनं एक शिवी हासडली. म्हणाला 'सुवर की अवलाद. इतकी मस्ती' असे म्हणत त्याने माझ्या थोबाडीत फडाफडा मारल्या. डोळ्यांपुढे काजवे चमकले. वाटलं घेरी येऊन मी पडते की काय ! आणि तसं झालं असतं तर या लांडग्यानी आयतंच माझं भक्ष केलं असतं. सुटका होण्याची आशा दिसेना ! माझ्या उशाशी असलेला टेबल लॅम्प मी उचलून त्या नराधमाच्या डोक्यात हाणला. माझा वार वर्मी लागला असावा. तो किंचाळून खाली धाड्कन आपटला. मी पदर नीट केला आणि मागील दाराची कडी काढून अंधेऱ्या जिन्यानी रस्ता गाठला. मला मृत्यूची पर्वा नव्हती. पुन्हा या नरकात न येण्याचा निश्चय करूनच घर

सोडलं. खूप थकले होते. चालवत नव्हतं. धाव घेतली त्याही अवस्थेत विश्कडे !

विश् खोलीत होता. त्याच्या गळ्यात पडून मी तर अगदी पोटभर रडले. झालेला प्रकार त्याला सांगितला. त्यानं मला आधार दिला. चांगली वागणूक दिली. कपडेलत्ते सारं दिलं. माझ्या परिस्थितीवर मायेनं पांघरूण घातलं. आणि आत्तापर्यंत आम्ही संयम पाळला होता, लक्ष्मण रेषा आखून घेतली होती. चारसहा महिन्यांनी माझी धनदौलत लग्नं झाल्यावर सर्वस्वानं मी देणारच होते. पण त्या रात्री त्याचा संयम सुटला आणि आपल्या बाहुपाशात घेत म्हणाला, 'शुभा, तुझ्यापासून दूर रहावत नाही. नाहीतरी या सुंदर संपत्तीचा धनी परीक्षा होताच मीच होणार आहे ना ? मग माझं धन आत्ताच मिळायला काय हरकत आहे ?' अंगावर रोमांच फुलविणारा 'विश्'चा स्पर्श मला हवाहवासा वाटला. आणि विलक्षण आवेगानं वेल जशी वृक्षाचा आधार घेते. तशी मी त्याच्या वक्षाचा आधार घेत त्याला जाऊन चिपकले. त्याच्या कुशीत शिरले. ते आमचं अपूर्व मीलन खिडकीतून चंद्र खटयाळपणं पहात होता, हसत होता. लांब कोठे तरी रेडिओवरचे सनईचे सुंदर स्वर ऐकू येत होते. आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या. वाटलं असंख्य दिव्यांच्या रोषणाईत सनईच्या मधुर सुरात जणू आमचा लग्न सोहळा चालला आहे. सारं वातावरण त्या रात्री आनंद उधळत होतं. तृप्त झालेला विश् म्हणाला, 'शुभा मी तुझाच आहे.' बाबूजी, ज्या ज्या वेळी विश्कडे मी पाही त्या त्या वेळी वाटे केवढी पर्सनॅलेटी आहे या माणसाला ! भरदार छाती, धारदार नाक, तेजस्वी डोळे, बलदंड खांदे इतका सामर्थ्यशाली पुरुष माझा जोडीदार सोबतीला असल्यावर कसली भीती ? त्याच्या खांद्यावर कितीतरी वेळ मान ठेवून तृप्तीचे घुटके घेई.

बाबूजी, त्या वेळी वाटलं आपल्या माणसाची कशाला तळमळ पहायची. पुन्हा एकमेकांच्या गळ्यावर हात ठेवून शपथा घेतल्या. माझ्या भांगात त्यानं स्वत: शेंदूर भरला. संशयाला तर अजीबात जागा नव्हती. आणि माझ्या भावी पतीच्या सर्वस्वानं मी अधीन झाले. वाटत होतं ही मिठी कधीच सोडू नये आणि मीलनाचा क्षण कधीच संपू नये. माझ्या डोळ्यांवर धुंदी आली होती. कैफ चढला होता. सारं माप भरभरून मी विश्च्या पद-

रात घालत होते. त्याचवेळी नियतीने माझी क्रूर थट्टा चालविली होती. ती हसत होती. म्हणत होती, ' पोरी एका पाशवी राक्षसाच्या मिठीतून सही-सलामत सुटून एका लांडग्याच्या गुहेत तू शिरलीस आणि स्वखुषीनं त्याला सर्वस्व दिलंस. माझ्याशिवाय हे कोण जाणणार आहे ?'

पंधरा दिवसानंतर त्याची परीक्षा होती. तो रात्रंदिवस अभ्यास करीत होता. आणि परीक्षा होताच तो आपल्या गावी आई–वडिलांना भेटायला निघून गेला. लग्नाचं नक्की करून येणार होता. जाताना कर्त्या पुरुषाप्रमाणे सामानसुमान आणून दिले, बँकेत खाते उघडून आपल्या नावाची रक्कम माझ्या नांवावर ट्रान्सफर केली. खोलीचे सहा महिन्याचे भाडे दिले. त्या वेळी मी चेष्टेने म्हणाले होते, ' विश्, तू माझी अशी व्यवस्था करतोस की तुला परत यायला सहा महिने लागणार आहेत. ' नकोरे बाबा उशीर लावूस, तुझ्यावाचून मी जगू शकणार नाही. ' त्यावर तो म्हणाला, ' वेडी कुठली. तुम्ही बायका म्हणजे संशयाचं आगरच ! ' तो पत्र पाठविणार होता. वडि-लांना संशय येता कामा नये म्हणून मला पत्र लिहिण्याची त्याची परवानगी नव्हती. परत येताच रजिस्टर लग्न करण्याचं आमचं ठरलं होतं. एकदा लग्नाचा शिक्का बसला की वडिलांचा राग झाला तरी तेवढ्यापुरताच. बिहारमधील कुठल्याशा गावचा फार मोठा जमीनदाराचा तो मुलगा होता. ही मंडळी चार पिढ्या तिकडे स्थायिक झाली होती. इतकंच मला माहितं होतं अधिक माहिती कधी घ्यावीशी वाटली नाही. पंधरा दिवसांचे दोन महिने, दोनाचे चार महिने झाले. विश्चा पत्ता नाही, पत्र नाही. ' वैरी न चिंती ते मन चिंती ' वाटलं आकस्मात विश्ला मृत्यूने माझ्यापासून ओढून नेलं नसेल ना ? तो माझा विश्वासघात कधीच करणार नाही. मी वाट पाहून दमले. रडून रडून डोळ्यांचं पाणी आटलं. त्याला जाऊन जाब विचारावा तर त्याचा पत्ताही माहीत नव्हता. बाबूराज, तुम्हीच सांगा जाताना सामानसुमान, पैसे, आपली खोलीसुद्धा माझ्या नावानी त्यांनी करून दिली. तिथे मी कसा अविश्वास दाखवू ?'

एक दिवस अचानक त्याचं पत्र आलं. पत्र वाचण्यापूर्वी देवाची प्रार्थना केली. आणि आनंदानं नाचले. पत्र वाचू लागले. त्यानं लिहिलं होतं. शुभा

क्षमा कर. मला तुझ्याशी लग्न करता येणार नाही. माझं लग्न झालेलं आहे. केवळ परीक्षेसाठी मी मुंबईत वर्षभर राहिलो होतो. योगायोगाने तुझी-माझी भेट झाली. माझ्या एकटेपणात तुझा सुखद सहवास होत होता. अग, एक सुंदर गुलाबाचं फूल जर अचानक हातात आलं तर त्याचा वास घेतल्याशिवाय कोण राहील. ते तूच सांग. तसंच तुझ्या बाबतीत माझं झालं. वचनाला काही अर्थ असतो का ? कोर्टात गीतेवर हात ठेवून चोर, लुटारू, दरोडेखोर, व वाईट लोक नाही का म्हणत ' देवा शपथ खरं सांगेन खोटं सांगणार नाही.' तसलाच प्रकार. मला तू हवी होतीस. तुझ्या सौंदर्यानं मी दिपलो होतो. चिखलातल्या कमळाप्रमाणे तुझं सौंदर्य कोणताही भुंगा कुरतडत तुझ्या सौंदर्याचा स्वाद घेऊन निघून गेला असता. माझ्या तारुण्याला तुझ्या सौंदर्याचं आव्हान होतं. कित्येकवेळी मी पेटून जात होतो. तरी संयम सोडला नाही.

वेडे मुली, त्या म्हाताऱ्या लांडग्याच्या तावडीतून तू पळत येऊन सर्वस्वानं आपण होऊन माझ्या आधीन झालीस. त्या वेळी तुला दूर सारणं म्हणजे माझ्या पुरुषार्थाचा अपमान करणारा मी नपुसक असला पाहिजे. लग्न करण्याचा वेडा अट्टाहास, वचन, शपथा याला काही अर्थ आहे का ? तू वेश्येची मुलगी म्हणूनच समाज तुझ्याकडे पहाणार ! मग तू कितीही सती-सावित्रीप्रमाणे वागलीस तरी वस्तुस्थिती पुसली जाणार आहे का ?

शुभा तू माझ्यावर मनापासून प्रेम करतेस हे मी जाणतो. मलाही तुझ्याबद्दल प्रेम, आस्था आहे. पण माझं प्रेम तुला साथ देणार नाही. सतत तुझी आठवण मला येत राहील. माझ्या भोवती सामाजिक बंधनं आहेत. काही कर्तव्यं आहेत, ती दूर सारता येणारी नाहीत. तू मला सर्वस्व देऊन तृप्त केलंस. त्यासाठी माझी खोली, चार-सहा महिने सहज पुरतील एवढे पैसे ठेवून थोडा फार तुझ्या ऋणाचा भार हलका केला आहे. योग्य तो जोडीदार पहा. आणि सुखी रहा. झालं गेलं विसरून जा.

– विश् –

' नरेशभय्या, पत्र वाचून दुःखाने बेभान झाले. झालं गेलं विसरून जा. कशी विसरू ? उदरात विश्चा अंकुर वाढत होता. तो पैसा, ती खोली आग लावून भस्म करून टाकावीशी वाटली. त्याने माझा सूड असा का घेतला ?

पण हे सर्व कोणाला विचारू ? माझ्या कर्माची फळं मलाच भोगली पाहि-जेत. आयुष्यात बहर एकदाच येत असतो. त्या बहराचा अनुभव मिळाला म्हणजे सर्व संकटं सहन करता येतात. मार्ग काढता येतो आणि बहर अकाली जळला की संपतो. माणूस कोलमडून पडतो, कोसळतो.

सारं आकाश माझ्या अंगावर कोसळलंय माझ्या चोहोबाजूनी वणवा पेटलाय आणि मी त्यात होरपळून गेले होते. जगण्यात अर्थ नव्हता. विश्च्या पोराला जन्म देण्याची माझी तयारी नव्हती. पुन्हा बेवारशी पोर जन्माला घालून ससेहोलपट नको होती. माझी मी राहिले नव्हते. माझं स्वप्न बेचीराख झालं होतं. माझ्या सौदर्यानें माझं आयुष्य उद्ध्वस्त केलं. त्याचा सूड उगवायचा होता मला ! मला एकदम मरायचं नव्हतं. एकदा वाटलं त्याला जाऊन जाब विचाराव। पण तो विचार सोडून दिला. त्याच्या बायकोची विटंबना मला करायची नव्हती. तिचा त्यात काही दोष नव्हता. चोर सोडून संन्याशाला सुळी देण्यातला प्रकार घडला असता. त्या विश्वासघातक्याचं तोंडही मला पहायचं नव्हतं.

माझं शिक्षण अर्धवट होतं, नोकरी मला कोण देणार ? आणि दिली तरी माझ्या सौंदर्याच्या अभिलाषेनंच ! तेव्हां माझ्या सौदर्याचा सूड म्हणजे जो अधिक दाम देईल त्याचं काम पत्करायचं. त्याला मनसोक्त भोगायला द्यायचं ! मन कधीच मरून गेलं होतं. निर्जीव कलेवर रंग रंगोटी करून मढवून ठेवणं ! एवढच शिल्लक राहिल होतं. माझ्या अतिरेकी वागण्यानं माझ्या उदरातला अकुर कधीच गळून पडला. त्या वेळी सुद्धा मला मरायचं नव्हतं. पूरा सूड उगवून झाला नव्हता. माझ्या शेजारच्या डॉक्टरांनी मला वाचवलं आणि आपली पाशवी भूक यथेच्छ भागवून आपलं बिल वसूल करून घेतलं.

राजबाबू, किती बुभूक्षित असतो हा पुरुष ? प्रेम, माया, ओलावा याची या जातीला गरज नाही ? हपापून येतात, कोल्हयासारखे तुटून पडतात, आधाश्यासारखं ओरबाडून भराभर गिळून हात झाडून पुन्हा नामानिराळे होतात. पुन्हा सभ्यतेचा बुरखा पांघरून दुसऱ्याला हसायला मोकळे. मघाशी मी सांगितलं की मी सर्वांची हौस भागवते. गंधाचा टिळा लावणारे, पगडी-वाले, पांढरी शुभ्र गांधी टोपी घालणारे, खादीधारी, तोंडातून संस्कृत श्लोक

म्हणणारे पंडित आणि इतकेच नव्हे तर त्याचबरोबर उत्तम संसार करणारे, स्वत:ला प्रतिष्ठित म्हणविणारे, मध्यमवयीन, नवजवान, तरुण, पन्नाशी उलटलेले साऱ्यांना तृप्त करून पाठविण्याचे काम ही शुभांगी करते आहे. फक्त एका वेळी एक हिरवी नोट घेऊनच ! माझ्या सौंदर्याची किंमत काय ?...

'शुभा, थांबव तुझी कहाणी !' राज जोराने ओरडला.

'राजबाबू, नुसतं ऐकून चिडलात? त्या दिवशी कायमची कहाणी खतम करायला जुहूला गेले होते तर तेथे का आडवे आलात? मला पुन्हा या नरकात का आणलीत ? बोला ?'

'शुभा, जीवावर संतापून तू केवढा आत्मक्लेश भोगतेस हे मला कळलं असते तर मी कधीच तुला या नरकात आणली नसती. शुभा, त्या दिवशी मी तुला फटाफट मारले, त्याबद्दल वाईट वाटलं. मला क्षमा कर. मला राग आला होता तो तुझ्या बोलण्याचा. तू म्हणालीस, 'कोण, तुम्ही पुरुष ! घ्या माझ्यातलं स्त्रीत्व. तुम्हाला हवं ना, घ्या ओरबाडा. आणि तृप्त करा स्वत:ला ?' शुभा, माझी तुझी ओळख, परिचय नव्हता. असं अपरिचित स्त्रीत्वं घेणारा मी पशू नाही. बाकी तुझा काय दोष ! तू तुझ्या अनुभवा-प्रमाणेच विधान केलंस. तुला मी हातावर घेतली. त्या वेळी माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले नाहीत. पण माझ्या अंत:करणात कोठेतरी मायेची स्निग्धता जाणवली एवढं मात्र खरं !'

'बाबूराज, आजपर्यंत आयुष्यात जो पुरुष आला आणि ज्याच्यावर मी विश्वास ठेवला तो विशू ! विशूनी आपली इच्छा तृप्त करून घेण्यासाठीच माझं सौंदर्य लुटलं म्हणून तुम्हाला मी तसं म्हणाले क्षमा करा मला. बाबूजी तुम्ही फार थोर आहात. आजपर्यन्त एका शब्दानं कधी माझ्याबद्दल विचा-रलं नाहीत किंवा माझ्याकडून कसलीही अपेक्षा केली नाहीत.'

'शुभा, ते ऐकून त्यावर माझं वागणं थोडच अवलंबून रहाणार होतं. अधिक दु:खच माझ्या वाट्याला आले असते. तसे न होण्यापेक्षा आपल्या हातून होईल ती मदत करायची मी ठरवलं.'

'नरेशभय्या, तुम्ही शपथ घेतली आहाताच गीताशी लग्न करण्याबद्दल ! या शपथेचा माझ्या आयुष्यातला अनुभव मी तुम्हाला सांगितला. विशने माझ्याशी लग्न केलं असतं तर मी सुद्धा सती–सावित्री झाले असते आणि

माझं ते स्वप्न होतं. माझ्या स्वप्नाचा होम केला त्या पुरुषाने ! मी एक बाईट बाई बनून स्वत:वर सूड घेणारी, धंदा मांडून बसलेली, पण मी असं कधीही म्हणणार नाही की माझ्याप्रमाणे आणखी स्त्रिया या मार्गात याव्यात अस मला वाटत नाही. पण हे काम माझं एकटीच नाही. तुमच्या-सारख्यांची मदत मला हवी आहे. कराल ना मदत मला ?'

'मी जरूर मदत करीन' नरेश म्हणाला.

'भैय्या, गीताशी तुम्ही लग्न करा. तिच आयुष्य उद्ध्वस्त करू नका. तिला रस्त्यावर फेकू नका. एवढीच मदत मला तुमची पाहिजे.'

'मी तुम्हाला तस वचन दिल आहेच.'

'नरेशभय्या, स्पष्ट बोलते म्हणून रागावू नका. पण का कोण जाणे तुमच्या शब्दावर माझा विश्वासच बसत नाही तुम्ही मला हजार रुपये दिले असते तरी मी या तुमच्या भानगडीत पडले नसते. पण राजबाबूंची आज्ञा, त्यांचा शब्द डावलण्याची माझ्यात हिंमत नाही.'

'शुभा, तुझा इतका विश्वास माझ्यावर आहे. म्हणून मला समाधान वाटलं. तुझं इतकं मोठ मन मी आतापर्यंत ओळखू शकलो नाही तुला कुलटा, वेश्या म्हणणारी स्वत: दु:चरित्र आहेत. या समाजात सती–सावित्रीचा आव आणणाऱ्या स्त्रियांपेक्षा तू हजार पटीने चांगली आहेस. मनानी मोठी आहेस.'

'राजबाबू, माझी इतकी तारीफ करू नका. माझे विचार मी बोलून दाखविले इतकंच. खरं सांगते सर्व मी तुमच्यापासून शिकले. तुमची बरो-बरी एक रेसभरही मी करू शकत नाही. जे काही चांगलं निर्माण झालंय ते तुमच्यामुळे असं मी समजते.' अस म्हणून तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.

'शुभा !'

'काय बाबूराज ?'

'काही वेळापूर्वी तू एक गोष्ट सांगत होतीस ती चेष्टेवारी मी घालवली'

'कोणती गोष्ट ?

'तू म्हणालीस ज्या तऱ्हेने मी जगते त्या नुसार दोनतीन वर्षांत माझं आयुष्य खलास होईल.'

'खरंच! बाबूराज, ते सत्य आहे. त्यात काहीही लपविण्यासारखं आणि खोटं नाही.'

'मला वाटतं तुझ्यासारखीला या जगात जागा नाही. सभ्यतेचं पांघरूण पांघरणाऱ्यांना जागा आहे. जग हे असंच आहे.' गहिवरून भावनावशेतच राज म्हणाला.

'राजबाबू, एक वचन द्याल?

'कोणतं?'

'माझी एक इच्छा आहे. मी मेल्यावर शेवटच्या क्षणी सर्व अंतिम संस्कार तुम्ही माझे करा. फक्त तुमचेच हात मला लागावेत ही इच्छा आहे.'

'शुभा, मला कळलं तर मी तुला एकटा घेऊन जाईन व तुझ्या इच्छेनुसार तुझे अंतिम संस्कार पार पाडीन. कुठल्याही ढोंगी, पापी, लालसेने हपापलेल्या माणसाला तुझे करायला देणार नाही. त्याचे हात तुला लागावेत असं मलाही वाटत नाही व कधीही वाटणार नाही.' राजेश अगदी मनापासून बोलत होता.

'तुमच्या स्पर्शानं मला अखेरची शांती मिळेल. शेवटी तरी पापी लोकांचा हात लागला नाही याचं समाधान मिळेल आणि समाधानी मरण शेवटच्या क्षणी तरी मला भोगता येईल. इच्छा एकच आहे या जन्मीच काय ते भोगायला लागू दे. आणि पुढला जन्म कोणताही आला तरी त्या जन्माला उपभोगायला मिळू दे. पुर्नजन्मावर माझा विश्वास आहे. ती माझी भावना आहे.'

'शुभा, व्यवहार, विश्वास, भावना, प्रेम, कर्तव्य ह्या सर्व आणि अशाच अनेक शब्दात, प्रत्येक ठिकाणी, थोड्या फार प्रमाणात का होईना पण फरक आहे. आणि तो आपल्याला कळत नाही. आपण त्या जाळ्यात गुरफटत जातो. अगदी कायमचे गुरफटत जातो. आणि शेवटी सर्व समजतं.

वि...४

परंतु तेव्हा काही करण्याच्याही पलीकडे गेलेलो असतो. आणि हे सर्व जगात जो पर्यन्त हे शब्द नांदणार आहेत तोपर्यंत हे असंच चालणार आहे. त्याला मरण, अंत नाही.'

'राजबाबू, हे खूप सत्य बोललात. कटू आहे तरीही सत्य आहे. हे अमान्य करता येणार नाही. निदान मी तरी करणार नाही. कारण ह्याचा अनुभव मी घेतेय.'

'शुभा, खरं खोट, सत्य असत्य हे माणूस वेळप्रसंगी सर्व विसरतो. आणि जे चांगल त्याच्या दृष्टीनी ठरत तेच तो शेवटी करत असतो. त्याला कोण काय करणार ?'

'राजबाबू, कोणी काही करू शकणार नाही व करू शकणार नाही हेच खरं आहे. प्रत्येकजण आपल्या कर्माची फळे भोगत असतोच.'

'बर ते सर्व जाऊ दे. पुन्हा बोलू आपण कधी तरी या विषयावर ! तू नरेशला केव्हा, कोणत्या वेळी, कोठे भेटायचं ते निश्चित सांग. रात्र फारच झालीय. आपलं जेवण अद्याप व्हायचंच आहे.'

'जेवण आणलेलेच आहे. ते गरम करते. तिघंही जेवू या. नरेशभय्या, तुम्ही उद्या ठीक संध्याकाळी सहा. वाजता त्या मुलीला घेऊन लेडी डॉक्टर-कडे या. हा तिचा पत्ता. मी तेथे तुमची वाट पाहीन. प्रथम मी फोनवर डॉक्टरशी याविषयात बोलणी करतेच.'

'मी आपला फार आभारी आहे. मी अगदी वेळेवर येतो.' नरेश कृतज्ञतापूर्वक म्हणाला.

शुभांगीने आत जाऊन आणलेले जेवण गरम केले. तिघंही व्यवस्थितपणे जेवली. तिघांच्या मनावर कोणत्या ना कोणत्यातरी प्रकारचं दडपण होते. जेवण होताच तिघेही खाली आले. त्या दोघांचा निरोप घेऊन नरेश निघून गेला व शुभांगीला घरी पोचवण्यासाठी राजेशनी टॅक्सी थांबवली. दोघेही टॅक्सीत बसली. टॅक्सी शुभांगीच्या घराच्या रोखाने चालू लागली.

* * *

उन्हाळ्याचे दिवस ! पावसाचं आगमन व्हायला अद्याप दहाबारा दिवस अवधी होता. वैशाखाच्या उन्हानं सारी धरणी भाजून निघाली होती ज्येष्ठातल्या काळ्या मेघांना तिने निरोप पाठविला. आकाशात ढग पुंजक्यानी जमा होऊ लागत, आणि नाहीसे होत. अंगाची आग होत होती. थकले भागलेला राजेश ऑफिसमधून नुकताच आला होता. त्याने थंडपाण्यानी अंघोळ केली त्यामुळे त्याचा थकवा जाऊन हुशारी निश्चितच त्याला वाटली होती.

प्रथम त्यानं अंघोळ केली आणि बेनिला पावडर सर्व अंगभर चोपडली. तो सुगंध खोलीभर दरवळला. युडी कोलनचा फवारा अंगावर मारला, त्याला खूप हुशारी वाटली. पांढरी स्वच्छ पॅन्ट आणि परिटघडीचा मॅनिला घालून तो कॉफी हाऊसला जाण्यास तयार झाला. गेले कित्येक दिवस त्याला कॉफी-हाऊसमध्ये जाता आल नव्हतं तो बाहेर पडणार इतक्यात नरेश दत्त म्हणून दारात उभा !

'अरे नरेश तू !' आश्चर्याने राजेशनी विचारलं.

'यस्'

'इतके दिवस कोठे बेपत्ता झाला होतास ? बाहेरगावी गेला होतास की काय ?'

'दोन आठवडे महाबळेश्वरला गेलो हातो.'

'भाग्यवान आहेस बाबा ! आम्ही मात्र येथल्या आगीत होरपळतोय. यावर्षीच्या उन्हाळ्याने रेकार्ड ब्रेक केलाय.'

'राजूभय्या, तू तयार होऊन कोठे निघालास ? काही स्पेशल अपॉईन्टमेन्ट आहे वाटतं ?'

'माझी आणि स्पेशल अपॉईन्टमेंट ? खरे खूप दिवसात कॉफी हाऊसमध्ये गेलो नाही. म्हणून कॉफी हाऊसला भेट देणार होतो.'

'हे पहा, मी चार बाटल्या थंड बीअर घेऊन आलोय. तेव्हा कॉफी हाऊसमध्ये न जाता इथेच मजा करू या.'

'ओ यस्. चालेल !'

'पंखा मात्र जरा सुरू कर. अगदी पाचवर रेग्युलेटर ठेव.'

'अरे दोस्ता, अगदी पंखा फुल ठेवती. पण या गरमीत त्याचा वाराही शेवटी गरमच लागतीय.'

'बीरचे चार घोट घेतलेस की गरमी आपोआप कमी होईल.' नरेश म्हणाला.

राजेशनी बीरचे मग बाहेर काढलेले पाहून नरेश म्हणाला,

'अरे बाबा, ग्लासची मुळीच जरुरी नाही. फ्रीजमधून काढल्या तो सरळ इथे आलोय. अगदी थंड आहे.'

'ठीक आहे. मग बाटल्या खोल बघू.'

बाटल्या खोलून दोघांनी भराभर घुटके घेतले.

'किती दिवसांनी भेटतोयस, मला वाटतं तीन-चार महिने तरी झाले असावेत. आणि आलास तो मस्त थंड बीर घेऊन. काय म्हणावं तुला ?' राज हसत म्हणाला.

'जीवन हे असं आहे. राजूभय्या, आहे तो क्षण आपला आहे असं समजून तो क्षण आनंदात घालवायचा.'

'बरं, काय म्हणते तुझी प्रेमदेवता ? तिचं नाव तर मी नेहमीच विसरतो. दोन अक्षरी नाव आहे एवढंच फक्त मला आठवतं ?'

'गीता'

'त्या दिवशी शुभांगीबरोबर तुम्ही लेडी डॉक्टरकडे गेला होतात का ?'

'शुभामुळे कोणतीही अडचण न पडता सर्व व्यवस्थित आणि कमी खर्चात निभावलं. शुभानी तुला सर्व सांगितलं नाही का ?'

'शुभाला मी क्वचितच भेटतो. त्या दिवसानंतर ती मला व्यवस्थित, खूप वेळ अशी भेटलीच नाही. आणि नरेश, तुला माहीतच आहे की, शुभा माझ्या जीवनातला एक वेगळाच भाग आहे. तिची भेट म्हणजे मन:शांती आणि विसावा बस्स एवढंच !'

'हे मात्र खरं आहे. तिच्याशुभामुळे मी केवढ्या संकटातून पार पडलो. त्याचं श्रेय तिच्या एवढेच तुलाही आहे.'

'मला कारे बाबा ? धडपडणारी शुभा आणि श्रेय मात्र मला हे कसं काय ?'

'तुझ्या शब्दासाठी तिने ही जबाबदारी अंगावर घेतली. तसं तिने त्याच दिवशी नाही का सांगितलं ?' नरेश म्हणाला.

'बरं ते जाऊ दे. गीताची प्रकृती कशी आहे ?'

'उत्तम, ठणठणीत आहे. तिला काय झालाय ?' काहीशा उपरोधाने नरेश म्हणाला.

'तुझा बोलण्यातला सूर काही ठीक वाटत नाही.'

'सर्व ठीकच आहे.'

'तुझी भाषा मला समजत नाही. नीट काय ते सांग. तिला भेटतोस की नाही ?' राजेशनी त्याच्याकडे रोखून पहात विचारलं.

'भेटतो ना ?'

'मग गडबड काय आहे. मोकळ्या मनानी बोलायला काय घेशील ?'

'राजूभय्या, काय सांगू तुला. या मुलीने माझी बेअब्रू करण्याचा जणू चंगच बांधलाय' संतापाने नरेश म्हणाला.

'गीताने तुला बदनाम करावं हे आश्चर्य आहे.'

'तिने ही गोष्ट आपल्या आईबापांना सांगितली.'

'सांगितली की लपवू शकली नाही ?'

'अरे लपविण्याचा प्रश्नच नव्हता. अगदी वेळेवर तुझ्या आणि शुभामुळे ती कोणालाही कळण्यापूर्वी मोकळी झाली होती. सारं व्यवस्थितपणे पार पडलं होतं. पण गीताने आजूबाजूला सर्वांना सांगितलं.'

'तुझी बदनामी आणि निंदा करून तिची प्रशंसा होईल ?' राजेशनी समजून घेण्याच्या उद्देशानं विचारलं.

'ती मुलगीच तशी नालायक आहे'

'काय म्हणालास ?'

'तिच्या पहिल्या भेटीतच मला कळून चुकलं होतं की हे काम साधसुधं नाही. चांगली बनेल आहे. एक नंबरची उडाणटप्पू आहे ती !'

'ती उडाणटप्पू होती. मग इतका पुढे तु कसा गेलास ?'

'अरे, तिने लग्नाच्या आधीच माझ्यामागे भुणभुण लावली होती. स्वतंत्र घर करा, आईवडिलांना दूर ठेवा.'

'हे काही कारण फार मोठं नाही. प्रत्येक मुलीला आपलं स्वतंत्र घर असावंसं वाटणं स्वाभाविकच आहे. तिने अशी इच्छा केल्यास त्यात चूक ती काय ?'

'विश्वास ठेव राजूभय्या, ती मुलगीच आयला चांगल्या वर्तणुकीची नाही. मला तिनं फसवलं. अरे तिचा बाप साधा कारकुंडा आहे तीनशे रुपये महिना मिळवतोय आणि आणखीन् सहा पोरींचं पाठीमागे लटांबर हिचं लग्न तो कसा करील ? त्यानं आपल्या तरुण मुलीला स्वातंत्र्य दिलंय तुझा नवरा तू शोध किंवा प्रेम करीत त्याच्याबरोबर फिरत रहा.'

'हे ठीक आहे. पण हे काम एक मुलगी कशी करू शकेल ? तिच्या जोडीला एका मुलाचीही साथ आहे ना ?'

'तू काही म्हण पण तिची फॅमिली चांगली नाही. तेथे माझी इतकी बेअब्रू झाल्यावरही मी गीताशी लग्न करावे असं मला वाटत नाही.'

'तुझी गोष्ट समजण्यास मीच असमर्थ आहे' राजेशला आपला राग आवरणं कठीण झालं होतं. पण पुढे तोच समजुतीने म्हणाला, 'घटकाभर गृहीत धरून चालू की तुझी बेअब्रू झाली. पण ते मूल तुझं नव्हे का ?'

'कोण जाणे ?' नरेश धिटाईने म्हणाला.

'त्याचदिवशी याच खोलीत शुभासमोर तूच कबूल केलंस आणि आज म्हणतोस कोण जाणे ?'

'त्या मुलीने मला पेचात अडकून माझी गळचेपी केली होती. मला फास लावला होता. मला जाळ्यात पकडलं होतं. मी याबाबतीत अननुभवी असलेला मुलगा फार घाबरलो होतो. म्हणून नाइलाजाने कबूल करावंच लागलं. मूल माझं म्हणावंच लागलं'

'चारपाच महिन्यांनंतर तू अनुभवी झालास ? माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील ? बेअब्रू तुझी झाली आणि त्या गीताची नाही ? काय झालं असेल, काय होईल तिचं याचा विचार केलास ? ती अशी का वागली याचा विचार केलास ?'

'मी तिचा विचार का करावा ? पडेल ती दुसऱ्या कुणाच्यातरी गळ्यात आणि करेल लग्न !' नरेशनी बेपर्वाईने सांगितले.

'आणि तू ?'

'माझ्यावर तिची कोणतीही जबाबदारी नाही.'

'याचा अर्थ सरळ आहे. गीताला तू भेटत नाहीस.'

'मी तिला भेटणं आता शक्य नाही. मला तिचं तोंडही पहायचं नाही.'

'त्या मुलीचं जीवन अशक्य होऊन बसलं असेल. अनेक विपरीत अर्थानं लोक बोलत असतील. तिच्याकडे बोटं दाखवत असतील.' राजेश दुःखाने म्हणाला, आणि त्याच्या डोळ्यासमोर शुभांगी उभी राहिली.

'ते व्हायलाच पाहिजे' नरेश बेफिकिरीने म्हणाला.

'ही गोष्ट सर्वांना माहीत झाली तर गीताचे लग्न होणं किती कठीण होईल, आज असलेल्या तिच्या मित्र-मैत्रिणीसुद्धा तिचे शत्रू बनतील. काही माणसं असल्या संधीची वाटच पहातात.'

'अरे बाबा, एकच काय दहावीस शत्रू तिला आहेत.'

'मला एक गोष्ट सांग, तुझ्या व्यतिरिक्त गीताचे आणखीन गुप्त संबंध कोणाशी होते काय ? आणि जर तुला माहीत होतं तर तू इतका का गाफील राहिलास ? आणि तसं नसेल तर तिला बदनाम करण्याचं, तिच्या आयुष्याशी खेळण्याचं तुला कारणच काय ? गीताशी लग्न करून सुखाने संसार करावास असं मला तरी वाटतं. कोणताही दोष नसताना तिचं आयुष्य बरबाद करू नकोस.' राजेशनी अखेरचा प्रयत्न केला.

'ती विष खाऊन मरू दे नाहीतर धंदा उघडून बसू दे. मला आता तिच्याशी काहीही कर्तव्य नाही.'

'पण तू तिच्याशी लग्न करणार नाहीस असंच ना ?'

'राजूभय्या, तू इतका विचारी असून, आपल्या बाबतीत काय घडलंय आठवतं ना ? असल्या गोष्टी तू बोलाव्यास ? जी मुलगी लग्नापूर्वी माझ्या बरोबर फिरू शकते, माझ्या मुलाची आई होऊ शकते, तिचा विश्वास कोण कसा देईल ?'

राजेशला त्याचं मूर्खपणाचं विधान ऐकून इतका संताप आला होता की आजवर असा संताप त्याच्याबाबतीत कधीच आला नव्हता. क्षणभर मनात आलं की हातातली बीरची भरलेली बाटलीच त्याच्या टाळक्यात हाणावी. परंतु त्यानं स्वतःला आवरलं. त्याला गीताबद्दल इतकी सहानुभूती वाटण्याचं खरं तर काहीच कारण नव्हतं. इतकंच नव्हे तर त्यानं गीताला

पाहिलंही नव्हतं. एका स्त्रीची विटंबना हेच एक कारण होतं. त्यानं थोडा-वेळ विचार केला आणि आलेला राग आवरला. किती प्रयत्न केला तरी नरेशला आपण समजावण्यास असमर्थ, अपुरे आहोत. तेव्हा त्यानं तो विषय तिथेच सोडून नरेशकडे पहात विचारलं,

'महाबळेश्वरला ज्या मुलीशी तुझी भेट झाली ती गीतापेक्षा सुंदर आहे का ?'

नरेश खुषीत येऊन नीट बसत म्हणाला,

'कितीतरी पटीने !'

सहजपणे फारसा प्रयत्न न करता नरेशच्या मुखातून खरी गोष्ट बाहेर पडली. त्याच्या उत्तरानी राजेश रागावला नाही. स्वतःला शक्यतो आवरून तो म्हणाला,

'जी मुलगी स्वतंत्रपणी महाबळेश्वरला मजेसाठी जाते तिचे आईबाप खूप श्रीमंत असतील नाही ?'

'हो अरे ती एका उद्योगपतीची मुलगी आहे. तिच्या बापाचा मोठा कारखाना आहे आणखीनही काही धंदे आहेत.'

'तिला बहीण–भाऊ ?'

'एक बहीण आहे, तिचं लग्न झालाय. अमेरिकेला असते. आणि भाऊ वडिलाबरोबर काम पहातो. तीन मोटारी आहेत. हीच शेवटची कन्यका अगदी लाडूबाई आहे' नरेशनी माहिती दिली.

'मग बरं झाल नाही, तू गीताला लाथ मारलीस ते ! तिच्या बापाकडून तुला एकदोन हजार सुद्धा मिळाले नसते.'

'बरोबर बोललास राजूभय्या !' आता नरेशमधील वीर बोलू लागली होती.

'नाव तरी सांग त्या सुंदर मुलीच ?'

'उर्मिला !'

'चल तुझ्या नव्या मैत्रिणीच्या नावाने चीअर्स करू या' आणि त्या दोघांनी दोन्ही बाटल्या तोंडाला लावल्या.

* * *

नरेश निघून गेल्यावर त्या रात्री राजेशला झोप आली नाही. त्याच्या संसाराचं शीड कधीच फाटून चिंध्या झाल्या होत्या. प्रवाहाबरोबर वाहात जाणं आणि प्रचंड भोवऱ्यात सापडून बुडून जाणं त्याच्या रक्तात नव्हतं. तो कूस सारखी बदलत होता. मध्यरात्रीची वेळ. रातकिडयांच्या आवाजा-व्यतिरिक्त सारा परिसर शांत होता. डोळयासमोर न पाहिलेली गीता उभी राहिली होती. ती खालच्या मानेनी राजेशला बोलावत होती. जिचे आयुष्य नरेशनी बरबाद केलं होतं आणि मोठया बेफिकिरीनें ती कशी दोषी आहे. हे तो सांगत होता. त्याचं तोंडसुद्धा पाहू नयेसं राजेशला वाटत होतं पण तेवढयानं प्रश्न संपणारा नव्हता.

काही वर्षांपूर्वी राजेशनी एका मुलीवर जीवापाड प्रेम केलं होतं. संसाराचं सुरेख, रम्य चित्र रंगवलं होतं. अनेक स्वप्न पाहिली होती पण ती त्याची पत्नी झाली नाही. तिनं त्याला दगा दिला होता, फसवलं होतं, त्यामुळे जगा-तली स्त्रीजात फसवी, विश्वासघातकी, नालायक असाच शेरा तो स्त्रीजातीला मारत असे. पण वाढत्या वयाबरोबर त्याचे विचार बदलत होते. एक मुलगी जगातल्या सर्वच मुली होऊ शकत नाहीत. असं अलीकडे त्याला गीता–शुभांगीवरून वाटू लागलं होतं आणि आज त्यानं दुसरी बाजू पाहिली होती. नरेश पुरुष होता. त्याची बेअब्रू, निंदा एका मुलीमुळे होत होती. म्हणून त्यानं बेफिकिरी दाखवली. दुसरी मुलगी शोधली. मग गीतानं काय करावं? तिचं आयुष्य बरबाद होण्याची वेळ आलीय त्याचे काय?

सारे प्रश्न जाळयात अडकले होते. प्रश्न सुटण्याऐवजी जास्तच जाळयात गुरफटले जात होते. आणि त्या गुंतागुंतीच्या विचारानेच राजेशचा पहाटेला डोळा लागला व तो निद्रिस्त झाला.

* * *

संध्याकाळचे मातट रंगाचे आकाश विटके दिसत होते. रोरावत येणाऱ्या धुक्यात ते कधीच बुडाले होते. दिवस–रात्रीचे पापुद्रे आयुष्यावरून पुढे सरकत होते. राजेश केव्हाचा आरामखुर्चीवर बसून एकसारखी सिगरेट ओढत बसला होता. समोर व्हिस्कीचा ग्लास भरलेला होता. मनाचा गाभारा विस्मृ-

तीच्या डोहात बुडविण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण कधीही न पाहिलेली 'गीता' अस्पष्ट त्याच्या डोळ्यांपुढून हलेचना. अंधार पडला तरी उठून दिवा लावावा असं वाटेना इतक्यात अर्धवट लावलेलं दार धाडकन् उघडून नरेश आत आला. त्याचा चेहरा घाबरलेला दिसत होता. त्याच्या चेहऱ्याकडे पहात राज म्हणाला,

'काय झालं, तू इतका घाबरलास का ?'

नरेश अस्वस्थ होता. उत्तर देण्यास काचकूच करत होता. पुन: पुन्हा राजनी त्याला विचारलं होतं. तरीही तो गप्पच होता.

'मागच्या वेळी तू येथे आलास तेव्हा म्हणालास मी महाबळेश्वरला एक मुलगी पाहिली. तिची गाठ-भेट झाली. दोघेजण एकमेकांच्या प्रेमात पडलात. नावही मागितलं होतंस पण मी नेहमीच्या सवयीप्रमाणे विसरलो. काय नाव तिचं ?'

'उर्मिला !'

'उर्मिला श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी आहे. तिचं तुझ्यावर प्रेम आहे. तुम्ही दोघं लग्न करणार आहात असं तू काहीतरी म्हणाला होतास ना ?'

'बाकी सर्व माहिती आठवणीने बरोबर सांगितलीस. फक्त ती एकटीचं मुलगी नाही. त्या दोघी बहिणी व एक भाऊ !'

'माफ कर विसरलो मी !'

'ते सारं खरंय राजूभय्या पण ..'

'मग अडचण कसली ? तुमचं दोघांचं भांडण झालयं का ?'

'भांडण वगैरे काही नाही.'

'मग काय ?'

'राजेशभय्या, तिच्या बापाला सर्व कळलंय'

'मग तुला घाबरण्याचं काय कारण ? या गोष्टी लपून थोड्याच राहातात. बरंच झालं त्यांना समजलं ते ! पुढील गोष्टी ठरविणं सोयीच होईल.'

'अरे, पण त्यांना चुकीच्या मार्गांनी समजलाय !'

'ते कसं काय ?'

'उर्मिलाच्या भावाने आम्ही दोघं पॅरिशिअन डेरीत एकदा बसलो असताना पाहिलं. आणि घरी जाऊन त्याने नुसतं थैमान केलं. तो साला उगीच जळतो माझ्यावर बेअक्कल कुठला. स्वत: तसाच आहे नालायक. उर्मिलावर उघड उघड खोटे आरोप केले. नात्यागोत्याच्या आणि आजूबाजूच्या लोकांना पदरची मीठमिरची लावून वाटेल ते सांगत सुटलाय' नरेशनी तक्रार नोंदवली.

'या गोष्टी होणारच. किती दिवस तिला चोरून, लपून भेटणार आहेस तूं! रेस्टॉरंट, हॉटेलस्, सिनेमागृह, समुद्र किनारा ही सारी सार्वजनिक ठिकाणे आहेत. कोणीना कोणी, केव्हा ना केव्हातरी ओळखीचे भेटणारच!'

'या गोष्टीचं वाईट वाटत नाही. राजूभय्या, वाईट वाटतं ते दुसऱ्या गोष्टीचं. त्याने माझ्याबद्दल खोटा वाटेल तो अपप्रचार चालवलाय.'

'तिचा भाऊ आणि तिच्याकडील इतर लोक तुला ओळखतात?'

'हो ऊर्मिलाशी आमचं खूप खूप दूरचं नातं आहे हे मला आमच्या बोलण्यातून समजले.'

'ओहो! आता लक्षात आले' राजेश हसू लागला.

'हसतोत काय राजूभय्या! आणि लक्षात काय आलं?'

'अरे गीता तुझ्या शेजारीच राहाते. आणि उर्मिला तुझी नातेवाईक आहे ना? मग लग्नाला अडचण कसली? एक कुटुंब दुसऱ्या कुटुंबाला ओळखते आहेच. जात–पात, श्रीमंत–गरीब हा वादाचा प्रश्नच संपला.!'

'काही झालं तरी आमचं लग्न ती लोकं होऊ देणार नाहीत. त्यांना माझे स्थळ पसंत नाही आणि आम्हा दोन्ही कुटुंबात जुनं वैर आहे.'

'एवढच ना? आणखीन् काही निराळं नाही ना? केवळ या कारणामुळेच तुझ्याशी लग्न करण्याची परवानगी देणार नाहीत की तुझं शिक्षण कमी झालाय, आणि नोकरीच्या ठिकाणी पगार कमी म्हणून परवानगी देणार नाहीत' राजेशनी संकोच न करता सरळ सरळ प्रश्न केला होता.

मान खाली घालून नरेशनी 'ही कारणं नाहीत' असं सांगितलं पण त्याला राजेशचा नेम बरोबर लागला होता. जे सत्य होतं तेच नेमकं राजेशनी विचारलं होतं.

पाच–दहा मिनिटं खोलीत निस्तब्धता होती. राजेशनी त्याला विचारलं,

'मी तुला कोणती मदत करू शकतो का ?'

'तुझी परवानगी असेल तर मी उर्मिलाला येथेच तुझ्या खोलीवर भेटत जाईन.'

'येथे ? ही तर चाळ आहे. येथे कशी गुप्तता राहणार ? येथला सर्व कारभार चव्हाटयावर येणारच !' आणि राजेश विचार करू लागला.

'कसला विचार करतोस ?'

'तू उर्मिलेची भेट इथे घेऊ इच्छितोस ?'

'हो अर्थात् तुझी परमिशन असल्यास !'

'घेऊन ये तिला'

नरेशनी त्याचा हात दाबून त्याचे आभार मानले व म्हणाला,

'तुझ्या खोलीची एक किल्ली मला दे. आणि विश्वास ठेव येथील एकही वस्तू हालणार नाही.'

'अरे वस्तू गेली–राहिली त्याची मला मुळीच फिकीर नाही. माझ्याजवळ आहेच काय ? ही बिन कल्हईची दोन–चार भांडी, तो रद्दीचा ढीग, बाटल्या आणि पुस्तके पण नरेश, कुलपाची किल्ली मात्र एकच आहे.'

'तू त्याची काळजी करू नकोस. मी नवंच कुलूप आणतो म्हणजे अनायासे दोन चाव्या मिळतील'

राजेशच्या मनात विचार आला,– मनुष्य किती स्वार्थी असतो आपला स्वार्थ साधावयाचा असला की किती उदार होतो. तसा विचार केला तर दीडदोन रुपयात याच कुलपाची दुसरी चावी बनविता आली असती पण त्याऐवजी आठदहा रुपये सुद्धा नरेश खर्च करायला तयार झालाय– मनातील विचारांना गती मिळाली आणि त्याचवेळी त्याच्या समोर नडलेली, असहाय गीता आणि शुभांगी उभ्या राहिल्या. त्याचवेळी तो सावध झाला. आपण कुठेतरी चुकतोय असा भास झाला.

'राजूभय्या, तुझ्या शेजारच्या लोकांना सांगून ठेव. नाहीतर कोणीतरी गैरसमज करून घेऊन खोलीत आम्ही असतांना पोलिसात वर्दी द्यायचा.'

'ठीक आहे. मी सांगेन त्यांना ! त्याची तुला काळजी नको. पण शक्यतो दुसऱ्या चावीची गरजच भासणार नाही. कारण एक लक्षात ठेव ज्यावेळी

मी घरात असेन त्यावेळी शक्यतो तू उर्मिलेला येथे घेऊन येत जा आणि तेच योग्य आहे. माझ्या गैरहजेरीत तिला येथे आणण्यास माझी परवानगी नाही ' राजेशनी निक्षून बजावलं.

' वा ! भय्या, याला काय अर्थ आहे ? आणि मग दोन चाव्या कशाला ?'

' अर्थ असो वा नसो. मी सांगतो हेच खरं ! दोन चाव्या केवळ अगदीच गरज भासली तरच वापर करण्यासाठी जवळ ठेवावयाच्या.'

' मी समजलो नाही तुझ्या म्हणण्याचा अर्थ !'

' मला हेच तर मोठं संकट पडलयं मी हे जाणतो की, तुम्ही दोघं गप्पा मारण्यासाठी भेटणार, दोन प्रेमिकांच्या गोष्टी, संसाराची नव नवीन स्वप्नं रंगविणं, हनिमूनचे बेत अशा अनेक गोष्टी असतात गप्पात. ही कल्पना आहे मला परन्तु आणखीनच् एका निराळ्या गोष्टीची काळजी वाटते मला.'

' कोणत्या गोष्टीची ?'

' शुभा फार दिवसात भेटली नाही. '

' मी समजलो नाही तुझ्या म्हणण्याचा अर्थ !'

' काही गोष्टी समजल्या जात नाहीत. पण त्या समजावणं भाग पडतं. नरेश, सांसारिक गोष्टीत मला मुळीच इंटरेस्ट नाही. परंतु माझ्यावर मानसिक ताण पडणारा कोणताही भार मला सहन होणार नाही '

' तरीही मी मुळीच समजलो नाही तुझ्या म्हणण्याचा अर्थ. '

' पुन्हा सांगतो एक, तू कर्म करावस आणि ते मी निस्तरावं हे मला जमणार नाही. माझी खोली तुम्हा दोघांच्या भेटीचं ठिकाण होता कामा नये. आणि ते मला मुळीच पसंत नाही. उर्मिला आणि तू येथे भेटावेस आणि एक दिवस तुम्ही विचारावं एखाद्या लेडी डॉक्टराची ओळख आहे का ? पुन्हा तीच मागील पुनरावृत्ती होऊ नये. '

' राजूभय्या, तू मला लाजवतोस. असला प्रकार होणार नाही. मी उर्मिलेशी लग्न करणार आहे. '

' मग तर ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. '

' लग्न करणं वाईट गोष्ट ?' नरेशनी आश्चर्याने विचारलं.

' जर लग्न करण्याचं निश्चित तुझ्या मनात आहे तर लपून छपून

भेटण्याचं प्रयोजनच काय ? स्वतंत्रपणी; राजरोसपणे तुम्ही हिंडू शकता नाही का ?'

'माझ्यावर विश्वास ठेव. वाटलं तर माझ्याकडून शपथ घे.'

'शपथ आणि तुझ्याकडून ? शुभालो सुद्धा तू गीताशी लग्न करण्याबद्दल याचजागी शपथ दिलेली आठवते ? काय झालं त्या शपथेचे ?'

'राजूभय्या, ते सर्व विसरून जा. यावेळी मी शब्द देतो. आम्ही दोघं जबाबदारी ओळखून वागू. सावध राहू. काळजी घेऊ. बस्स आणखीन काय करू ?'

'वरील गोष्टी निश्चयाने पाळणार आहात मग माझी संपूर्ण खोली तिची किल्ली तुझ्या ताब्यात रे कशाला ? मी असतांना तुम्ही दोघं गप्पा मारू शकत नाही ?'

'अरे बाबा, आम्ही दोघं बाहेर भेटलो तर कोणीना कोणी पाहील म्हणून म्हणतोय'

'हं ! हे बरोबर पण हे सांग की तुझ्या मनात आलंच कसं ? माझी जागा म्हणजे मिटिंग प्लेस किंवा कुटनखाना समजलास ?'

'राजूभय्या, निष्कारण गैरसमज करून अर्थ काढतोस. मी इतकंच समजलो की शुभांगीसारखी मुलगी रात्री-अपरात्री जर येथे येते तर मग...'

'नरेश, शुभांगी अनीतिमान स्त्री आणि अनीतिमान मी पुरुष ! पण तू हे विसरतोस शुभांगी एक नाही तर डझनभर स्त्री डॉक्टरला ओळखते. तुझी प्रेमिका कोणत्या स्त्री डॉक्टराला ओळखते ? अंगात निस्तरण्याची कुवत असल्यास एकच नव्हे तर दहा पोरींना घेऊन नंगानाच घाल. मला माहीत आहे एक तरुण मुलगा आणि तरुण मुलगी स्वतंत्र खोलीत ज्ञानेश्वरी, गीता, रामायण नाही वाचत बसणार ! अरे, महाभारत घडेल समजलास ?'

'राजूभय्या, किती गंमत करतोस ?'

'गंमत नाही. सत्य परिस्थिती सांगतोय. बरं ते जाऊ दे. नवीन कुलूप घेऊन ये. एक किल्ली मला दे.'

'मेनी मेनी थँक्स'

'आभार मानण्याची मुळीच गरज नाही. एक सांग गीताची काय बातमी ?' राजनी विषय बदलला.

नरेश एकदम चमकला आणि चाचरत म्हणाला,

'ती ती ठीक आहे'

'काय झालं होतं तिला ? आजारी होती ?'

'अरे माझी बदनामी करत हिंडत होती आणि आता अशी जिरवली तिची !'

'काय झालं ?'

'एका ठिकाणी तिचं लग्न ठरत आलं होतं. मी त्या मुलाला आणि त्याच्या नातेवाइकांना सांगितलं. ती वाईट चालीची आहे. नुकतचं पोटचं मूल पाडलन' ताठ मानेनं नरेश म्हणाला.

अवाक् होत राजेश नरेशकडे पहातच म्हणाला,

'काय ? असं तू तू सांगितलंस ?'

'होय. त्या हडळीचं कसं लग्न होतंय, कोण हे सर्व ऐकून तिला पदरात घेतोय् हेच मला पहायचय. ठरलं की तिच लग्न मी मोडणार आहे.'

राजेशला क्षणभर वाटलं त्याच्या वळवळणाऱ्या जिभेचे तुकडे तुकडे करावेत. पण तो विचारी होता. मनात म्हणाला, 'गीताचा विवाह जरूर जरूर होईल.'

'राजूभय्या, जोपर्यन्त मी गीताच्या आसपास राहीन तोपर्यंन्त तिचं लग्न कधीच होऊं देणार नाही.' मिशी नसलेल्या ओठावर हाताने आविर्भाव करत म्हणाला.

'नरेश, मला कधीही तुझ्याबद्दल शका आली नाही की, असली दुष्ट विचारसरणी तुझी असेल. असलं दुष्ट कर्म तू करशील. मला हे समजत नाही की त्या मुलीचा अपराध कोणता ? तिनं तुझ्यावर विश्वास ठेवून तुझी लालसा तृप्त केली, तुझी शय्या केली म्हणून तू तिला हं प्रायश्चित्त देतोस ?'

'कोण म्हणतो माझी एकट्याची शय्या तिने केली ? तिला सवयच आहे. आणखी कितीतरी जणांबराबर ती झोपली असेल देव जाणे !'

'तुझ्याजवळून ती झोपण्याबद्दल पैसे घेत होती ?'

'पैसे ?'

' अरे वेश्या पैसे घेते. ही तर घरंदाज मुलगी. मनात आणलं तर शेकडो रुपये मिळवील.'

' माझ्याजवळ तिने कधीही पैसे मागितले नाहीत.'

' कदाचित् तू सर्वात सुंदर आहेस म्हणून तू तिला जास्त आवडत असावास. तुला ती फ्री सर्व्हिस देत असेल. आणि दुसरीकडून दामदुप्पट वसूल करत असेल.' राजेश हसत म्हणाला.

' तिला मी आवडत होतो आणि म्हणून ती माझ्याजवळ येत होती हे मात्र खरं जाऊ देत या गोष्टी. ती हमू दे नाही तर रडू दे.'

' उर्मिलाची तपासणी लेडी डॉक्टरकडून करून घेतलीस की नाही ?'

' ती कशासाठी ?'

' कारण उर्मिलाच्याबाबतीत गीतासारखाच संशय आला तर ?'

' राजूभय्या, तू अगदीच कमाल करतोस, मी तिला ओळखतो.'

' तू गीताशी एवढे वैर का धरतोस ? तिचे लग्न का जमू देत नाहीस ?'

' कारण ती माझ्या लग्नात बिब्बा घालेल. उर्मिलाचे मन फिरवेल याबद्दल माझी खात्री आहे.'

' उर्मिलाशी चालू असलेलं प्रकरण तिला माहीत आहे ?'

' नाही. म्हणून तर जपून आहे लग्नानतर समजलं तर पहाता येईल. अच्छा भय्या प्रोग्रॅम ठरला ' नरेश खुर्चीवरून उठत म्हणाला.

' कसला प्रोग्रॅम ?'

' नवीन कुलूप आणि दोन किल्ल्या ?'

' जा पळ. आणि आत्ताच खरेदी करून टाक '

नरेश कुलपाची खरेदी करण्यास निघून गेला.

* * *

नरेश आणि उर्मिला राजेशच्या खोलीवर एकमेकांना भेटत असत, वर्ष-दीडवर्ष झाले उर्मिलाच्या आई-वडिलांना हे लग्न मुळीच पसंत नव्हतं. उर्मिला फार हट्टी मुलगी होती. तिने आपल्या घरी सर्वांना सांगून टाकलं होतं की, लग्न करीन तर नरेशबरोबरच करीन. तो डिग्रीधारी नाही, श्रीमंत

नाही, हे माहीत असूनही मी त्याच्यावर प्रेम करते. स्वत:चं नशीब, स्वत:चं भाग्य आम्हाला शोधू द्या. दुसऱ्या कोणत्याही मुलाबरोबर अट्टाहासानी लग्न लावण्याचा प्रयत्न केलात तर मी आत्महत्या करीन.

प्रथम आई–वडील–भाऊ साऱ्यांनी तिला समजावलं होतं. तिच्यावर लक्ष ठेवलं, बंधनं घातली. परंतु सर्व पालथ्या घड्यावर पाणी. अनेक प्रकारच्या युक्त्या योजून ती नरेशला भेटत असे. एक–दोन मैत्रिणींना आपलं गुपित सांगून त्यांचा उपयोग करून घेई. मैत्रिणीकडे जाते म्हणून सांगून नरेशबरोबर राजेशच्या खोलीवर येई आणि घरी जाताना एखादी मैत्रीण-बरोबर घेऊन जाई.

पण एकना एक दिवस या गोष्टीचा निकाल लावायला हवाच होता. आणि राजेशची मदत घेणं आवश्यक होतं. एक दिवस तिघंही खोलीत बसून उर्मिलाच्या आई–वडिलांना कस भेटावं, त्यांची समजूत कशी काय घालावी याचा विचार करू लागले. राजेशनी हे काम कुणालाही न दुखविता, सर्व व्यवस्थितपणे पार पाडण्याबद्दल आश्वासन दिले व उर्मिला–नरेश निर्धास्त झाले.

शेवटी राजेशच्या भेटीने उर्मिलाच्या आई–वडिलांनी नाखुषीने का होईना पण परवानगी दिली. राजेशला आनंद झाला.

* * *

पहाटेपासून घरात केवढी गडबड उडाली होती. लग्नघरी सनईवर सुरेल संगीत चालू होतं, फुलापानांनी मांडव सजला होता, दिव्यांच्या रोषणाईने सारं वातावरण मंगल आणि पवित्र, उत्साही झालं होतं. शास्त्रोक्त विधी चालले होते. नरेशचे मित्र आजूबाजूला इकडून तिकडे ये–जा करीत होते. लग्नघटिका जवळ आली. आमंत्रित मंडळी नटून थटून जमली होती. नरेशनी लांब रेशमी कोट, तुमान आणि फेटा बांधला होता. त्या ड्रेसमध्ये तो तर अधिकच देखणा दिसत होता. मोठ्याच्या घरचं लग्न ! फार थाटा-

बि...५ ·

माटाने सर्व विधी होत होते. त्यातून उर्मिलाची आई अत्यंत हौशी ! लाडक्या लेकीच लग्न, सारं हौसेनी, सढळ हाताने करत होती. आल्या-गेल्या बायका नवऱ्या मुलाच्याकडील देण्याघेण्याची चौकशी करू लागल्या की आईला त्या गोष्टी सावरताना पुरेसे होई व मनातून वाईटसुद्धा वाटत असे.

या सर्व घाईत नरेशच्या लक्षात आलं, राजूभय्या एकदाही दिसला नाही. जेवणाच्या वेळीही तो दिसला नाही ! रिसेप्शनच्या वेळी इतकी मंडळी जमली होती; त्याचा मित्र-परिवार अवती-भोवती नाचत होता, उर्मिलाच्या मैत्रिणी आजूबाजूला होत्याच पण राज मात्र कुठेच नव्हता. एवढ्या आनंदाच्या सोहळ्यात राजेश असू नये याचं त्याला खूप वाईट वाटलं. त्याच्या चेहेऱ्यावर एक प्रकारची काळजीची छटा आली. त्याचे डोळे गर्दीत राजेशचा शोध घेत होते. सर्व पुढाकार घेऊन हा सुंदर योग जुळवून आणणारा राजेश ऐन आनंदाच्यावेळी गेला कोठे ? नरेश अगदी बेचैन झाला होता त्याला राजेशची अनुपस्थिती फारच जाणवली.

नातेवाईक, मित्र-मंडळीनी त्याचं भरपूर अभिनंदन केलं, पण ज्याच्याकडून अभिनदन करून घेण्यास तो उत्सुक होता, तो राजेश मात्र त्याला दिसत नव्हता. त्याला फार दुःख झालं. डोळे ताणून गर्दीत तो राजचा शोध घेत होता. मोठ्या घरचं, लाडक्या एका लेकीचं लग्नं थाटात न होईल तरच नवल ! धूमधडाक्यानं वरात निघाली. दारूची भूसनाळी, फुलझाडे, आकाशबाण यांनी बॅण्डच्या वाद्यात, सारा आसमंत धुंद होऊन गेला. नटून-थटून शालूचे पदर सावरणाऱ्या बायका, उंची सुटाबुटातले पुरुष यांची मिरवणूक सुरू झाली फुलांनी सजलेल्या उघड्या मोटारीत उर्मिला-नरेश बसली होती. उर्मिला मोठ्या खुषीत होती पण नरेश मात्र अस्वस्थच होता

तो सारखा राजेशचा विचार करीत होता. न सांगता हा गेला कोठे ? नरेशनी लग्नाप्रीत्यर्थ उची व्हिस्कीची बाटली राजेशसाठी मुद्दाम आणली होती. आणि ती त्यानं इतर मित्रापासून लपवून ठेवली होती. राज आणि नरेशचे काही मित्र वरातीपुढे भागडा नृत्य करणार होते. लग्न निश्चित ठरल्यापासून राजेश केवढा खुषीत होता. दोघांनी मिळून प्रोग्रॅम तयार केला. उर्मिलाच्या साड्या, मॅचिंग सॅंडल्स, नरेशचा सूट, तिच्यासाठी

मेकपची मनीबॅग, आणि त्या दोघांचा हनीमून प्रोग्रॅमसुद्धा त्याच्याच सल्ल्याने ठरला होता. असं असताना ऐनवेळी तो नसावा, याचं विलक्षण आश्चर्य तर वाटलंच, पण एक प्रकारची हुरहूर त्याला वाटू लागली. उर्मिलाला पण राजनी सांगितलं होतं. वरातीनंतर ही गृहलक्ष्मी नव्या घरी पोचवीन. वरात मोठ्या दिमाखात चालू झाली. उर्मिला मैत्रिणींच्या सहवासात दंग होती. नरेशच्या दुसऱ्या बाजूला राजूभय्या असणारच ह्याची तिला खात्री होती. पण थोड्या वेळानी तिच्या लक्षात आलं की नरेशजवळ राजूभय्या नाही. म्हणून तिने भांगडा डान्स करत असलेल्या त्याच्या मित्रात निरखून पाहिलं, तेथेही तो दिसला नाही.

राजेशला ज्या मुलीने लग्नाचं वचन दिलं होतं. जिच्यावर तो प्रेम करत होता, भावी पत्नीच्या नाजूक धाग्यांनी जिला डोळ्यात साठविली होती. लग्नाच्या मंगल क्षणांनी जिला तो सन्मानानी आपल्या मिठीत घेणार होता, आणि जिच्या आवडी निवडीने साड्या, दागिने खरेदिले होते. तिचा हात हातात घेऊन घरकूल उभारणार होता, ते स्वप्न भंगले होते. त्या उच्च शिखरावरून तो कोसळला होता. लग्न, स्त्री, पत्नी या पावित्र्यावरचा त्याचा विश्वास उडाला होता. आणि त्या प्रसंगापासून तो कधीही कोणाच्याही लग्नाला गेला नव्हता. पण आज नरेश आणि उर्मिलासाठी हे घेतलेलं व्रत तो मोडणार होता. लग्नाला हजर राहून नाचणार होता. पंजाबी लोकांत भांगडानृत्य मिरवणुकीपुढे नाचतात. त्यानी आपल्या पंजाबी मित्रांना नाचण्यासाठी बोलावलं होतं. आणि तोच राजेश ऐनवेळी कोठे गायब झाला होता तेच समजत नव्हतं.

नरेशच्या मित्रमंडळीत कोणी असा नव्हता की त्याला राजेशच्या खोलीवर पाठवून त्याचा तपास करावा. एवढ्या आनंदाच्या प्रसंगी नरेश फार उदास झाला होता. त्याच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. रुमालानी डोळे पुसून पुनः पुन्हा गर्दीत डोळे ताणून तो पहात होता. वरात घरापर्यंत आली. दोघंही मोटारमधून घरांत आले. पण ज्यानी हे सर्व घडवून आणलं तो मात्र कुठंच दिसत नव्हता.

* * *

दोन वर्षांच्या तपश्चर्येचं फळ मिळालं होतं. उर्मिला फुलांनी सजवलेल्या बेडरूममध्ये नरेशची वाट पहात बसली होती. तिच्या घरचे लोक त्या दोघांचा निरोप घेऊन गेले होते. नरेशनी खोलीत प्रवेश केला. उर्मिला वस्त्रालंकारांनी नटून डोक्यावर पदर घेऊन पलंगाच्या कडेला बसली होती. तिचा पदर बाजूला करून तिला मिठीत घेणार इतक्यात त्याच्या डोळ्यांसमोर राजेशचे बोलणे आले, 'नाही नाही. मी तुला अशी संधी घेऊ देणार नाही. स्त्रीची अब्रू काचेसारखी असते. तुम्ही दोघं तरुण आहात. केव्हाही तोल सोडाल. तुम्हा दोघांना गप्पाच मारायच्या आहेत ना, पण मी शेजारच्या खोलीत असेन तेव्हाच गप्पा मारा. मात्र संपूर्ण खोली तुम्हाला एकांत करण्यास कधीही देणार नाही.' अनेक वेळा राजेशनी नरेशला बजावलं होतं आणि त्या दोघांवर सक्त नजर ठेवली होती. राजेशनी अशा तऱ्हेचं बंधन नरेशवर ठेवलं नसतं तर ही मंगल रात्र आलीही नसती.

ही आठवण येताच नरेशनी दीर्घश्वास घेतला. राजेश उर्मिलाला कधीही एकटा भेटला नाही. आपल्या हातून गीतावरील घडलेल्या अन्यायाचा त्याने उल्लेखच नव्हे तर कधी कृतीनेही दर्शविलं नाही. उर्मिलाची जपणूक आस्थेनी केली. आमच्या लग्नाचं निश्चित ठरल्यावर केवढा आनंद त्याला झाला. तोच राजेश ऐन लग्नाच्या दिवशी कोठे नाहीसा झाला? त्यानं हातातील घड्याळात पाहिलं. रात्र झाली असून उर्मिलासह जाणं अगर तिला सोडून एकट्यानं जाणं योग्य नव्हतं. सकाळीच प्रथम त्याच्या खोलीवर जाण्याचं त्यानं ठरवलं. मनात शंकेची पाल चुकचुकली. कदाचित राजेश एकदम आजारीही झाला नसेल ना?

उर्मिलाने त्याला विचारलं,

'तुम्ही इतके गंभीर का? कसला विचार करता आहात?'

'राजूभय्याची आठवण झाली!'

'खरंच! मी त्यांना सबंध दिवसात आणि रात्री वरातीच्यावेळी सुद्धा पाहिल्याचं आठवत नाही. राजूभय्या आपल्या लग्नाला का आले नसतील?'

'तेच तर मला माहीत नाही.'

'आपल्या दोघांच्यासाठी त्यांनी किती केलं नाही? आपल्या लग्नाला

आई-वडिलांची परवानगी मिळाल्यावर त्यांना केवढा मोठा आनंद झाला. आणि आता आयत्यावेळी त्यांनी असं का करावं ?'

'मला वाटतं काहीतरी खास कारण असावं की ते त्यांनी माझ्यापासून लपवून ठेवलंय किंवा आजारी असेल !'

'सकाळीच आपण त्यांच्या घरी जाऊन चौकशी करू या.'

'जरूर जरूर जाऊ या. अग, त्यानं मला सांगितलं होतं की, तुझं लग्न पार पडलं की त्या रात्री आनंदानं मी व्हिस्की खूप पिणार.'

'आता तर मला जास्तच काळजी वाटतेय. कधी सकाळ होतेय आणि आपण जातो असं झालंय.'

* * *

उर्मिला आणि नरेशच्या लग्नाला महिना झाला. लग्नानंतरची नवी नवलाई कमी होऊ लागली. कधी कधी संध्याकाळी नरेश एकटाच क्राफर्ड मार्केट, फाउंटन, कुलाबा या ठिकाणच्या मोठमोठ्या दुकानांतून फिरे. आज उर्मिला माहेरी गेली होती. उशिरा परत येणार होती. म्हणून नरेशला घरी जाण्याची घाई नव्हती. तेव्हा त्यानं विचार केला की सरळ कॉफी हाऊसमध्ये जावं. बहुतेक राजूभय्या तेथे भेटेल

कॉफी हाऊस अगदी भरून गेलं होतं. एक सुद्धा खुर्ची रिकामी नव्हती. नरेशनी सिगरेट ओढत ओढत थोडा वेळ उभं राहून सगळीकडे निरखून पाहिलं. परंतु त्या गर्दीत राजेश नव्हता. त्यामुळे त्याची खूपच निराशा झाली राजेश भेटला नाही म्हणून ही निराशा नव्हती. कारण त्याचं लग्न होऊन एक महिन्यापेक्षाही अधिक दिवस झाले होते आणि या अवधीत त्याला थोडाही वेळ मिळाला नव्हता. राजेशच्या खोलीवर जाऊन त्याला भेटावं, त्याची चौकशी करावी. असं त्याला कधीही वाटलं नव्हतं. कॉफी हाऊसमध्ये राजेश दिसला नाही म्हणून तो परतला. त्यानं मनगटावरील घड्याळात पाहिलं. साडेआठ वाजून गेले होते. बराच उशीर झाला होता. म्हणून तो घरी जाण्यासाठी बसच्या क्यूमध्ये उभा राहिला.

नरेशचं डोकं भरकटलं होतं. लव्ह-मॅरेजची धुंदी साफ उतरली होती.

ती नशा, तो कैफ स्थिरावण्यासाठी राजेशला भेटणं आवश्यक होतं. त्याचा सल्ला हवा होता.

लग्नानंतर आर्थिक जबाबदारी अंगावर पडली आणि एका महिन्याच्या अवधीत त्याला पुरेपूर कळून चुकलं. प्रपंचाचा गाडा चालवणं वाटतं तितकं सोपं नाही. स्वत:ची कुवत पण तो जाणून होता. सासरा खूप श्रीमंत, लाडकी मुलगी, हुंडा खूप मिळेल ही आशा फोल ठरली. सारंच मुसळ केरात गेलं आणि म्हणून ऐन सुखाच्याक्षणी तो बेचैन होत असे. तो आपल्या विचारात गढून गेला होता. तोच त्याच्या खांद्यावर कुणीतरी हात ठेवला. नरेशनी वळून पाहिलं. आश्चर्य आणि आनंदानं त्यानं त्याला मिठी मारली. राजूभय्या होता तो ! त्यानं प्रथम त्याला नखशिखांत न्याहाळलं. राजूभय्याची प्रकृती ठणठणीत होती. चांगल्या मूडमध्ये होता. प्रथम त्याचा विश्वासच बसला नाही. राजूभय्या भेटला म्हणून त्याला आधार वाटला. आनंद झाला. पहिला प्रेमाचा बहर ओसरल्यावर थोडा दूर सरून खोटया रागाने आणि रुसव्याने त्यानं बोलायला सुरुवात केली.

'भय्या, तू तर कमालच केलीस, इतका मला विसरलास ?' जगात नरेश नावाचा कोणी तुझा ओळखीचा मित्र जिवंत आहे याची दखल आहे का ? उर्मिला तुझी किती आठवण काढते !'

राजू हसत म्हणाला, 'तुझा राग–रुसवा मी जाणतो.'

आणि त्याला म्हणावसं वाटलं की हे जे प्रेम दाखवतोस ते खोटं आहे, ढोंगी आहे, कपटी आहे. पण तो तसं म्हणाला नाही. कारण बोलून दाखविण्यातही काही फायदा नाही आणि सुधारणा होण्याची शक्यता नाहीच नाही, हे राजेश ओळखून होता.

'प्रथम राजूभय्या, तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. तू आमच्या लग्नाला का आला नाहीस !'

'जाऊ दे. मी तुला आणखी केव्हातरी स्वस्थपणी सांगेन. उर्मिला कशी आहे ते प्रथम सांग ?'

'अगदी उत्तम !'

'लग्न कसं झालं ? अगदी दणक्यात पार पडलं की रुसवे फुगवे झाले ?'

'हा ठीकच म्हणायचं.' नरेश उपरोधिकपणी म्हणाला.

'तुझ्या स्वरावरून वाटत नाही तसं ? मला वाटलं लग्नानंतर तुझी भेट होईल ती स्वतःच्या मोटारमध्ये मी तुला पाहीन, किंवा मोटर-सायकल स्कूटरवरून जाताना पाहीन, तर तू आपला बसच्या क्यूमध्ये उभा आहेस सासूरवाडीहून काही मिळालेलं दिसत नाही ?'

'छे रे आयला बोगस साली ! साला तो बुढ्ढा भलताच चिक्कू. कापल्या करंगळीवर ... ... ' नरेश रागाने म्हणाला.

त्याच्या चेहेऱ्यावरचा भाव पहाताच राजेश समजला की, नरेशला लग्नात ना हुंडा, ना मोटार इतकंच काय साधी स्कूटरही मिळालेली दिसत नाही. तो म्हणाला,

'जाऊ देरे तू काही वाटून घेऊ नकोस. तुझ्या पसंतीची बायको तुला मिळाली हे काय थोडे आहे का ? देणं–घेणं ह्या मामुली गोष्टी असतात. त्या दिल्याने किंवा घेतल्याने जन्माला थोडयाच पुरतात ?'

'हं ! हे तर खरंच आहे.'

'अरे यार ते जाने दो ! तुम्ही दोघं माझ्याकडे रविवारी चहाला या ना !'

'राजूभय्या, तूच येना आमच्याकडे !'

'मी तर येईनच. पण मला तुम्हा उभयतांना पत्नी-पतीच्या नात्याची निरगाठ बांधल्यानंतर पहायचं आहे. तुमचं नातं होण्यापूर्वी माझ्या खोलीवर तुम्ही येत होतात. त्याच खोलीत प्रथम मी तुमचं स्वागत करणार आहे !'

'तुझ्याकडे एकदाच काय आम्ही दहावेळासुद्धा यायला तयार आहोत. मी एवढ्यासाठीच म्हणतोय की तू एकटा आहेस तेव्हा तुला नसता त्रास पडेल.'

'त्रास रे कसला ?'

'चहा करणे, बाहेरून खाद्यपदार्थ आणणे वगैरे.'

'हे तर नेहमीचंच आहे. मला सवय आहे. पण अरे यार, या वेळेचा चहा वगैरे सर्व घरीच बनणार आहे. स्वंयपाकाचा मी प्रश्न सोडविला आहे.'

'वा ! हे फारच छान केलंस. मग रविवारी जरूर आम्ही दोघं येतोय.'

'चहाच्या वेळी या आणि रात्रीचं जेवण करूनच सावकाशपणे गप्पा मारून मग जा. चालेल ना ?'

'एकदम मस्त बेत !'

सिगरेट पेटवीत राजेश म्हणाला,

'आता मला सांग तुला सासऱ्यांनी काय काय दिलं ?'

'सासरा श्रीमत, खूप मिळेल या इच्छेने मी उर्मिलाशी लग्न केलं नाही. माझं प्रेम होतं म्हणून लग्न केलंय.'

'स्पेशल कांही राहू दे पण सर्वसाधारण तू सांगतोस त्याप्रमाणे काहीच मिळालं नाही.'

राजेशला माहीत होतं उर्मिला उद्योगपतीची मुलगी, निदान त्यांच्या प्रतिष्ठेला शोभेस आणि लाडक्या लेकीला सर्व घर सजवून मिळेल. तीन मुलांच्या पाठीवर झालेली शेंडेफळ म्हणून उर्मिला, सर्वांची लाडकी होती. त्याना जावई खूप शिकलेला, देखणा, श्रीमत पाहिजे होता आणि तो सहज मिळालाही असता. कोणतीही गोष्ट कमी नव्हती. उर्मिला देखणी होती, शिकलेली होती. स्वभावाने मात्र थोडीशी हट्टी होती. मना-सारखं सर्व करून घेणारी ! आणि याच हिशोबानं नरेशनी, दागदागिने, फर्निचर, मोटर, सूट एक ना अनेक अपेक्षा धरल्या होत्या. आणि आता जर पैशाची आभिलाषा नसती तर त्यानं गीताशीच लग्न केलं असतं. गीतावरही तो प्रेम करत होताच. लग्नाच आश्वासन दिलं होतं आणि उर्मिलापेक्षा कितीतरी पटीनं गीता देखणी, विनयशील होती, विचारी होती. गरिबी तिला परिचयाची होती. ती परिस्थितीने गरीब, काही मिळणार नाही ही गोष्ट लक्षात येताच क्षुल्लक कारण दाखवून त्याने तिचा विश्वासघात केला होता.

राजेशच्या लक्षात आलं की, उर्मिलाशी लग्न करूनही नरेश खूष नाही. त्याच्या ठिकाणी नवी-नवलाई नाही. राजेशनी मग त्याला विचारल,

'उर्मिला आनंदात आहे ना ?'

'ती मजेत आहे. आज माहेरी गेली आहे.' इतक्यात बस आली, नरेश बसमध्ये चढला. आणि राजेश घराची वाट चालू लागला.

* * *

रविवार ढगाळी पावसाळी हवा, उर्मिला–नरेश छानसे कपडे करून राजूभय्याकडे निघाले. लग्नात राजेशसाठी आणलेली व्हिस्कीची बाटली न विसरता नरेशनी बरोबर घेतली होती. सारा रस्ताभर ती दोघ राजेश-बद्दलच बोलत होती. त्याच्या खोलीवर कसे भेटत होतो, राजूभय्याच बारीक लक्ष कसं होतं वगैरे गोष्टी करताना उर्मिला म्हणाली.

'तुम्ही काही म्हणा राजूभय्याचा तुमच्यावर मुळीच विश्वास नाही. माझा गैरफायदा घ्याल अस त्याना वाटल होत म्हणून त्यांनी आपल्या अप-रोक्ष भेटण्याची सक्त मनाई केली आणि एखाद्या पहारेकऱ्याप्रमाणे पहारा करीत असत. डॅडी–ममीला कसं भेटाव, किती प्लॅन आपण करत होतो नाही? राजूभय्यामुळं आपल लग्न व्यवस्थित पार पडल. मी तर सारं क्रेडिट त्यांनाच देईन. राजूभय्यावर ममी आणि डॅडी खूष आहेत अगदी!' नरेश हू हू करीत तिचं बोलण ऐकत होता. 'पडद्यामागे राहून प्रॉम्टिंग करणारा हा माणूस ऐनवेळी कुठ गायब झाला ही बातमी मी त्याच्याकडून ठणकावून काढून घेणार आहे!'

टॅक्सीचे बिल चुकते केल्यावर नरेश उर्मिलेला म्हणाला,

'उमा, तू पुढे हो, मी सिगरेट घेऊन येतो'

'हे हो काय? मी एकटी नाही वरती जाणार!'

'वा ग लग्नाच्या आधी वाटेल तेव्हा एकटी जाऊन तासन् तास बसत होतीस आणि आता तर लायसन्स आहे गळयात.'

'मला राजूभय्याची लाज वाटते, तो माझी चेष्टा करील. तुम्ही बरोबर असलात की तेवढाच धीर येईल. सिगरेट मोलकरणीला पाठवून आणता येईल त्यांनी घरकामाला मोलकरीण ठेवलीय अस तुम्हीच सांगितलंत ना?' परंतु नरेशनी तिचे न ऐकता पळ काढला आणि उर्मिलेचा नाइलाज होऊन ती एकटीच जिना चढून वरती गेली. दारावरची बेल दाबताच चटकन दार उघडलं गेल. दार उघडणारी तरुण देखणी मुलगी होती तिने उर्मिलेला पाहताच दार उघडून ती 'नमस्ते' म्हणाली.

उर्मिला विचारात पडली. ही मुलगी नोकर असेलसं वाटलं नाही. नव्या नवरीसारखी दिमत होती. अंगावरची बऱ्यापैकी साडी, हातात हिरवा चुडा, गळयात मंगळसूत्र, एकदोनच अंगावर दागिने पण तेही कोरे दिमत होते.

'राजेश इथंच राहातात ना ?'

'होय ते तुमचीच वाट पहाताहेत. बसा ना ! अंघोळीला गेलेत येतील एवढ्यात !' आणि ती आतल्या खोलीत निघून गेली.

उर्मिला बसल्या बसल्या खोलीचं निरीक्षण करू लागली. प्रथम ती नरेशला या खोलीत भेटायला येत होती त्या वेळी खोलीचा रंग अगदी औरच होता. सिगरेची थोटकं, बाटल्या, ग्लास, वृत्तपत्र, पुस्तकं ही सर्व अस्ताव्यस्त पडलेली असत. आणि आज..

त्याच खोलीचं स्वरूप पालटून गेलं होतं. ही किमया कोणी घडविली ? खोलीचा फिकट गुलाबी रंग, दारा–खिडक्यांना सुंदर पडदे, सोफ्यावर मॅचिंग अभ्रे आणि लहानशा काचेच्या कपाटात टीसेट, ग्लास आदी वस्तूंची आकर्षक मांडणी केलेली होती. कपाटावर रेडिओ, एका कोपऱ्यात चार खुर्च्या आणि डायनिंग टेबल, मोठ्या फुलांच्या पडद्याचे कापडाने पार्टिशन तयार केलं होतं. थोडा पडदा बाजूला सारून उर्मिलानं आत डोकावून बघितलं आतल्या. बाजूला डबलबेड, ड्रेसिंग टेबल, गोदरेजची आलमारी, व मॅनी प्लँट ! ही सर्व शान पाहून उर्मिला थक्कच झाली. आणि तिने विचार केला राजूभय्यानी आपली जागा कोणातरी जवळच्या नातेवाईकाला अगर नवीन लग्न झालेल्या मित्राला दिली असावी

इतक्यात ती मुलगी बाहेर येऊन म्हणाली,

'तुम्ही एकट्याच आलात ?'

'नाही ते पण आलेत, सिगरेट आणायला गेलेत.'

दरवाजा उघडाच होता. पण त्या मुलीची पाठ दरावाजाकडे होती. थोड्याच वेळात नरेश सिगरेट्स घेऊन आला. आणि दारातच उभा राहून पाठमोऱ्या तरुणीला उद्देशून म्हणाला,

'मी आत येऊ का ?'

त्या मुलीने तोंड फिरवलं नरेशची आणि तिची दृष्टिभेट झाली. आणि खाडकन् थोबाडीत मारावी तसे नरेशचे तोंड पांढरे फट्ट पडले. त्याचे पाय जागच्याजागीच खिळून गेले. आणि ती तरुणी अवाक् होऊन आत निघून गेली

उर्मिलाने ही दोघांची परिस्थिती पाहिली आणि स्वतः नीट सावरून बसली. त्या स्तब्धतेचा भंग नरेशनी केला. आत जाणाऱ्या तरुणीला उद्देशून रागात नरेशनी विचारलं.

'गीता तू आणि इथे ?'

तिने उत्तरच दिलं नाही. इतक्यात राजेशनी टॉवेलनी ओलं डोकं पुसत प्रवेश केला.

'आलात का दोघे ? तुम्हा दोघांच अभिनंदन !'

असं म्हणत त्याने त्यांना बसण्याची आज्ञा दिली आणि गीता शेजारीच बसला. गीता पदर सावरून विनयानी बसली होती.

'हं ! आज भेटतोस राजूभय्या. लग्नाला का आला नाहीस ते प्रथम सांग.'

'या गोष्टी नंतर सावकाशीने बोलू प्रथम मी तुमची ओळख करून देतो. गीता, हा माझा मित्र नरेश आणि त्याची ही पत्नी उर्मिला' गीताने उर्मिलाकडे पाहून स्मित केलं आणि 'नमस्ते' म्हणाली. नरेशकडे तिनं पाहिलंही नाही. आणि ही माझी पत्नी 'गीता' राजेशनी ओळख करून दिली.

उर्मिला अवाक् होऊन आश्चर्यानं म्हणाली,

'काय राजूभय्या, तुझं लग्न झालं कधी ?'

'तू–तू–तुझी पत्नी गीता ?' नरेशनी पांढऱ्या फट्ट चेहऱ्यानेच अडखळत विचारलं.

'होय. देवा ब्राह्मणांच्या साक्षीने गीताला माझी पत्नी म्हणून मी घरात आणलंय.'

'राजूभय्या तू शुद्धीवर आहेस का ? तू काय बोलतोस ?' नरेश चिडून म्हणाला. क्षणभर त्याला वाटलं हे सत्य की स्वप्न आपण पहातोय ! गीता अन् राजूभय्याची पत्नी आणि या गोष्टी राजूभय्याने आपल्यापासून आतापर्यंत का लपवून ठेवल्या ? आणि आज घरी बोलावून आकस्मित केव्हढा धक्का दिला. हा एक प्रकारे माझा अपमान त्यानं केला. सर्व गोष्टी ठाऊक असताना जाणून बुजून गुपचूप लग्न केलं. हे सत्य स्वीकारायला त्याचं मन तयार नव्हतं. त्याच डोक बधिर झालं तेथून पळून जावसं वाटलं, पण तो तसं करू शकला

नाही. उर्मिलेला काय वाटेल, तिला यातलं काही कळता कामा नये या विचाराने स्वत:ला त्यानं सावरलं.

'अरे नरेश तू असा उभा का ? बैस ना !'

'अं हं ! हं ! 'तंद्रीतून जागा होत इकडे तिकडे पहात नरेश जवळच्या स्टुलावर बसला.

'तुला काय झालंय ?' त्याला उठवून उर्मिलाच्या शेजारी बसवत राजेशने विचारले.

'कुठे ? काही नाही !' पडलेल्या चेहऱ्याने अस्वस्थ मन:स्थितीत कसातरी बसला होता.

उर्मिला नवऱ्याची अवस्था पाहून आश्चर्यचकित झाली होती. आणि तिची खात्री झाली की गीता आणि आपला नवरा एकमेकांना परिचित आहेत परंतु चेहरा पांढरा पडण्याचं कारण काय ? हे मात्र ती समजू शकत नव्हती.

'राजूभय्या, तुम्ही लग्न केव्हा केलत ? आणि आम्हा दोघांना न बोलावता एवढं गुपचूप करण्याचं कारण ?' ऊर्मिलाने विचारलं.

गीताने राजकडे पाहून स्मित केलं. आणि त्या वेळी राजनी तिच्या स्मिताचा स्वीकार केला. नरेशनी हे पहाताच त्याच्या अंगाचा भडका उडाला. कपाळाला अधिकच आठ्या घालून पुस्तकात तोंड खुपसून बसला.

'आमच्या लग्नाची तारीख दहा नोव्हेंबर !'

'काय दहा नोव्हेंबर ?' ऊर्मिला एकदम ओरडून म्हणाली, 'त्या दिवशी आमचं लग्न झाल. कमाल आहे. म्हणून आपण आमच्या लग्नाला हजर राहू शकला नाहीत खरं ना ! तुमच्या लग्नाचा मुहूर्त थोडा पुढे मागे केला असतात तर ? आणि इतकंच होतं तर आम्ही सुद्धा आमच्या लग्नाच्या मुहूर्तात बदल केला असता. आम्हाला तुमच्यासारखी मुळीच घाई नव्हती. पण भय्या, असं का केलंत हे सांगाल का ?'

'उर्मिला, अशी परिस्थितीच निर्माण झाली होती की दहा नोव्हेंबरलाच आमचं लग्न व्हायला हवं होतं. होय ना गीता ? मी बरोबर बोलतोय ना ?' राजेश पत्नीकडे हसतच पहात म्हणाला. तिने नुसतंच स्मित केलं. आणि चहा आणते असं म्हणत ती आत गेली.

'मस्त चहा आणि खायला आण आणि हे बघ मी आणि नरेश दोन दोन कप चहा पिणार बरं का!' नरेशला म्हणायचं होतं एक घोट सुद्धा चहा पिण्याची इच्छा नाही.

गीता आत निघून जाताच नरेशनी सुटकेचा श्वास सोडला. जणू काही त्याच्या डोक्यावरचं मोठं ओझं कमी झाल होतं.

राजेश या सर्व गोष्टी जाणत होता. उर्मिला पतीची अस्वस्थता पहात होती. आणि त्यामुळे ती सुद्धा थोडी नाराज होती.

'मी पण गीतावहिनीना आत जाऊन चहाला मदत करते' आणि ती उठून आत जाऊ लागली.

'तू बैस ग!' राजेश म्हणाला.

'का? मी मदत केली तर बिघडेल का?'

'तू आहेस नवी नवरी!' राजेश म्हणाला.

'आणि गीतावहिनी नाही वाटत नवी नवरी?'

'अग ती गरिबा घरची मुलगी आहे.' राजेश उपाहासाने म्हणाला.

'गरीब श्रीमंत या गोष्टी राजूभय्या माझ्यासमार पुन्हा बोलू नकोस. गीता माझी वहिनी आहे.' आणि ती आत निघून गेली.

बैठकीच्या खोलीत नरेश आणि राजेश दोघेच राहिले होते. नरेशी आपल्याच विचारात गढून गेला होता.

'नरेश, कसला विचार करतोस?'

'छेरे! कसलाही नाही. राजूभय्या मी स्वप्न तर पहात नाही ना? काय घडतय तेच समजत नाही मला!'

'स्वप्न नसून हे पहातोस ते सर्व सत्य आहे.'

'तू काही म्हण भय्या, माझं मन ही गोष्ट सत्य आहे अस स्वीकारायला तयार नाही. माझ्या डोळ्यावर माझा विश्वासच बसत नाही.'

'कोणती गोष्ट मी समजलो नाही?'

'ही गोष्ट की गीताबरोबर तू लग्न केलंस!'

'का रे बाबा, मी गुन्हा तर केला नाही?'

'तसं मी म्हणू शकत नाही. परंतु गीताची गोष्ट तुला माहीत आहे नां?'

'हो.'

'हे सारं माहीत असून, माझ्या तोंडून प्रत्यक्ष ऐकलेलं असून तू तिच्याशी लग्न करावंस ?'

'हो मी तिला ओळखलं आणि म्हणूनच ...'

त्याचे वाक्य पुरे होण्याआधीच नरेश रागानी म्हणाला,

'ती भटक भवानी वेश्या ...'

'नरेश, तू बोलून चुकलास पण लक्षात ठेव, गीता माझी पत्नी आहे आणि मी तिला ओळखतो. ती तुझ्या मताप्रमाणे वेश्या नाही, पुन्हा असले शब्द माझ्याशी संबंध ठेवायचा असल्यास ऐकले जाणार नाहीत. एक वेळ तुला माफ करतो हे लक्षात ठेव.'

'भय्या, मी चुकलो क्षमा कर. या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही, काय करू ?'

'तुझी ती वहिनी आहे असं समज.'

'खरंच ती आता गीता नाही. माझी वहिनी झालीय.'

'नरेश, जीवनात मी सर्व गोष्टीत सुरुवातीलाच हरलोय. आई-बाप, भाऊ-बहीण याहून विदारक सत्य आणि दु:खदायक प्रेमातसुद्धा मी हरलोय. त्या बिचारीला मी मात्र एखादा मोठा उपकारकर्ता, देवाप्रमाणे वाटतोय. माझा विश्वास आहे. गीता एक आदर्श, विनयशील पत्नी आहे. मीच नव्हे तर येथील सर्व आजूबाजूच्या लोकांना तिने आपलंस केलं आहे. ती आदर्श गृहिणी आहे. या खोलीच्या रूपावरून तुला कल्पना आलीच असेल ना ?'

'पण भय्या, अशा मुलीशीच तुला जर लग्न करून सामाजिक कार्य करायचं होतं तर दुसरी कोणी अबला स्त्री निवडायची होतीस. परित्यक्ता, घटस्फोटिता किंवा विधवा सुद्धा तुला सहज मिळाली असती.'

'पण गीतामध्ये काय कमी आहे ? ती चांगली शिकलेली आहे. देखणी, विनयशील आहे. उत्तम गृहिणी असून पाककलानिपुण आहे. या घराचं स्वरूप तिनं एकटीने पालटलंय आगदी भिंतींना रंग देण्यापासून ! आय ॲम व्हेरी हॅपी.'

'मी इतकंच जाणतो की तू मला अतिशय दुःख दिलंस, खिजवलंस. माझा फार मोठा अपमान केलास.'

'तो कसा काय ? तुझ्या बोलण्याचा अर्थ मी समजलो नाही.'

'भय्या, ज्या स्त्रीचा मी पत्नी म्हणून स्वीकार केला नाही. ती कलंकित स्त्री तू सन्मानानं मिरवावीस ? मला ते कसं सहन करवेल ? जन्मभर मी एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे तिच्या मनात असणार. जिला मी लाथाडलं. तिला मान देणं मला शक्य नाही. हे दुःख, यातना तू मला जाणून-बुजून का दिल्यास ? तुझा संबंध सोडणं आणि तुझे घर वर्ज्य करणं एवढंच माझ्या हाती आहे. माझ्या अंतःकरणातली जखम जन्मभर दुखतच राहाणार'

'नरेश. तुझ्या मनाला पटेल तसे तू कर. प्रत्येकाचा विचार आणि दृष्टिकोन निरनिराळा असतो. तू तिचं लग्न जमत आलं की मोडत होतास, पण माझ्या नशिबात ब्रह्मदेवाने तिची माझी गाठ बांधली होती तर ती कोण सोडणार ?'

'राजूभय्या, मला वाईट वाटतं ते हे की, तुझ्यासारख्या उमद्या, गुणी कर्तृत्ववानाला कितीतरी चांगल्या मुलींशी लग्न करता आलं असतं. हुंडा मिळाला असता, मान सन्मान वाढला असता, हिच्यापेक्षा दसपटीने गुणाने देखणी मुलगी तुला मिळाली असती.'

'तू म्हणतोस तसं कदाचित् घडलही असत. पण प्रत्येक माणसाला हुंड्याची अपेक्षा असतेच असं नाही. आणि मला माझ्या वडिलांच्या इस्टेटी-चीही एक कणभरही अपेक्षा नव्हती हे तुला माहीत आहे. दुसरी गोष्ट सौंदर्याची ! सौंदर्याचा निर्णय कुणी द्यायचा ? प्रत्येकाचा पाहाण्याचा दृष्टिकोन निराळा असतो अस वाटत नाही तुला ? अरे दोन वर्षांपूर्वी मी काश्मीरला गेलो होतो. शिकाऱ्यात, नावेत इकडून तिकडे काम करताना किती तरी सुंदर तारुण्यानं रसरसलेल्या मुली मी पाहिल्या. किती वेळा मनात आलं, यातल्या एखाद्या मुलीची सुंदर केशरचना करावी, चांगली साडी नेसवावी; छानसा मेकअप करावा आणि तिला पत्नीचं स्थान द्यावं असं मनात देखील आलं नाही तेव्हा सौंदर्य पाहून नुसतं भागणारच नाही. आपणाला जे पटेल, रुचेल, झेपेल तेच स्वीकारलं पाहिजे. माणसाचे सगळे

विचार तर्कात बसत नसतात. व्यवहाराची जोड द्यावी लागतेच. विधिलिखिताच्या अखेरच्या संकेताची वाट पहात रेंगाळणाऱ्याच्या वाटयाला आलेलं आयुष्य स्वीकारायचं आणि प्रयत्नांनी पराकाष्ठा करून पुढे चालू लागायचं हेच मी ठरवलंय्. गीता तुझ्या योगानेच माझ्या आयुष्यात आली. माझ्याप्रमाणेच किंबहुना जास्तच प्रमाणात ती रक्तबबाळ झाली होती. वाटलं तिच्या संगतीत, सोबतीत संसाराचं स्वरूप सुंदर चित्र साकार करावं.

उद्याच कोण जाणणार ? तुला एक गोष्ट सांगतो, माझ्या मित्राची पत्नी सुंदर होती. मराठी म्हणत इतकी सुंदर मुलगी अजून पर्यंततरी आम्ही पाहिली नाही. त्यालाही आपल्या स्वरूपसुंदरी पत्नीचा अभिमान होता. पण एक दिवस अचानक तिला ताप आला व त्या तापातच तिच्या अंगावर देवी उठल्या. आणि सर्व ठिकाणी देवीचे डाग उठले. तेव्हा त्या सौंदर्यवान् मुलीची आणि नवऱ्याची अवस्था काय झाली असेल याचा तू विचार करावास. तू हुंडयाची अपेक्षा धरलीस, पैशाच्या लोभाने गरीब म्हणून तू क्षुल्लक कारण दाखवून तिला लाथाडलंस, तिला माणूस म्हणून जगायचा अधिकार ठेवला नाहीस. काणि उर्मिला श्रीमंत म्हणून तिला जवळ केलीस, पैशाची अभिलाषा बाळगलीस. पण हुंडा मिळाला ? पैसा मिळाला ? अपेक्षा पुऱ्या झाल्या ?'

'तुम्ही दोघं मित्र गप्पांच्या नादात दंग आहात पण माझा मात्र भुकेनी प्राण कासावीस झालाय' उर्मिला आतून बाहेर येत म्हणाली.

'चहा टेबलावर आला का ?' राजेशनी विचारलं.

'हा पहा ठेवतेच तुम्ही आत या' उर्मिला त्या दोघांना म्हणाली.

नरेश आणि राजेश पार्टिशन घालून तयार केलेल्या खोलीत गेले. खोलीची मांडणी सुंदर केली होती ही सुंदर खोली पाहून नरेशच्या मनात आलं हीच खोली काही महिन्यांपूर्वी थर्डक्लास वेटिंग रूमसारखी होती आणि आता ?

चहाच्या टेबलावर खाद्य पदार्थ व चहा मांडला होता. त्याचा आस्वाद घेत असतानाच गप्पा चालू होत्या. परंतु नरेश मात्र बऱ्याचा वेळा गप्प होता. त्याला गीताच्या डोळयाला डोळा देण्याची हिंमत नव्हती. गप्पात फारसा भाग सुद्धा तो घेत नव्हता. ज्या गीताबरोबर अनेकवेळा एकांत केला

जिचं तारुण्य मनसोक्त लुटलं, जिला नग्नावस्थेत अनेक वेळा जवळ घेतली, आलिंगन आणि चुंबनांनी जिचा जीव गुदमरून सोडला, जिच्या उदरात माझ्या अंकुराची वाढ होत होती, काही दिवसांत तिने त्याला जन्मही दिला असता अशा गीताला आपण ठोकरलं, लाथ मारली. तिची अनेकवेळा जमत आलेली लग्नं आपण मोडली. आणि तीच गीता राजेशची पत्नी, एक आदर्श गृहिणी, पत्नी म्हणून मिरवतेय. मानाने, सन्मानाने, दिमाखाने वावरतेय आणि मी मात्र तिच्यासमोर या घरात अपराध्यासारखा बसलोय. मुद्दाम या दोघांनी माझा अपमान केलाय. मनातल्या मनात तो चिडला होता. जळफळत होता. खजिलही झाला होता.

रात्रीच्या जेवणानंतर नरेश आणि उर्मिला दोघांचा निरोप घेऊन निघाले. घरी गेल्यावर उर्मिलाने नरेशला विचारले,

'तुम्ही गीतावहिनीला ओळखता ?'

'होय !'

'ते कसं ?'

'मी पाच वर्षांपूर्वी ज्या बिल्डिंगमध्ये रहात होतो. तेथे शेजारीच ती रहात होती '

'पण मला वाटतं की तिला तुम्ही नुसतं ओळखत नसून तुमची चांगलीच ओळख असावी. अशी माझी खात्री आहे. ' उर्मिलाने त्याच्या वर्मावर घाव घातला.

'हूं !'

'राजूभय्याने तिच्याशी असं गुपचूप का लग्न केलं ? आणि ते सुद्धा आपल्या लग्नाच्या दिवशी हे कारण मी अजून समजले नाही. मी गीता-वहिनीला विचारलं, तुमच्या लग्नाला किती मंडळी आली होती तर तिने सांगितलं फक्त सहासात !'

'एवढीच ! कमाल आहे.'

'होय ! आणि तिला पहाताच तुमचा चेहरा पांढराफट्ट पडला. आणि घाबरलात का ?' उर्मिलाने सरळ सरळ विचारलं.

वि...६ •

'छे ग ! तुम्ही बायका म्हणजे भलत्याच संशयी शंकाकुशंका खणून खणून काढणार.'

'आरसा असता तर मी धरला असता तुमच्यापुढे, इतकं पांढरं पडलं होतं तुमचं तोंड !'

'उमा, त्या मुलीची भयंकर गोष्ट आहे' अधिक चर्चेला तो भीत होता. आणि तो हे पण ओळखून होता उर्मिला गप्प बसणारी नाही.

'गीतावहिनीबद्दल तुम्ही बोलता आहात !'

'होय.'

'मला तरी कळू द्या काय भानगड आहे ती !'

'अग गीताला दिवस गेले होते. एका मुलाबरोबर ती हिंडत होती, प्रेम करीत होती. किती तरी दिवस हे प्रेमप्रकरण चालू होतं. ती दोघं लग्नही करणार होती. पण काहीतरी कारणावरून ते लग्न फिसकटलं. शेवटी डॉक्टरकडे जाऊन ते मूल पाडावं लागलं.'

'तुम्ही काय म्हणता काय ? कोणी मेल्यानं विश्वासघात केला असेल ?'

'तीच तसली उनाड–भटकी आहे. मुलाकडे दोष नाही. मी राजूभय्याच्या घरी तिला पहाताच बर्फच झालो. नंतर पत्नी म्हणून त्याने ओळख करून दिली. तेव्हा ही गोष्ट स्वीकारायला माझं मन तयार होईना. माझं डोकंच बधीर झालं राजसारख्या गुणी माणसाने असली उनाड बाजारबसवी बायको करावी, तिला वहिनी म्हणून आमच्यासारख्यांनी मान द्यावा हे कसं पटेल ?'

'पण काय हो ज्या मुलावर तिचं प्रेम होतं. दोघं इतके पुढे गेले होते, त्या मुलाने लग्न न करण्याचे कारण काय ? त्यानं तिला फसवलं नसेल कशावरून ?'

'ते मला माहीत नाही. मला वाटतं तिची फार छीः थू झाली की कोणी लग्न करावयास तयारच होईना.' नरेशनी आवंढा गिळला आणि उत्तर देण्याचं टाळलं.

'या गोष्टी राजूभय्याला माहीत नाही काय ? त्याचं बिचाऱ्याचं आयुष्य बरबाद न होवो म्हणजे झाल.'

'हीच तर गंमत आहे. त्याला सगळं माहीत आहे.'

'तुम्हाला काय माहीत गीता उनाड, स्वैरचारी आहे हे राजूभय्याला माहीत आहे म्हणून!'

'शंभर टक्के खात्री आहे माझी!'

'मग तर कमालच झाली. असल्या मुलीशी माहीत असूनही भय्याने लग्न का केलं? मी त्याला जाब विचारणार आहे. की कोणत्या कारणास्तव तू एका उनाड मुलीशी लग्न करून तिचा सन्मान केलास? तिच्या कपाळीचा कलंकाचा टिळा थोडाच पुसला जाणार आहे? कोणती गोष्ट कमी आहे-सुंदर रूप, दणकट शरीरयष्टी, पैसे चांगले मिळवतो, विचारही उच्च आहेत. शिकलेला आहे. भय्या म्हणजे एक आदर्श पुरुष आहे. इतकं सर्व असताना असल्या वाहयात बाईशी लग्न करून काय उपयोग? त्यानं त्यात काय मिळ-वलं?'

'उमा, तू वेडी तर नाहीस. या गोष्टी तू त्याला विचारणार?'

'त्यात वाईट काय करतेय मी?'

'ते मी सांगू शकत नाही. पण तिच्याबद्दल त्याला विचारू नये असं मला वाटत' असं म्हणत नरेशनी आपली बाजू मजबूत केली.

* * *

'रात्रीचे दहा वाजून गेले होते. गीता अद्याप स्वयंपाकघरात आवरा-आवर करत होती. राज तिची वाट पाहून कंटाळला होता. आणि त्याला झोप येऊ लागली. तशाच पेंगुळलेल्या अवस्थेत स्वयंपाकघरापर्यंत गेला आणि गीताला पाहून तो म्हणाला,

'पुरे कर तुझं काम. रात्र किती झालीय? आणि हे काय तू भांडी का घासतेच. मोलकरीण येत नाही का?'

'ती दोन दिवस येणार नाही म्हणून सांगून गेली आहे' ती राजेशपासून दूर रहात होती. अनेक वेळा ठरत आलेलं लग्न नरेशनी मोडलं होतं. आता आपल्या सुखी संसाराची होळी तो निश्चित करील याबद्दल गीताला शंकाच नव्हती. ती स्वतःला भाग्यवान समजत होती. राजेशसारखा गुणी, रुबाबदार,

विचारी जोडीदार मिळाल्याबद्दल ती देवाची मनोमन आभारी होती. एका पैशाचीसुद्धा बाबांना लग्नाच्या वेळी तोशीस पडू दिली नव्हती. मागचं काही सांगण्याची गरजच उरली नव्हती. त्यामुळे राजबद्दलचा तिचा आदर अधिकच वाढला होता. नरेशनी केलेली विटंबना ती सुखाच्या शिखरावर असल्यामुळे संपूर्णपणे विसरली होती. राजेशला आधिक सुख द्यायचं तिन ठरवल होतं.

' राहू दे ग तुझं काम ! चल ना मला झोप आलीय. '

' आलेच मी ! '

' राहिलेल काम सकाळी करत बैस. ' आणि तिला पकडून त्यानं तिला बाहेर आणली.

' सकाळी मलाच करावं लागणार आणि घाई किती होते. डबेवाला तर असा घाई करतो म्हणून सांगू ! '

बिछान्यावर दोघंही दहा मिनिटे झाली तरी गप्पच होती. गीता रोजच्या मूडमध्ये नव्हती. ती कसलातरी विचार करत होती. अस्वस्थ होती.

' कसला विचार करतेयस् गीता ? संध्याकाळपासून मी पहातोय तू गप्प आहेस. '

' नाही, नाही असं काही नाही. खूप थकल्यासारखं झालंय ' तिच्या मनाचा थरकाप उडाला. ती समजली नरेशनी आपल्या संसारावर घाव घातला आहे.

' गीता, तू नरेशला ओळखतेस ? ' राजेशनी सरळ प्रश्न केला त्यावेळी गीताला वाटलं धरणीमाता दुभंगून आपल्या पोटात घेईल तर किती बरं होईल राजच्या या प्रश्नाने गीता जीवनमृत्यूच्या टोकावर उभी होती. ती क्षणभर विचारात पडली. सत्य सांगावे की नाही ? कारण यावरच तिचं आयुष्य अवलंबून होतं. गेला महिना दीडमहिना ती राजेशला समजून घेण्याचा प्रयत्न करीत होती. पण तो समजण्यापलीकडे होता.

लग्न झाल्यादिवसापासून राजेशनी तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला नाही की तिची अवहेलना केली नाही. तिला तो योग्य त्या ठिकाणी, बरोबरीने मानानी वागवत होता. गीताला मनातून तळमळ वाटे. राजेशला आपण आवडतो का ? त्याचं प्रेम आपणावर आहे का ? की केवळ हक्काची

बायको एवढीच आपली किंमत आहे. अनेक प्रश्न तिला सतावत होते. राजेशच्या होणाऱ्या प्रतिक्रिया तिला समजत नव्हत्या. व ती जास्तच अस्वस्थ होत होती. आणि आता तर तिच्या मुळावर आघात केला होता. 'नरेशला तू ओळखतेस का?'

या प्रश्नाचं उत्तर तिने एका शब्दात–'नाही'–असे दिले असते तर गोष्ट संपली असती–'होय'–म्हणाली असती तर अनेक प्रश्न उपस्थित झाले असते. कशी ओळखतेस? कधी पासून मैत्री होती? एक ना अनेक प्रश्न! तिला लग्नापूर्वीचे काही दिवस आठवले. तिचा इतके वेळा अपमान झालेला होता, कुणी मुलगा पाहून जाई. पसंती कळवीत असे. परंतु थोड्याच दिवसात नकार येई. इतक्यात लग्नाचा विचार नाही, उच्च शिक्षणाला परदेशी जाणार वगैरे नकारघंटा असत. दिवसेंदिवस ती निराश होऊ लागली. यापुढे कोणी मुलगा तिच्याशी लग्न करील अशी तिला आशा नव्हती.

एके दिवशी संध्याकाळी गीताचे वडील ऑफिसमधून मोठ्या आनंदाने घरी परतले. आणि म्हणाले, पुढल्या रविवारी सहा वाजता एक मुलगा गीताला पहायला येणार आहे. हे ऐकताच गीताला फार दुःख झालं. तिला ओरडून म्हणावंसं वाटलं, बाबा थांबवा ही अवहेलना! मी जन्मभर लग्न न करता तुम्हा दोघांची सेवा करीन. नाहीतरी तुम्हाला मुलगा नाही. त्या ठिकाणी मला समजा. माझ्या लहान बहिणींच्यासाठी माझं कर्तव्य पार पाडण्याची संधी मला द्या. पुन्हा अपमानाची थप्पड खायला मला कोणापुढेही उभं रहायची इच्छा नाही. पण तिला आई-वडिलांची ससेहोलपट पहावत नव्हती. त्यांना दुखावण्याचं धैर्य तिच्यात नव्हतं म्हणून निमूटपणी येणाऱ्या मुलाला सामोरं जायचं तिनं ठरवलं. आणि रविवारी संध्याकाळी धडधडत्या अंतःकरणाने वाट पहात बसली.

रविवार संध्याकाळचे सहा वाजले. संध्याछाया हळूहळू पसरू लागली होती. समोरच्या झाडावर चिमणा-चिमणी एकमेकांच्या चोचीत चोच घालीत होते. आनंदानं उडत होते. पुन्हा एकमेकांच्या जवळ येत होते. किती आनंदात होतं चिमणीचं जोडपं! मंदिरातला घंटानाद लांबून तिला ऐकू आला आणि तिला तो नाद त्या वेळी शुभ वाटला. येणारा मुलगा

त्याचवेळी दरवाजातून आत आला. गीताने दाराच्या फटीतून त्याला निरखून पाहिलं तेव्हा तिला कळून आलं की, अल्लड तरुण मुलगा नसून तिशीच्या आसपासच्या गंभीरप्रकृतीचा माणूस आहे हा ! त्याचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व पाहाताच तिने आपली पसंती ठरवूनच टाकली आणि यशासाठी देवाजवळ प्रार्थना केली.

त्या तरुण माणसाने गीताला पाहिलं. पसंतीचा प्रश्नच नव्हता. गीता देखणी होती. तिचे डोळे विलक्षण बोलके होते. केस छान होते. तिच्या चेहऱ्यावर सात्त्विकपणा होता. तिची राहाणी नीटनेटकी अगदी साधी होती. आणि ती राजेशला आवडली. त्यांनी आपली पसंती गीताच्या वडिलांना लगेच सांगितली. नोव्हेंबरला लग्न जरुरीपुरत्या विधीने घरच्याघरी कोणताही खर्च न करता करायचं, हुंडा, देणं-घेणं मला मुळीच पसंत नाही. असं ठरवून तो सर्वांचा निरोप घेऊन निघाला.

गीता आणि तिच्या आईवडिलांना आनंदानं वेड लागायची पाळी आली. असा देखणा, शिकलेला काही अपेक्षा न करता, प्रथम पहाताचक्षणी लग्नाला तयार झाला. लग्नही साधेपणी व्हायला हवं ही अट घातली. अनेक शंकांनी त्यांच्या मनात वास्तव्य केलं. एखादं गुप्त व्यंग तर या मुलाला नसेल ना ? एखादेवेळी पहिलं लग्न झालेलं असेल, बायको आवडत नसेल म्हणून गुपचूप झपाटयाने दुसरे लग्न करीत असेल. यापेक्षा चांगलं काही निघालं तर मग पोरीचं भाग्यच म्हणायचं !

गीतानी वडिलांना सांगितलं, ‘बाबा. तुम्ही त्यांना माझा सर्व इतिहास सांगा. त्यांना फसवायचं नाही. आणि हे सर्व ऐकूनही ते लग्नाला तयार होत असतील तर मी लग्नाला तयार आहे. त्यांच्या या औदार्याखाली एखादं व्यंग असेल तरीही मग मी ते स्वीकारायला तयार आहे. तो माझ्या दुर्दैवाचा भाग समजेन. दुसऱ्या कुणाकडून तरी त्यांना कळण्यापेक्षा आपण स्वतःहून सांगणे जास्त योग्य !’ आणि तसा प्रयत्न गीताच्या वडिलांनी केला. पण राजेशनी कोणाला बोलण्याची संधीच दिली नाही. आपोआपच सर्व गोष्टींवर पांघरूण पडले. लग्न झाल्यावर पुन्हा ती गोष्ट उकरून काढण्यास कोणीही धजावलं नाही.

आज संध्याकाळी जेव्हा तिनें नरेशला पाहिला. तेव्हा तिला धक्काच बसला. राजेश आणि नरेश पुष्कळ दिवसांपासून एकमेकांना ओळखतात. त्या दोघांची गाढ मैत्री आहे. यावरून तिने अंदाज केला की नरेशनी राजेशला सर्व गोष्टी सांगितल्या असणार आणि नरेशला ती ओळखून होती.

'गीता, कोणत्या विचारात गढून गेलीस ?'

गीताची विचारमालिका तुटली. आणि ती म्हणाली,

'तुम्ही मला काही विचारलंत ?'

'मी इतकंच म्हणालो, तू नरेशला ओळखतेस का ?'

'होय !'

'ते कसं ?'

'तो आम्ही पूर्वी राहात होतो तेथील शेजाऱ्यांकडे पेईंगगेस्ट म्हणून रहात होता'

'एवढीच तुझी ओळख ? तेथे रहाणारी एक मुलगी ही नरेशची मैत्रीण होती ती मुलगी पण तुला माहीत असेल ?'

'कोणती मुलगी ?'

'बरेच वर्ष त्याचं एकमेकांवर प्रेम होत. तो लग्न करणार होता तिच्याशी?'

'नाही मी तिला ओळखत नाही.' गीताने खरी गोष्ट सांगण्याचं टाळलं. कारण त्यापासून तिला यातना होत होत्या. लग्नापूर्वी तिच मन सर्व हकिगत सांगण्यास तयार होतं. पण आता तिच्या सुखी संसाराला धक्का लागू नये, त्याच्यापासून दूर राहाण्याचा प्रसंग येऊ नये, म्हणून ती घाबरली होती.

'कमालच आहे तुझी ! तुमच्या कॉलनीतल्या सर्व लोकांना—लहान मुलाला सुद्धा गोष्ट माहीत होती आणि तुला माहीत नाही ? त्या मुलीचा प्रेमभंग झाला, ती बिचारी नाहक बदनाम झाली. आणि मुगळीकडे तिच्या नावानी डंका वाजला की नरेशपासून ती मुलगी गरोदर होती' राजेशनी गीताकडे निरखून पाहिलं.

'गीताची अवस्था अतिशय केविलवाणी झाली होती. तिच्या तोंडाला

कोरड पडली. ती थरथर कापू लागली. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. तो आणखी पुढे म्हणाला,

'नरेशनी त्या मुलीचं लेडी डॉक्टरकडून ॲबॉर्शन करवलं.'

गीताला वाटलं, बिछान्यावरून उठावं आणि खिडकीतून उडी घेऊन नाहीसं व्हावं. पण तिची सारी शक्तीच नाहीशी झाली होती. 'त्या लेडी डॉक्टरचं नाव सुद्धा यांना माहीत असणार!'

'तू त्या मुलीला ओळखत नाहीस?'

'नाही, मुळीच नाही! मुळीच नाही!' यावेळी गीताने जाणूनबुजून खोटं सांगितलं. गीता विचारात पडली. राजेश आपल्या गळ्यावर का सुरी चालवतोस? त्यापेक्षा एक घाव दोन तुकडे का करीत नाही?

'त्या मुलीबरोबर कोणी लग्न करण्यास तयार नाही. त्या बिचारीची काय अवस्था झाली असेल देव जाणे!'

शेवटच्या राजेशच्या वाक्यावरून तिला जरा हायसं वाटलं. राजेश तिला प्रत्यक्ष ओळखत नसावा अशी तिची समजूत झाली.

गीताने धीर धरून त्याला विचारलं,

'तुम्हाला सर्व गोष्टींची माहिती आहे मग त्या मुलीला तुम्ही ओळखत नाही?

'ओळखतो ना! जरूर ओळखतो!'

'तुम्ही...ऽऽतू...तुम्ही तिला तिला ओखळता?'

'होय.'

'कोण आहे ती दुर्दैवी मुलगी?'

'ती तेव्हाची दुर्दैवी पण आताची भाग्यशाली माझी पत्नी आहे आणि आता ती माझ्या बेडवर माझ्या शेजारी आहे.'

बाहेर निरव शांतता होती. त्यावरून रात्र बरीच झाल्याची जाणीव होत होती. रस्त्यावरचे दिवे आपले कर्तव्य चोख बजावत होते. त्यामुळें काळोखाचा भयानकपणा जाणवत नव्हता. लांब कोठे तरी कुत्र्याचे रडणे गीताला ऐकू आले. आणि मनात अशुभतेची पाल चुकचुकली. खोलीत कासावीस करणारी भयाण शांतता होती. गीताला आपले अश्रू आवरता येत नव्हते.

'गीता, तू रडतेस?'

गीताने उत्तर दिलं नाही. ती खळखळून रडत होती. बांध घालून अडवून ठेवलेला लोंढा सुटावा त्याप्रमाणे गीताचे आजपर्यंत साठवून ठेवलेले दुःख बाहेर पडत होते. राजेशनी तिला जवळ घेतली नाही आणि प्रेमाने तिला दिलासाही दिला नाही. त्याला माहीत होतं की ती फार दिवसाची दुःखी आहे आणि कोंडलेले दुःख मोकळं झालेलंच बरं म्हणून तो गप्प राहिला. पहिला दुःखाचा कड ओसरून जाताच ती थोडी शान्त झाली.

राजेशनी उठून ग्लासभर पाणी आणले. गीताने थोडे पाणी पिताच तिला बरं वाटलं. राजेशनी मोठा दिवा लावला. आणि गीताकडे पाहिलं तर गीता बेडच्या कडेला गुडघ्यात मान घालून हुंदके देत बसली होती. राजेश तिच्याजवळ गेला आणि आपला हात तिच्या खांद्यावर ठेवून तिला थोपटीत होता.

'मला माहीत होतं एक दिवस हे सर्व घडणार आहे म्हणून !'

'कोणता दिवस ? काय घडणार आहे ?'

'नरेशवर मी प्रेम केलं, त्यानंही त्या वेळी प्रेमाचं नाटक केलं. आम्ही लग्न करण्याचं वचन घेतलं, शपथा घेतल्या. आणि शेवटी त्यानं मला फसवलं. माझं सर्वस्व लुटलं. माझ्या कपाळी कलंकिणीचा टिळा मात्र त्यानं. लावला. माणसातून. जीवनातून मला त्याने उठविली. स्वतः लग्न केलं, घर थाटलं. माझं जमत आलं की याने ते लग्न मोडण्याचा इरादाच ठरवला होता. असं मी कोणतं पाप केलं होतं ? पाप केलेच असेल तर त्या गोष्टीला दोघंही जबाबदार होतो. पण समाजाच्या दृष्टीने गुन्हेगार मात्र स्त्री ठरते. आणि निसर्गही तिला जबरदस्त शिक्षा करतो. मी लग्न न करण्याचा निश्चय केला होता. परंतु आईवडिलांना दुखवणं मला जमले नाही आणि माझा निश्चय मी बदलला.

अनेक जणांनी मला पाहिलं, नकार दिला. पण तुम्ही पहिल्या भेटीतच आपली पसंती सांगितलीत. बाबांना तुमच्याशी बोलायचं होतं. पण तुम्ही ते ऐकूनच घेतलं नाहीत. नंतर काहीही सांगण्यात अर्थ वाटला नाही आणि धीरही झाला नाही. वाटलं काळाच्या उदरात घडलेलं कृत्य गडप झालं, तुम्ही मला परमेश्वराप्रमाणे वाटलात, अहिल्येचा उद्धार श्रीरामचंद्रांनी केला, तसा माझा उद्धार तुम्ही केलात. तुम्ही मला हक्काचं, मानाचं स्थान

दिलंत ! माझं घरकुल तयार झालं आणि त्या घरकुलात मी रममाणाही झाले. मी देवाची रोज प्रार्थना करू लागले. ' देवा, माझ्या संसाराला कोणाचीही दृष्ट लागू देऊ नकोस. माझ्याकडून तुम्हाला जितकं सुख देता येईल तितकं ते मी देईन. त्याच्यात जराही करमतरता होणार नाही. आणि आज त्यानं विषारी गरळ ओकली. या रहस्याचा उलगडा करून त्याला काय मिळालं ?'

' गीता, या गोष्टीचा मी अनेकवेळा विचार केलाय. मनुष्यामध्ये जे पशुत्व आहे ते कधी मरत नाही स्त्री-पुरुषांच आकर्षण ही नैसर्गिक भावना आहे. अनादिकालापासून चालत आलेल हे कोडं अनंतकालापर्यंन्त चालूच राहाणार आहे. स्त्री चटकन विश्वास टाकते, आणि फसली जाते. तुझंच पहाना तू चांगली शिकलेली मुलगी स्त्री पुरुषसंबंधापासून उदभवणारे धोके, हित अहित तुला माहीत नव्हत का ? तू नरेशवर प्रेम केलंस, विश्वास टाकलास, त्याची कुवत, त्याची योग्यता तू जाणली नाहीस, पुढे काय घडणार ते सर्व तुला माहीतच हाते, तूच काय अशा कितीतरी मुली फस-लेल्या आहेत. आयुष्यातून कायमच्या उठल्या आहेत.

एकदा स्त्री पूर्ण कह्यात आली की, पूर्ण उपभोग घेतल्यानतर, तिच्या-तील नावीन्य सपले की पुरुष दुसरी शिकार शोधायला मोकळा होतो. एक प्रतिष्ठित, सुशिक्षित वर्ग आहे तो तर बहीण, मुलगी या नात्याचं विडंबन करतो आणि स्त्री-सहवासाची आपली भूक भागवून घेतो. उघड उघड मैत्रिणीचे नात सागण्याइतकेही धैर्य त्याच्याजवळ नसतं. कारण त्याला आपलं घर, आपली प्रतिष्ठा टिकवायची असते. आणि दुसऱ्या स्त्री-सहवासाची लालसा असते. '

गीताजवळ तो बोलत होता गीता काहीच बोलत नव्हती. इतक्या गंभीरपणे विचार करण्याची तिची कुवत नव्हती. ती इतकंच म्हणाली, यापुढे मी या घरात कशी राहू ? पाच-दहा मिनिट राजेश गप्प राहिला व म्हणाला

' गीता, तुला येथून जाण्याचं कारण नाही. मी कोणी परमेश्वर नाही. सर्वसामान्य माणूस मात्र निश्चित आहे. आणि म्हणूनच गीता मी तुला सन्मानानी या घरात आणली आहे. तू उपकारकर्ता, देव वगैरे कोणत्याही

पदव्या देऊं नकोस. गीता तूच काय पण शुभाला सुद्धा ह्या सर्व विव्यातून जावं लागलंय '

' कोण शुभा, तिचं काय झालं ?

' अग, देखण्या बहिणीकडे अभिलाषेने पहाणारे नरपशू भाऊ समाजात आहेत. विकृत मनोवृत्तीच्या माणसाला बहीण भावाचं पवित्र नातंही दिसेनासं होतं गीता, आजकालच्या जमान्यात कोण कोणाला सांगणार ? आणि ऐकणार कोण ? समाजाची घडीच विस्कटली आहे. मुलीसुद्धा वाटेल तशा मुलांच्याबरोबर फिरत असतात. तासा-दोन तासासाठी हॉटेल्समध्ये खोली रिझर्व्ह करतात. आणि शरीराची भूक भागवून घेतात. सिनेसा, पिक्निक्स यातही मुली धुंद होतात. इतकंच काय सिगरेटसुद्धा मुली खूप मोठ्या प्रमाणावर ओढतात. मनुष्यामध्ये जी कामपिपासा उत्तम होते ती नातं पहात नाही. '

राजेश सारखा बोलत होता. त्याला अंतरिक तळमळ वाटत होती. वास्तविक कौमार्याचा भंग पतीने साज शृंगारानी पहिल्या वहिल्या रात्री केला जात असे. पण आजच्या परिस्थितीत कुठल्यातरी उपटसुंभ्याने तो आधीच केलेला असतो. असा विचार मनात येत तो पुढे म्हणाला,

नरेशकडेच पहाना आज तुझ्याकडे डोळे उघडून पहाण्याचं त्याच्या अंगात सामर्थ्य होतं का ? एकवेळ तुझ्या शरीराचा तो हक्कदार होता. आणि आज तुला स्पर्श करण्याची त्याची हिंमत नव्हती. वर्षादीडवर्षापूर्वी तू त्याची प्रेमिका होतीस आणि आज तू त्याची वहिनी आहेस. एकच स्त्री पण नातं बदलत गेलं. पुरुष कितीही शिकला सवरला तरी त्याची वृत्ती राक्षसी आहे. स्त्रीची अब्रू, तिचं सौंदर्य, तिचं तारुण्य याचं वास्तविक पुरुषानं रक्षण केलं पाहिजे.

बाजार मांडून बसणारी स्त्री मिळवणं संसारिक पुरुष मनात आणील तर त्याला मिळणं कठीण नाही. तिचं शरीर तो काही क्षण विकत घेऊ शकेल. पण त्याच स्त्रीजवळ तिचा भाऊ झोपू शकणार नाही. तिचा भाऊ बहिणीसाठी गिऱ्हाईक शोधून आणेल तो त्यासाठी दलाली करेल. पण तिच्या शरीराचा फायदा घेणार नाही. दोन वर्ष झाली त्या गोष्टीला. अशाच एका रात्री शेजारच्या खोलीत मी, नरेश आणि शुभांगी बसलो होतो.'

' कोण आहे ही शुभांगी ?'

'ती एक स्वैरीण आहे. मात्र भांगात सिंदूर घालते. तिच्या प्रियकरानं लग्नाचं वचन दिलं होतं. त्यानं आपल्या हातानं तिच्या भांगात सिंदुर भरला होता. प्रियकरानं भरलेल्या सिंदुराची निशाणी, स्मृती घेऊन शुभांगी आपलं शरीर विकतेय. ती फसवली गेलेली मुलगी आहे. स्वतःच्या सौंदर्यानं तिचा घात केला तेच सौदर्यं स्वतः होऊन विकतेय. सूड घेतेय. स्वतःचा ! ज्या मुलानं तिचं ताजं रसरशीत गलाबाच्या फुलाप्रमाणे असलेलं तारुण्य निर्माल्या-प्रमाणे केलं. परत येण्याचं वचन देऊन निघून गेला. आणि दोन तीन महि-न्यांनी कळवलं आपलं लग्न पूर्वीच झालेलं होतं. शुभा नुसती फसली गेली नव्हती तर अडकली होती. शुभाला दिवस गेले होते. शुभांगी बेफाम झाली होती. आत्महत्या करायला गेली होती. मी तिला त्या वेळी वाचवली ती आपली कामुक इच्छा पुरी करण्यासाठी स्वैर वर्तन करत नाही. ती सूडाच्या भावनेनं पेटून गेलीय. लोक तिचा कसाही फायदा घेवोत किंवा तिला काहीही म्हणोत, समाजाच्या दृष्टीने ती स्वैरणी असेलही पण माझ्या दृष्टीने मी तिला पापी म्हणणार नाही. शुभांगीचं जाऊ दे. मी तुला काय सागत होतो ?

हं, त्या रात्री नरेश फार काळजीत होता स्त्री डॉक्टरची चौकशी करत होता त्यासाठी त्यानं माझी मदत मागितली. मला कोणी स्त्री डॉक्टर माहीत नाही. म्हणून शुभांगीला विनंती केली. सर्व ऐकून शुभांगी काय म्हणाली माहीत आहे ? मी तुम्हाला जरूर मदत करीन, पण एका अटीवर, प्रथम मला वचन द्या की, त्या मुलीबरोबर लग्न करीन म्हणून. माझ्या समक्ष त्यानं वचन दिलं, शपथसुद्धा घेतली. त्या रात्री शुभा म्हणाली होती. स्त्रीला वेश्या बनवणं कठीण नाही परंतु स्त्रीला वेश्या होऊ न देणं कठीण आहे. आणि तू येथून निघून जाणार म्हणतेस ? गेलीस तर तुझी परिस्थिती काय होईल याचा विचार केलायस ?

मी आलो, तुला पाहिली, तुझ्याशी लग्न करून तुला या घरात माझी पत्नी, गृहलक्ष्मी सौभाग्यलकार घालून गृहिणी म्हणून घेऊन आलो. आणि तू निघून जायचा विचार करतेस ? तुझ्या पुढील परिस्थितीचे वर्णन माझ्या तोंडातून करणं अशक्यच आहे. शुभांगी म्हणाली ते खोटं नाही. पुरुषानं मनात आणलं तर स्त्रीला देवता बनवणं कठीण नाही. तू येथून गेल्यावर तुझी परिस्थिती आणि शेवट काय होईल ? या समाजात तुझं स्थान कोणतं ?

तू कोणाच्या आधाराला जाशील ? स्त्री कितीही शिकली तरी लहानपणी पिता व भाऊ आणि मोठेपणी नवरा आणि मुलगा हे आधार नसतील तर त्या स्त्रीची विटंबना डोळे उघडून समाजात काय होतेय ते जरा पहा.

गीता, तू फसली गेलेली, समाजाने कलंकित ठरवलेली ! तुला मी मानाचं स्थान दिलंय, माझ्या घराची छाया तुझ्यावर आहे आणि म्हणून तू येथून जाता कामा नये. हे हक्काचं तुझं घर सोडून तू दूर गेलीस तर तुला कोणताही पुरुष काही क्षणापुरता जवळ करील, परंतु मान, घर, सन्मान काही देणार नाही. मी साधासिधा माणूस आहे. तू विचार कर !

अग तुला असं वाटतयं का की या रहस्याचा उलगडा आज झालाय म्हणून मी तुझा तिरस्कार करीन ? असं असेल तर तुला काळजी करण्याचं मुळीच कारण नाही. मी कबूल करतो की माझी फार मोठी चूक झाली. आणि त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याचीही माझी इच्छा आहे मी नरेशच्या मदतीला धावून लेडी डॉक्टरची व्यवस्था न करता तुझ्याबरोबरच त्याला लग्न करायला भाग पाडायला हवं होतं. तुझी यात काहीही चूक नाही. आणि ही चूक नरेशची आहे किंवा नाही याचा निर्णय काळ देईलच. तू मला आधी वचन दे, मी येथून जाणार नाही म्हणून.

गीत,ा नरेशची भीती तू बाळगू नकोस. ज्या दिवशी शुभांगीला तो प्रथम भेटला तेव्हा त्यानं असा आविर्भाव केला म्हणून सांगू ? आपण चारित्र्यवान्, सत्यवक्ता, हुशार आहोत असं दर्शवून गीता, त्यानं शुभांगीला तुच्छ लेखलं. म्हणाला, प्रियकरानी तुमच्या भांगात सिंदूर भरला होता. त्याचं पावित्र्य राखायला हवं होतं पण मी तुला सांगतो, जे लोक स्वतः दुर्व्यसनी, दुर्गुणी असतात ते मोठ्या सभ्यतेचा आव आणून व्याख्यानबाजी करतात. वेश्यांना कमी लेखणं, त्यांचा तिरस्कार करणं, हा त्यांच्यावर अन्याय आहे. पण स्त्री वेश्या का बनली जाते याचा विचार कोणी करत नाही. वेश्येच्या जीवनातून तिची सुटका करायला कोणी तडफडत नाही. कायद्याचा आधार घेऊन वेश्यांचा बाजार बंद केला जातो. पण चोरटा व्यापार केवढ्या मोठ्या प्रमाणात चालू आहे. कायदा किंवा सरकार वेश्येचा धंदा थांबवू शकत नाही. कायद्यानी बंदी झाली की प्रतिबंध झाला असं तुला वाटतं का? अशक्य अगदीचं अशक्य ! हे थांबविण्याचं काम आम्हा तरुण पुरुषांचं आहे.'

गीताला समजेना आपण काय बोलावं ते ! ती गप्पच होती.

'गीता तू प्रॉमिस दिलं नाहीस हं ?'

'कशाबद्दल ?'

'तू येथून जाणार नाही म्हणून, माझे विचार तुला समजले नाहीत तरी हरकत नाही. तू इतकंच समज जें आज तू सांगितलंस ते मला नवीन नाही. लग्नाच्या पूर्वीच मला माहीत होत. तरीसुद्धा मी तुझ्याशी लग्न केलं कारण मी तुला आणि तुझी परिस्थिती जाणून होतो आणि म्हणून योग्य तेच केलं.'

'मी वचन देते. तुम्हाला सोडून मी कुठंही जाणार नाही.' गीताने मोठ्या धैर्यानं सांगितलं.

* * *

राजेशनी मोठ्या आनंदाने दिवा बंद केला आणि मग गीताला मिठीत घेतलं. गीताला खरा प्रकाश मिळाला. त्या दोघांचं मीलन खिडकीतून चंद्रप्रकाशात उजळून निघालं. प्रसन्न चंद्रमा हसत होता. भरती आलेल्या समुद्राच्या फेसाळ लाटा खळखळाट करून धक्क्याला आलिंगन देत होत्या.

संध्याकाळी कृष्णछाया हळूहळू साऱ्या परिसरात पसरू लागली. सोसाट्याचा वारा झंझावाताने वाहू लागला. धुळीचे कण, वाळलेली पाने, सगळीकडे उधळून गेली, पक्षी थव्याथव्याने आपल्या घरट्याकडे परत निघाले होते. गुरे रानातून कळपा कळपानी गुराखी हाकून गोठ्याकडे आणत होते. कोठेतरी दूर मंदिरातला घटानाद ऐकू येत होता. सारं वातावरण गंभीर आणि उदास झालं होतं. आणि राजेशला शुभांगीची तीव्रतेनं आठवण झाली. गेल्या कित्येक महिन्यात ती भेटली नाही. बाहेर पडणं यावेळी अशक्य होतं, नाहीतर तिला भेटायला तो गेला असता. मनातल्या विचारासरशी राजेश व्हरांड्यात येऊन वादळाचा अंदाज घेऊ लागला. इतक्यात त्याला दारावरची बेल ऐकू आली. आणि त्याने दार उघडलं. क्षणभर डोळ्यावर विश्वासच बसेना. दारात शुभांगी उभी होती.

'शुभा तू ? अग तुझाच विचार करत होतो. किती दिवसांत आपली भेट झाली नाही ?'

'थट्टा पुरे बाबूराज ! तुम्हाला आणि माझी आठवण ? गीताभाबी कोठे आहे ?'

गीताला राजेशनी हाक मारली. 'ओहो ! हा धुमकेतू आज उगवलाय होय ?' गीता तिला पहात म्हणाली.

'शुभा, आज हा पांढरा शुभ्र पोषाख, भांगात सिंदूर नाही. हे आहे काय ? कोणत्या महाराजांची दिक्षा घेतलीस की काय ?' राजेश.

शुभांगी एकदम गंभीर झाली. आणि तिच्या डोळघातून घळघळा अश्रू ओघळू लागले. आणि ती म्हणाली,

'ती एक कहाणी आहे. तीच मी तुम्हाला सांगून अखेरचा निरोप घ्यायला आले आहे.'

तिघेही गंभीर झाले होते. शुभांगी काय सागणार इकडे गीता व राजेश यांचं लक्ष लागून राहिल होतं. शुभांगी सांगू लागली.

'एक दिवस अचानक एक पत्र आलं. पत्रावरचं हस्ताक्षर ओळखीचं वाटलं. क्षणभर वाटलं तसंच पत्र केराच्या टोपलीत टाकावं, किंवा काडी लावून जाळून टाकावं. ज्यानं माझं आयुष्य उधळून टाकलं त्याचं पत्र जाळायला मला कोणती हरकत ! पण राजबाबू, सताप-राग आला तरी मला राहावलं नाही. मी पत्र वाचलं. अक्षर थरथरत्या हातानी लिहिलं होतं. ते पत्र विश्वनाथचं होतं. त्यानं लिहिलं होतं 'शुभा, तू मला भेटायला येशील का ? मला तुला भेटावंसं फार वाटतं. पण कोणत्या तोंडाने तुला ये म्हणू ? तुला तोंड दाखवायला मला जागाच नाही. पण शुभांगी तू एकदा येऊन मला भेट. मला तुझी क्षमा मागायची आहे. त्या शिवाय मला मरण येणार नाही. मी हे पत्र मृत्यूच्या उबरठ्यावर असताना लिहितोय. माझ्या पत्रावरून तुझी खात्री पटेल. रूम नंबर १९, तिसरा मजला, टाटा मेमोरियल हॉस्पिटल–' तुझा एकेकाळचा आवडता, 'विश्'

बाबूजी पत्र हातातून गळून पडले. पूर्वीचे सोन्याचे दिवस आठवले. विश्वनाथ मृत्यूच्या दारात उभा असलेला कळताच त्याच्यावर असलेला राग, आणि भांडण विसरून तडक हॉस्पिटमध्ये गेले. माझं मन बधीर झालं होतं. छाती धडधडत होती. संध्याकाळची ती कातरवेळ, विश् एकटा बिछान्यावर होता. खूप फिकट दिसत होता. डोळे खोल गेले होते. मला

पहाताच त्यानं दोन्ही हात पुढे केले. मी धावत त्याच्या मिठीत शिरले. त्याला जे सांगायचं होतं ते नुसत्या स्पर्शाने बाबूराज मला समजलं. गदगदून आम्ही दोघं पोटभर रडलो. तो रुग्णशय्येवर अखेरचे दिवस मोजत होता. मागचं उणंदुणं काढून मन जराही दुखवावंसं मला वाटलं नाही. त्याला थोपटीत मी म्हटलं, 'काय रे ही तुझी दशा ? किती वाळलास ?'

'शुभा, मी थोडया अगदी थोडया दिवसांचा सोबती आहे. मला लिव्हरचा कॅन्सर झालेला आहे. येथे येऊन दोन आठवडे झाले. रोज तुला पत्र लिही आणि फाडून टाकी. वाटलं तुला कळवूच नये. पण रहावेना. डोळे मिटण्यापूर्वी मला तुझी भेट घ्यायची होती आणि क्षमा मागायची होती. तुझी प्रतारणा केल्याबद्दल मला जबरदस्त प्रायश्चित्त मिळाल आहेच. याक्षणी तुझी क्षमा मागण एवढंच मी करू शकतो.'

बाबूराज, त्याची ती अवस्था पाहून मला फार फार दुःख झालं. मी मनात म्हणाले, देवाने त्याला ही शिक्षा करायला नको होती. मी त्याला विचारलं, 'तू एकटाच आहेस का ? तुझी पत्नी तुझ्या सोबतीला नाही ?'

हं ! असा दीर्घश्वास घेऊन तो म्हणाला, 'शुभा, मला फार एकटं वाटतं ग ! मी तुला सोडून गेल्यानंतर तू एकटीने कसे दिवस घालविले असशील याची जाणीव मला आत्ता होतेय. या विचाराने माझा जीव कासावीस होतोय.'

त्याचवेळी वाटलं, त्याला सांगाव मी एकटी मुळीच नाही. दुकान मांडून बसल्यावर गिऱ्हाइकाना काय तोटा ? एकटेपणाची जाणीव व्हायला फुरसत तरी हवी ना ? पण राजबाबू हे शब्द मी गिळले आणि निश्चय केला मृत्युशय्येवर पडलेल्या विशूला देता येईल तेवढं सुख आणि समाधान द्यायचं.

मी त्याला विचारलं, 'विशू तुझी पत्नी कोठे आहे ? मला पाहून तिच्या मनात काही शंका नाही ना यायची ?'

'ती सिनेमाला गेली आहे. तिला येथे बसायला आवडत नाही. मधून मधून येऊन जाते. दुखणेकऱ्याजवळ बसणं ही केवढी शिक्षा ! त्यातून माझा शेवट ठरून गेलाय, शेवट ठरून गेलेल्या माणसाजवळ बसणं फार कठीण ! तू म्हणालीस तिला काय वाटेल ? शुभा, तिला काहीही वाटलं तरी मी

त्याची फिकिर कशाला करू ? तू परत आलीस यातच मला सर्व मिळा-लंय.' बाबूजी त्याच्या शब्दामागे केवढीतरी मोठी व्यथा दडलेली होती हे माझ्या लक्षात आल्याशिवाय कसं राहील ?'

गंभीरता घालविण्यासाठी आणि विषय बदलण्याच्या हेतूनं मी म्हणाले, 'किती सुंदर आहेत रे ही फुल ? पाहिलंस ही फुल, ती पान, त्याचे रंग' 'रोज पहातोय शुभा. चिवचिव करणाऱ्या त्या चिमण्या, गच्चीवर जाणारी येणारी माणसं, सध्याकाळच्यावेळी व्हील चेअरवर बसून रस्त्यावरची नित्याची धावपळ पहाणं हाच माझा विरंगुळा आणि सिस्टरचा सहवास ! मोठ्या लाघवी आणि बोलक्या आहेत. त्यांच्या सहवासात माझ्या वेदना मी विसरण्याचा प्रयत्न करतो. पण शुभा, माणसाला यापेक्षा आणखी काहीतरी हवं असतं ?'

माझं लग्न एका श्रीमंत, नखरेल, सुंदर परंतु उर्मट पोरीबरोबर झालेलं होतं बाबांनी आपल्या मित्राला मरताना वचन दिलं होतं किती लहानपणी! शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच माझं लग्न झालं होतं. येथे तुझ्या सहवासात, इतकी नम्रता, विनय, प्रेम करणारी स्त्री असतं हे मला कळलं. तुझा मोह मला पडला तुझी प्रतारणा करावी लागली. तुला मी लागेल असा जिव्हारी घाव घातला. पत्रात ! मी वैतागलो होतो. उगाच अशा दाखविण्यात काय अर्थ होता ? मी तुला एक क्षणही विसरू शकलो नाही. यातच काय ते समज. तुझ्यासारख्या सात्विक मुलीला मी काय दिलं ? चिखलात उगवलं तरी ते सुंदर कमळ. त्या कमळाला परमेश्वर डोक्यावर घेऊन त्याचा सन्मान करतो हे माझ्यासारख्या बुद्धूकाला फार उशिरा कळलं. आणि जेव्हा सम-जलं तेव्हा मी निराळ्याच मार्गानी निघालो होतो. शुभा, एकदा तरी म्हण ग की, 'मी तुला क्षमा केली म्हणून.'

'मी क्षमा करणारी कोण ?' प्रत्येकाच्या नशिबी जे लिहिलं असेल तेच खरं झालं. झालं गेलं त्याचा आता शोक करण्यात काय अर्थ आहे ? किती वेळ आमचे एकमेकांचे हात हातात घेऊन बदलते संध्यारंग आम्ही पहात होतो.

वि...७

त्याच्या क्षीण हाडकुळ्या हातात कमालीची आपुलकी होती. जुन्या आठवणीचे दप्तर उघडले गेले. त्याचा चेहरा उजळला. तो सुखावलेला पाहून मला फार समाधान वाटलं. बाहेर अंधार दाटून आला. हवेत गारठा वाढला. मी व्हील चेअर खोलीत आणली. इतक्यात नर्स औषधाचा ग्लास घेऊन आली. थर्मामीटर लावलं आणि म्हणाली पेशंट अगदी खुषीत आहे. आल्या दिवसापासून पहाते आजच्या इतके आनंदी त्यांना कधीच पाहिलं नाही. नर्स आपलं काम आटोपून निघून गेली.

खोलीचं दार हळूच उघडलं गेलं. आणि हळूच एक आकर्षक पोषाखातली सुंदर स्त्री आत आली. तिची हेअर स्टाईल, तो पोषाख सारच आकर्षक होतं. तिच्याबरोबर एक अद्ययावत पोषाखातला तरुण आत आला. विशूला प्रकृतीबद्दल एक दोन प्रश्न विचारून त्या सुंदर स्त्रीचा निरोप घेऊन निघाला. त्याला तिने प्रेमानं निरोप दिला. उद्याचा वायदा पक्का केला आणि 'विशू' जवळ येत म्हणाली,

'पिक्चर अगदी बंडल होतं. पण माझा वेळ मजेत गेला. आणि या कोण?'

'ही माझी मैत्रीण शुभांगी. चार वर्षांपूर्वी मी येथे होतो ना त्या वेळची ओळख. आणि शुभा ही माझी पत्नी सुरेखा.'

मी अवाक् होऊन पहातच राहिले. मला वाटलं विश्वनाथला भेटायला कोणीतरी जोडपं आलं असावं. कामाच्या घाईत ते पत्नीला सोडून गेले असावेत. सिनेमाहून परस्पर हे जोडपं आलेलं होतं. आणि आता कळलं ती विशूची पत्नी. सुरेखा नावाप्रमाणे सुरेख होती. सडसडीत बांधा, गोरापान रंग, बारीक सरळ नाक, लहानशी जिवणी. दिसायला मला आवडली. नवरा मृत्युशय्येवर दिवस मोजत असताना हिला हे सर्व सुचल तरी कसं? ती हेअर स्टाईल, तो मेकअप मी अगदी अवाक् झाले. विश्वनाथचं एकूण जीवन माझ्या लक्षात आले. त्याहीपेक्षा मला धक्का बसला तो– दुसऱ्या पुरुषाबरोबर सिनेमाला ही बाई जाते? मला वाटल मला पाहून हिच्या कपाळाला आठी पडेल, पण उलट तिला मी आल्यानं बरंच वाटल. ती तेवढी भटकायला मोकळी झाली.

विश्वनाथ आणि सुरेखाच्या आग्रहामुळे मी रात्रदिवस हॉस्पिटलमध्येच होते. त्यामुळे सुरेखाला मोकळीक मिळून ती माझ्यावर खूष होती. विश्वनाथ

साऱ्या वेदना एकटा सहन करत होता. त्याला बरं वाटावं म्हणून रात्रंदिवस त्याची साथ मी करीत होते. त्याची परिस्थिती पाहून मला गलबलून येत होतं. माझं मन आक्रोश करून उठे. मनात विचार येई की ही शिक्षा याला का व्हावी ? त्याने अनेकवेळा मला विचारलं ‘ लग्न का केलं नाहीस.’ पण मी कांही उत्तर दिलं नाही व माझ्या धंद्याचाही थांगपत्ता लागू दिला नाही. देवानं दिली हीच इतकी कठोर शिक्षा दिली होती की, त्याला काही आणखीन सांगून दुखवावं असं मला वाटलंच नाही.

दिवसेंदिवस विशूचं दुखणं वाढत गेलं. ज्योत मदावत होती. क्षणाक्षणानी मृत्यूची पकड आवळली जात होती. आणि अखेर कालच त्याचा त्या दुखण्यात शेवट झाला. मी शेवटपर्यंन्त त्याच्याजवळच होते. यातच मी समाधानी होते. माझा त्रागा संपला बाबूजी. विशू गेला. आता त्याचा स्पर्श हाच पुरुषाचा अखेरचा स्पर्श ! ! आता मला अधिक काळ जगता येणार नाही. त्यानं मृत्युपत्रात माझ्या नावे पन्नास हजाराची रक्कम ठेवली आहे. पण मला त्याच काय ? ती त्याच्या बायकोच्या नांवावरच मी करणार आहे. त्याच्यावर माझा हक्क आहे असे मी समजत नाही.

आता त्याच्याजवळ जाण्याची ओढ मला लागली आहे. तुम्हाला अन् भाबीला भेटणं माझं कर्तव्य होतं म्हणून मी आलेय ! आता जाते कायमची ! माझा शोध घेऊ नका. ’

असं म्हणून ती निघून गेली ती दोघं मंत्रमुग्ध होऊन दाराकडे पहातच राहिली. नकळत त्यांचे हात तिच्या जाण्याच्या दिशेने जोडले गेले.

* * *

राजेशला प्रमोशन मिळाले. पगार वाढला. आपली नोकरी चांगल्याप्रकारे संभाळून लिहिण्यावर त्याने बराच भर दिला होता. निरनिराळ्या नियतकालिकांतून, मासिकांतून तो लिहीत असे. लोकांना त्याचे परखड विचार आवडत, त्याच नाव चांगलंच पुढे आलं. त्याने एक स्वतंत्र स्थान मिळवलं. पैसेही चांगले मिळत. त्याचे लग्न झाल्यानंतर गीता एकदाही घर सोडून माहेरी गेली नव्हती. आणि राजेशलाही तिकडे तिने जाणं पसंत

नव्हतं. कारण आजूबाजूचे तेच वातावरण, गप्पांचा तोच तोच विषय, नातेवाईक, गल्लीतील माणसं काहीतरी बोलल्याशिवाय रहाणार नाहीत. आणि त्याचा परिणाम गीतावर होईल. सुखानी चाललेल्या संसारावर मागची काळी पडछाया पडायला नको होती. गीताच्या बहिणी मधून मधून येऊन भेटून जात होत्या. आई-वडिलांनी समाधानाचा सुस्कार सोडला होता. आपल्या मुलीचं भवितव्य काय, या काळजीत ती दोघं अहोरात्र झुरत होती. यातून सुटका नाही. आपली सुस्वभावी देखणी मुलगी फसली गेली. तिचं आयुष्य चुरगळून गेलंय ते कधीच फुलणार नाही. आपणाजवळ पैसे नाहीत. ते दोघं म्हणत, पैसा फार मोठं साधन आहे. म्हण आहे– श्रीमंतांनी खाल्ल तर औषधासाठी, आणि गरिबांनी खाल्लं तर पोटासाठी– कितीतरी अशी उदाहरणं आहेत. भरमसाट पैसा ओतून मुलींच्या कृत्यावर पैशानी पांघरूण घालून संसार उभारलेले पहातो आहांत, पण आम्ही गरीब. वडील तळमळत आणि आई डोळ्यातून अश्रू ढाळीत असे. अशी ती दोघं निराशेनं आलेला दिवस मागे सारत होती. आणि ...

अशाच एका दिवसात आजचा किरणच गीताचे जीवन उजळीत होतं, गीतेचं जीवन उजळून टाकलं होतं. समस्या संपली होती. शेजारी-पाजारी, आप्त-स्वकीयांना धक्का बसला होता. त्यांचा विश्वासच बसेना. त्यानी आपल्या अकलेचं प्रदर्शन मांडलं. ती म्हणत असेल कोणीतरी मूर्ख उडाणटप्पू, बेवारशी किंवा गुप्त रोग असलेला असेल म्हणून केलं असेल लग्न. चांगला प्रतिष्ठित मुलगा लग्न कसा करील. राजेशनी लग्नात काळी पोत आणि मंगळसूत्राच्या पिवळ्या दोन वाट्या आणि साधारण किंमतीच्या तीन साड्या आणि दोन तीन मित्र यांच्या समवेत रजिस्टर लग्न केलं होतं.

गेले सहा-सात महिन्यांत तिने अमुक गोष्ट पाहिजे. अशी कधी मागणी केली नव्हती. राजनी कधी फिरायला बरोबर नेले तरी मागणी तर राहोच पण कधी सिनेमा, नाटक अगर फिरणे त्याच्या सवडीनुसार तो ठरवेल त्यात ती आनंदाने सहभागी होई. राजेशचे तिच्याशी वर्तन लाघवी, सौम्य आणि आदरणीयच असे. त्यानं तिची अवहेलना, घालून पाडून बोलणं असं घृणास्पद वर्तन कधीच केलं नाही. त्याच्या वागण्या-बोलण्यात रसिकता होती. उत्साह होता. गीता सुशिक्षित होती. बरोबरीच्या बुद्धिवान मित्राशी

गप्पा माराव्यात तशा गप्पा तो गीताशी मारी. दर चारदोन दिवसांनी घरात काही वस्तू पाहिजे का तो चौकशी करी. घरी खर्चाला तो प्रत्येक महिन्याला तिला पैसे देत असे.

गीता उत्तम गृहिणी होती. घरखर्च व्यवस्थित संभाळून काही ना काही शिल्लक टाकीत असे आणि राजेशकडे परत करीत असे. संध्याकाळी बाहेरून येताना मोगरीचा गजरा किंवा काही ना काही वस्तू आणत होता. दोघं गप्पा मारत हसत खेळत पुढले बेत करीतच रोज चहा घेत. आज ती त्याला म्हणाली,

'आपला दोस्त भेटायला आला होता.'

'माझा दोस्त ?'

'हो'

'कोण ?'

'तो ... ... तो ... ... त्याचं नाव' घ्यायला गीता नाखूष होती.

'हुं ! समजलो नरेश ?'

गीतानी मानेनीच होकार दिला.

'काय म्हणाला ?'

'तुमची चौकशी केली.'

'त्याला थांबायला का सांगितलं नाहीस ?'

'मी बसायला सांगितलं आणि मी आत गेले तोच एकदम दार लावल्याचा आवाज आला. मी बाहेर येऊन पाहाते तर तो निघून गेला होता.'

'याचा अर्थ उघडच आहे की तू त्याला चहाही विचारला नाहीस ?'

गीता काहीच बोलली नाही.

'जाताना काय म्हणाला ? काम काय होतं ते त्यानी सांगितलं का ? पुन्हा केव्हा येणार आहे ?' राजेशनी प्रश्न विचारले.

'मला काहीच माहीत नाही व निरोप सांगितलाही नाही.' •

राजेशनी सिगरेट पेटवली व म्हणाला, 'येईल परत !'

गीता दोनतीन मिनिटं तशीच उभी राहिली. राजेश कोचावर सिगरेट ओढत बसला होता. त्यानं गीताला बसायलाही सांगितलं नाही. तो सांगण्याची ती वाट पहात होती. राजेश कसल्या तरी गंभीर विचारात होता.

गीताने आत जाऊन ट्रे मध्ये एकच कप चहा आणि एक बशी फोडणीचे पोहे आणले. टेबलावर ठेवून ती तिथेच उभी राहिली. थोडघा वेळाने म्हणाली, 'चहा थंड होईल.'

राजेशनी कप उचलून तोंडाला लावला. त्यानं गीताला विचारलंही नाही. 'तू एकच कप चहा का आणलास ? तुझा चहा झाला का ?' नेहमी दोघे गप्पा मारत, हसत चहा घेत. त्याला कितीही उशीर झाला तरी त्याच्याशिवाय ती कधीच चहा एकटी घेत नसे. राजेशला माहीत होतं. गीता जवळच उभी आहे. आणि तिला बोलायचं आहे, पण त्यानी तिला विचारलं नाही. सांगण्यासारखं असेल तर सांगेल आपण होऊन म्हणून तो गप्पच राहिला.

'मला तुम्हाला काही सांगायचंय' गीता म्हणाली.

तिच्याकडे मान वळवून न पहाताच तो म्हणाला,

'सांग ना !'

तिला सांगायला शब्दच सापडत नव्हते. त्याचा उच्चार करावासा वाटत नव्हता. ती हताश झाली होती. शेवटी मोठ्या धैर्याने म्हणाली,

'तुमचा मित्र तुम्हाला बाहेर भेटू शकणार नाही का ?'

'का ग, तुला त्याचं येणे पसंत नाही का ?'

'माझ्या पसंती नापसंतीचा प्रश्न येतोच कोठे ?'

'गीता, तुला अजून वाटतं का की, तुझ्याकडे तो वाईट नजरेने पहातोय ?'

लग्नाला वर्ष–दीडवर्ष होऊन गेले. या अवधीत गतगोष्टींची कोणीही चर्चा केलेली तिच्या कानावर पडली नव्हती. त्यामुळे तिच्यात एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला होता. ती उत्तम गृहिणी होती. आजूबाजूचे लोक त्यांना आदर्श पति–पत्नीचे जोडपे म्हणून ओळखत होते, पण आवारा, कलंकिनी, उनाड अशा शब्दांची आज उजळणी झाली. निर्भर्त्सना तिला सहन झाली नाही. फारफार दुख झालं होतं. राजेशच्या प्रश्नाला तिने उत्तर दिलं नव्हतं.

तो पुन्हा म्हणाला, 'मला वाटतं तुला त्याची भीती बाळगण्याचे कांहीच कारण नाही. तो येथे मोकळेपणी येईल. मी असताना अगर माझ्या गैरहजेरीत, वेळी–अवेळीही येईल. मी माझ्या घराचे दरवाजे त्याला कधीच

बंद करणार नाही. मला पूर्ण माहीत आहे, त्याला माझ्या मदतीची जरुरी आहे. पावलोपावली माझ्या सल्ल्याची त्याला गरज आहे. आणि त्याला मदत करणं माझं कर्तव्य आहे. या अवस्थेत त्याला घरी येणं बंद करणं बरोबर होणार नाही. तुझ्याबद्दल विचार करावयाचा तर तू आपल्या पायावर खंबीरपणे न डगमगता उभी रहाशील तर जगातली कोणतीही शक्ती तुला भ्रष्ट करणार नाही. गीता, मी तुझी परीक्षा पहात नाही. तुझ्यावर माझा संपूर्ण विश्वास आहे. एक पुरुष स्त्रीला इंद्राप्रमाणे भ्रष्ट करतो तर दुसरा पुरुष प्रभूरामचंद्राप्रमाणे अहिल्योद्धार करतो. नरेश माझ्या अनुपस्थितीमध्ये येथे आला तरी मला संशय येणार नाही. इतकंच नव्हे तर त्याची तुझ्याकडे डोळे वर करून पहाण्याची हिंमत होणार नाही. एकांतपणाच्या संधीचा फायदा उठविण्याचे धैर्य त्याला नाही. तेव्हा तू निर्धास्त रहा.'

'माझा स्वतःवर संपूर्ण विश्वास आहे.'

'मग तुला भिण्याचे मुळीच कारण नाही. तुझं मन शुद्ध आहे. तेव्हा तुझा संसार कोणीही बिघडवू शकणार नाही.'

खोलीत तीनचार मिनिटं शांतता होती राजेशने सिगरेट पेटविली आणि गीता स्वयंपाक घरात गेली. थोड्याच वेळात राजेश कोणालातरी मोठ्यांदा म्हणाला, 'या, या दरवाजा उघडाच आहे' त्याला वाटलं नरेश परत आला असावा परंतु दारात नरेश नसून उर्मिला उभी होती. 'नमस्ते राजूभय्या' म्हणत ती आत आली.

'हे इकडे आले होते?'

'नरेश आला होता. मी घरी नव्हतो. दोन मिनिटे थांबला नाही. निघून गेला. कदाचित् एवढ्यात येईलही परत ! '

उर्मिलाने दोन्ही हातांनी डोकं दाबून दीर्घश्वास घेतला आणि म्हणाली,

'मला खात्री होती ते येथेच येतील म्हणून ! '

'उर्मिला सर्व ठीक आहे ना? तुम्ही दोघे असे निरनिराळे आलात आणि तू त्याच्या शोधात आहेस की तुला असं म्हणायचं की तो येथे येणार हे तुला माहीत नव्हतं ? '

'नाही भय्या' बोलता बोलता उर्मिलाचा गळा दाटून आला. डोळे भरून आले. रुमालाने डोळे टिपत ती हुंदके देऊ लागली.

'उर्मिला तू रडतेस ?'

'नाही. नाही भय्या '

'गीता–' राजेशनी गीताला हाक मारली.

'नको, भय्या तिला हाक मारू नका.'

गीता येऊन दारात उभी राहिली. उर्मिलाने तिला नमस्ते म्हटलंही नाही की तिच्याकडे पाहिलंही नाही.

'तुम्ही आत जा. मी भय्याशी बोलणार आहे.'

गीताने राजेशकडे पाहिलं. कारण तिला राजेशनी हाक मारली होती. त्याच्या आदेशाची ती वाट पहात होती. तो आपल्याच विचारात होता. गीता चटकन आत निघून गेली. राजेशला ते मात्र जाणवलं. उर्मिलाच्या शब्दात गीताबद्दल आदरभाव नसून उलट तिने तिचा अपमान केला होता. हे त्याच्या लक्षात आलं होतं. तीनचार मिनिटाने उर्मिला बोलू लागली. ती म्हणाली,

'भय्या, तुम्ही यांना नीट समजावून सांगा नाहीतर मी विष खाऊन आत्महत्या करीन. आता मला सहन होत नाही.'

'ओहो, पहाता पहाता गोष्टी या थराला आल्या. एकूण तुम्हा दोघात मोठं भांडण झालंय ! आणि भांडणानंतर प्रथम आले पतिराज आणि नंतर आल्या पत्नी राणी ! थोड्याच वेळापूर्वी मी गीताला सांगितलं होतं की, नरेशला माझ्या सल्ल्याची, सहकार्याची गरज आहे. आणि म्हणून माझ्या घराचा दरवाजा बंद करून चालणार नाही. उर्मिला, प्रथम तू गरम गरम चहा घे. आणि नंतर शांतपणी मी तुझी हकिगत ऐकेन.' आणि त्याने तिच्यासाठी गीताला हाक मारून चहा आणायला सांगितला.

गीता आत जाताच उर्मिला म्हणाली,

'भय्या, थट्टा करण्याची आणि चहा पिण्याची ही वेळ नाही. माझ्या जीवन–मृत्यूचा प्रश्न आहे.'

'अग, मी तुझं सर्व ऐकायला तयार आहे. पण प्रथम चहा तर घेशील? माझा अंदाज आहे की तू दुपारी चहासुद्धा घेतला नसावास होय ना ?'

'मी फक्त विष पिणार आहे.'

'ते सुद्धा मी तुला आणून देतो.' राजेश हसला.

'भय्या, तुम्ही हसता आहात. येथे माझा जीव जातोय. जीवन बरबाद होण्याची वेळ आलीय !'

'मी समजू शकतो उर्मिला !'

'तुम्हाला कसं माहीत ?'

'तू प्रथम सांग तर खरं ?'

'मी सांगू ? त्यांनी तुम्हाला सगळं सांगितलंय का ?'

'नाही. मी येण्यापूर्वीच तो येऊन गेला होता असं सांगितलं ना मगाशी!'

'तुम्ही लपवता आहात माझ्यापासून !'

'मी मुळीच लपवत नाही. सांग कोणत्या गोष्टीवरून भांडण झालं ?'

'आमचं भांडण एका गोष्टीवरून, एका दिवसातलं नाही. ते आता जन्माचंच माझ्या नशिबी लागलंय.!'

'पण मग तू आज का आलीस ? इतकं विकोपाला जाईपर्यंत थांबण्यापेक्षा प्रथमच तू यायला हवं होतंस. आपण विचार करून मार्ग काढला असता.'

गीताने चहा आणून त्या दोघांच्या पुढे ठेवला,

'गीता, तू बस ना. उर्मिला फार डिस्टर्ब आहे. काही गोष्टी मोकळ्या मनानी बोलायला आलीय. तिचं ऐकून तिला आपण मार्गदर्शन करू या'

'नाही भय्या, मी फक्त तुम्हालाच सांगणार आहे.'

'मला जर तू भाऊ समजतेस तर गीता तुझी वहिनी आहे. तिला सुद्धा तुझ्याबद्दल प्रेम आहे. ती पण तुझं सुख पाहू इच्छिते.'

'नाही. मग मला काही सांगायचं नाही. मी जाते.'

गीताने राजेशला खुणेनी इशारा दिला. आणि ती चटकन उठून आत जाऊ लागली. तेव्हा राजेशनी 'मीना' म्हणून पुन्हा जोरानी हाक मारली व तिला थांबवले. तो म्हणाला,

'उमा आणि नरेश येथेच रात्री जेवतील.'

'नाही. मी मुळीच जेवणार नाहीं.'

'रिकाम्या पोटी लढाई चांगली लढता येत नाही. गीता, तू तिचं काय ऐकतेस तू स्वयंपाक कर.' गीता मग आत निघून गेली.

'हे पहा उर्मिला, प्रथम तू राग–संताप गिळून टाक आणि मग सुरुवातीपासून तुला जे काही सांगायचं ते सांग, मी नीट ऐकतो.'

'गोष्ट वगैरे काही नाही तुम्ही माझ्याबरोबर चला'

'कोठे ?'

'बाजारात ?'

'जरूर येतो. पण काम तर सांगशील ?'

'मी ... मी ... हे विकावं म्हणतेय.' असं म्हणून तिने पर्समधून एक पुरचुंडी बाहेर काढली. त्यात तिचे दागिने होते.

'तूं दागिने विकणार ?'

'हो !'

'नरेशनी विकायला सांगितलेत ?'

'भय्या, निष्कारण का फाटे फोडता अहात ? फक्त माझ्याबरोबर तुम्ही'

'येतो पण चहा थंड झालाय तो प्रथम पिऊन घे.'

'मुळीच पिणार नाही'

'विष आणायला इतके दागिने विकण्याची गरज नाही. माझ्याजवळ थोडे पैसे आहेत तेवढे पुरतील' राजेश हसत म्हणाला.

'राजूभय्या, तुम्ही हसता आहात मी आज जीव देण्याच्या मनःस्थितीत आहे. पपाबरोबर म्हणत होते. पण मीच मूर्ख, प्रेमानी आंधळी बनले होते. म्हणून त्यांचे बोलणे समजू शकले नाही.'

'काय म्हणाले होते तुझे पपा ?'

'पप्पा म्हणाले होते, नरेश तुझ्यावर प्रेम करीत नाही. तो तुझ्या श्रीमंतीवर डोळा ठेवून आहे. तो तुला थापा मारतो. चंगीभंगी डाकू आहे.' उर्मिला रागाने बेभान होऊन इतक्या उंच आवाजात बोलत होती की तिचं बोलणं गीताला स्वयंपाक घरात ऐकू येत होतं.

'आणि तू त्यावेळी पपांना काय म्हणालीस ?'

'मी त्यांना सांगितलं होतं, नरेशचं माझ्यावर प्रेम आहे. अगदी खरं–खरं प्रेम आहे. तो तुमच्या पैशावर लक्ष ठेवून प्रेमाचा मुळीच बहाणा करीत

नाही. त्याला मुळीच तुमच्या पैशाची इच्छा नाही. त्याच्या स्वतःच्या इस्टेटीचीसुद्धा त्याला पर्वा नाही. पण तरीही भैय्या, मला परत परत बजावीत होते. ' उमा तू वेडेपणा करू नकोस. डोळें उघडून पाऊल टाक. मी स्पष्ट सांगतो. प्रेमाची ही बतावणी आहे. नरेश पैशाचा लोभी आहे.' परंतु प्रत्येकवेळी मी त्यांच्याशी वाद घातला होता. त्यांचे म्हणणे मी तर कधीही ऐकले नाही. शिवाय ते असं म्हणाले होते की. त्याचे शिक्षण अपुरे झालेले आहे. त्याची महिन्याची प्राप्ती आहे त्यात तुझा सुखाने आठवडाभरही खर्च निभावणार नाही. परंतु भय्या, मी प्रेमाने इतकी आंधळी झाले होते की, कोणतं चागलं, कोणतं वाईट हे मी जाणू शकत नव्हते. लग्न होण्या-पूर्वीचं त्याचं वागणं, मदनासारखं रूप मी वरवर पाहिलं. त्या वेळी ते बोलत ते सारं मला खरं वाटायचे. पण आज त्यांचा प्रत्येक शब्दन् शब्द खोटाच ठरला आहे. त्या निव्वळ थापा होत्या.

जेव्हा लग्न झाल्यावर आमची भांडणं होऊ लागली तेव्हा पपांचे मत मी त्यांना सांगितलं. तर हे म्हणतात, ' तुझा बाप खोटं बोलतो. त्याला श्रीमंतीची घमेंड आहे. एकन् एक दिवस मी त्याचा नक्षा उतरवीन एवढं लक्षात ठेव.' लग्नापूर्वी त्यानी मला सांगितले होते ४०० रु. पगार मिळतो आणि वडिलांच्याकडून दरमहा ३०० रुपये येतात. पुढे पगार चांगला वाढण्याचे चान्सेस आहेत. कंपनी परदेशीसुद्धा पाठविणार आहे. अशा अनेक थापा त्यांनी त्या वेळी मारल्या आणि भवितव्याची मोठमोठी चित्रे रंगविली होती. पण भय्या, खरा प्रकार असा-त्यांना महिना फक्त ३०० रुपये मिळतात. ना कंपनी, ना वडिलांचे पैसे. आणि मी समजून चुकले की हा माणूस पैशाचा पूर्ण भुकेला आहे. एक नंबरचा चैनी, छानछोकी तर रक्तांत भिनलेली आहे. दारू व सिगरेट यांचे भलतेच व्यसन आहे. भय्या. माझ्या पायावर मीच माझ्या हातानें धोंडा पाडून घेतलाय. तुम्हाला माहीत आहे. पपांनी कोणत्या अटीवर लग्नाला परवानगी दिली ?'

' नाही. सांग तर खरं !'

' ही गोष्ट आजपर्यंत मी कुणालाही सांगितली नाही. यांनासुद्धा माहिती नाही. माझ्या आई–वडिलांची मी फार लाडकी मुलगी आहे. नरेशशीं लग्न

करण्याचा हट्ट जेव्हा मी सोडेना तेव्हा नाईलाजाने पपा तयार झाले. त्यांना समती देणं भाग पाडलं मीं ! स्वत:च्या दर्जाला शोभेल अशा धूमधाम थाटात त्यांनी लग्न लावून दिले. आणि मला स्पष्ट बजावलं, ' तुझ्या मनाप्रमाणे तू लग्न केलंस म्हणून मी एक पैसाही तुला देणार नाही. ' त्यांच्या इच्छेप्रमाणे मी लग्न केलं असतं तर ५०,००० रुपये, दागिनें आणि आमचे रहाते घर आधुनिक फर्निचरनीं सजवून देणार होते. शिवाय वराचीं दक्षिणा म्हणून जावयाला मोटारही द्यायचे ठरले होते. पण या गोष्टीची मी पर्वा केली नाही. नरेशवर मी मनापासून प्रेम केलं. माझ्या प्रेमाच्या संसारात, गरिबींत आनंदानं आमचं घर स्वतः सजवीन. कोणतेही कष्ट करायची माझी तयारी होती. मी स्वत: नोकरीसुद्धा करणार होते. आणि अभिमानाने माझा आदर्श संसार माझ्या पपा–मम्मीना दाखविणार होते. ही माझी उमेद ढासळून पडली, मोडून पडली. '

' मग तुझ्या पपांनी तुझ्या नरेशला हुंडा वगैरे काहीच दिलं नाही ? माझी समजूत होती त्याला पपांनी खूप पैसे दिले असतील. '

' दिले. पण नाममात्र. श्रीमंत पूजनाच्यावेळी फक्त २००० रुपये. मी तुम्हाला आताच सांगितलं नाही का की पपांच्या मर्जीप्रमाणे मी लग्न केलं असतं तर त्यांनी घर, मोटार वाटेल ते दिलं असतं. '

' उमा, मी एक गोष्ट समजलो नाही. '

' कोणती ?'

' तुझ्यावेळेला मी हट्ट धरला. तुझ्याशी ते अटीतटीने वागले. त्यांचं भांडण तुझ्याशीं होतं. जावयाशी नव्हतं. मग त्यांनी असं कां केलं ?'

' भय्या, तुमच्या म्हणण्याचा अर्थ मी समजले नाही. जरा पुन्हा सांगा.'

' उमा, कोणतीही व्यक्ती आपल्या मुलीचा हात दुसऱ्याच्या हातात देते वेळी आवश्यक गोष्टी पहाते. मुलाची योग्यता. अशी एक म्हण आहे. ' लाथ मारील तिथे पाणी काढील. ' असा कर्तबगार मुलगा आहे कीं नाही. दुसरी गोष्ट आपल्या मुलीला कितपत स्थैर्य मिळेल आणि त्यासाठी काहींतरीं मुलीची व्यवस्था करणं. पण या गोष्टीत तुझ्या वडिलांना जबरदस्त शिक्षा झाली म्हणावयाची. '

'ती कशी काय ?'

'लोक म्हणाले असतील काय ? ते नुसत्या वाईट संधीचीच वाट पहात असतात. नातेवाईक, इष्टमित्र यांना काय उत्तर दिलं तुझ्या वडिलांनी ? नामुष्कीची पाळी कुणावर आली सांग ना ?'

'भय्या, तुमचं बोलणं बरोबर आहे. पण माझे पपा व्यवहारी, व्यापारी तसेच बुद्धिमानी आहेत, त्यांनी अशी काही युक्ती केली की अशी युक्ती आजपर्यंत कुणीही केली नसेल !'

'ती कशी आणि कोणती ?'

'त्यांनी सर्व चीजवस्तू आम्हाला देण्यासाठी त्यांच्या इतमामाप्रमाणे मांडून लोकांना दाखविल्या, पण त्यातलं मला काहीच दिलं नाहीं. मांडलेल्या वस्तूत स्कूटर, रेडिओग्रॅम, टेपरेकॉर्डर, फ्रीज, १५००० रुपयांचा चेक आणि अंदाजे १०० तोळ्यांचे दागिने, चांदीची भांडी, संसाराला लागणारी भांडी, सोफासेट, गोदरेज कपाट वगैरे सर्व सामान एका खोलीत मांडून ठेवले होते. आलेल्या सर्व पाहुण्यांचे डोळे आश्चर्याने दिपून गेले. सर्वांनी पाहून झाल्यावर ती खोली बंद करून कुलूप लावून किल्ली त्यांनी आपल्याजवळ ठेवली. माझ्या सासरच्या माणसांनी साऱ्या वस्तू पाहून मुलाच्या नशिबाचे कौतुक केले. मी नवी नवरी सासरी घरी गेल्यावर पेटघा उघडून पाहिल्या, आणि मला वाटलं माझ्या पायाखालची जमीन हादरते आहे. अन् घेरी येऊन मी कोसळले.'

'का ग ? काय झालं होतं ?'

'१५००० रु. चेक नव्हता, चांदीची भांडी नव्हती, दागिने फक्त अंगावर होते तेवढेच. १५० हून अधिकच घेतलेल्या साड्यांपैकी ७।८ मामुली साड्या शिल्लक होत्या. मी इतकी घाबरले, रडूच आवरेना मला. सासरची सर्व मंडळी आपआपसात कुजबुज करू लागली. बायका वाटेल ते बोलू लागल्या. असं वाटलं की सगळ्यांना सांगावं सर्व दिलेलं सामान चोरीला गेलं—पण भय्या, मी कसंतरी स्वत:ला सावरलं अन् मला त्याचवेळी पपांचे शब्द आठवले. 'फक्त २००० रु. मिळतील, त्याच्यापेक्षा आणखीन काहीही देणार नाही.' मला वाईट वाटलं. ते सासरच्या माणसांची वृत्ती पाहून, त्या लोकांच्याबद्दल माझ्या मनात फार मोठी अढी बसली आहे.

त्यांची तोंडंही पहाण्याची माझी इच्छा नाही. संध्याकाळी मी नरेशला घेऊन घरी गेले. आणि पपांना एकटीने एकटे पपा असतानाच विचारलं, 'लग्नाच्यावेळी तुम्ही मला ज्या चीजवस्तू दिल्यात त्या सर्व गेल्या कुठे ?'

'मग काय म्हणाले तुझे पपा ?'

'पपांचे उत्तर तेच होतं. माझ्याविरुद्ध तू लग्न केलंस म्हणून त्या तुला मी देणार नाही. त्यांच्या उत्तरानं मी थक्कच झाले. प्रत्येक मुलीला आपल्या आई-वडिलांकडून ज्या चीजवस्तू दिल्या जातात त्या तिच्या हक्काच्या होतात, पण माझा हक्क फक्त लग्न होईपर्यंतच होता. अपमानानी मला रडू आवरेना. तिथं एक क्षणही थांबावे असं वाटेना. यांना घेऊन मी परत आले.

रस्त्यात मी नरेशना सर्व हकिगत सांगितली. ती ऐकून हे म्हणाले.' 'घाबरून नकोस उमा, मी हुंडा किंवा इतर कोणत्याही वस्तूंचा भुकेला नाही. मी तुझ्यावर प्रेम केलय. तू मला मिळालीस हाच मला आनंद आहे.' हे त्यांचे शब्द ऐकून मला स्वर्ग दोन बोटं राहिला. वाटलं मी आता सर्व जिंकलं. यांची साथ असल्यावर मी कोंडयाचा मांडा करीन. आम्ही दोघं नोकरी करून पैसे मिळवून आदर्श संसार माझ्या आईवडिलांना करून दाखवू, अशी मी जिद्द मनाशी बाळगली.

पण आता, आमच्या लग्नाला अद्याप वर्षही झालं नाही तोच हे म्हणताहेत, 'हुंडा ना मानपान ? एवढा श्रीमंत बाप पण हात हालवत आलीस.' तुम्हीच सांगा यात माझा कोणता अपराध आहे ? यावरून रोज भांडण होतं. इतकी पैशाची लालसा होती तर मग पहिल्याच दिवशी त्यांनी मला सांगायला हवं होतं. लग्नात जमलेली सर्व मंडळी एकत्र जमवून पपांना जाब विचारला असता आणि त्यांनी दाखविण्यासाठी ठेवलेल्या वस्तू हट्टाने मागून घेतल्या असत्या.'

'बरोबर आहे तुझं ! आणि आता तुला हुंडा का आणला नाही म्हणून नरेश त्रास देतो हे सर्वस्वी चुकीचं आहे.'

'भय्या, हा त्रास इतका होतोय की मला माझं जीवनच नकोसं झालंय. माझी प्रत्येक गोष्ट त्यांना वाईट दिसतेय. भय्या, फार मोठया आशा मी बाळगल्या होत्या. केवढी स्वप्न मी मनाशी फुलवली होती. आमच्या संसाराचा कलात्मक चित्रपट मी रेखाटला होता. आठवण येते आमची

महाबळेश्वरची पहिली भेट. त्यांची पहिली नजर. असं वाटतं एकच दिवस, एकच दिवस फक्त मोराच्या पिसाऱ्यानं मऊ मऊ राशीनं पुन्हा एकदा नाचत यावा. मदनाहून सुंदर रूप, माझ्या मनात मी त्यांना पुजले, त्यांचं लव्हाळी गोड बोलणं. तो उमदा, विनोदी, खेळकर स्वभाव, सारंच गोड ! आणि अखेर भय्या, सारंच फसवं, स्वप्नाळू होतं पण ते मला आत्ता कळलं. आमच्या लग्नाला पपांचा विरोध, भावांची पसंती नाही. भाऊ म्हणत, 'उमा, तू पदवीधर आहेस. तो शिकलेला नाही. तू सुखासीन आहेस, तू कौतुकानं, श्रीमंतीत वाढलेली मुलगी ! त्याची परिस्थिती आपल्याबरोबरीची नाही. माझ्या मम्मीने किती अश्रू ढाळले असतील ते त्या माउलीलाच माहीत. माझ्या हट्टापुढे तिने पपांची समजूत घातली व ती म्हणाली, ज्याचं त्याचं नशीब असतं. आपण जन्म दिला म्हणजे कर्म देत नाही. तिच्या मनाप्रमाणे आनंदानं, सुखाने पोरीची पाठवणी करा.'

लग्न होताच आम्ही गृहप्रवेश केला. माझ्या मनगटात जोर आहे आणि हुंडा केवढा मिळवलाय मी, असं म्हणत मला नरेशनी मिठी मारली. त्यावेळी अभिमानाने मी अगदी फुलून गेले. आणि मनोमनी म्हणाले, 'यांना सुखात ठेवीन, काही कमी पडू देणार नाही.' माझी निवड योग्य झाली. लग्न म्हणजे खऱ्या अर्थानं दोघांच्या मनाचं मीलन. दोन जीवाचा संयोग. दोन्ही घराण्याचा मिलाफ. माझा संसार आदर्श करून दाखवीन. आमची घराणी त्या योगाने जवळ आज ना उद्या येतील अशी मी हिंमत धरली.

माझ्या घरी पडणारे कष्ट सवय नसली तरी उमेदीने, उत्साहाने सोसत होते. माझं घर, माझा नवरा, हेच माझं विश्व होत पडणारे कष्ट, कष्ट न वाटता,कर्तव्यच वाटत होत. आमच्या दोघाच्या मिळकतीत मी घर सजविणार होते. त्याच्या आवडीनिवडी ओळखून मी स्वत: पदार्थ करून खाऊ घालणार होते. भरतकाम, विणकामाच्या विविध नमुन्यानी आमचं घर नटवणार होते. घराभोवती गुलाबाच्या फुलांची मी बाग करणार होते. कारण नरेशना गुलाबाच फूल कोटाला लावायला फार आवडत. पहिल्या भेटीत त्यांची आवड मी ओळखली होती. ते ऑफिसला जाताना माझ्या हातानी त्याच्या कोटाला गुलाबाचं फूल मला लावायचं होतं. भय्या, सारं काव्य संपलं. स्वप्न विरून त्याची लक्तरं लोंबू लागलीत, या सहा महिन्यात.

आता ते तोंडानं बोलून गप्प बसत नाहीत. संतापानं माझ्या अंगावर... आणि उर्मिला ओक्साबोक्शी रडू लागली.

लग्नापूर्वी माझं वागणं, बोलणं त्यांना किती आवडे. अतृप्त मनानं, कौतुकाने ते माझ्याकडे पहात. आणि आज त्याच डोळ्यात नुसता अंगार फुलनाय. माझं अस्तित्व सुद्धा त्यांना त्रासदायक वाटतंय. क्षुल्लक गोष्टीवरून चिडाचीड, भांडण होतात. घरी घरखर्चाला सुद्धा पैसे देत नाहीत. भय्या, मी आज क्षुल्लक कारणावरून येथे आलेली नाही. गेले सहा महिने मी सहन केलंय. माझ्या आईवडिलांच्या मनाविरुद्ध मी वागले. कोणत्या तोंडाने त्यांच्याकडे मी जाऊ ? आमचं पटत नाही, आम्ही भांडतो हे मी माझ्या माहेरच्या लोकांना कसे सांगू ? सासरची माणसं तर मोठया डोळ्यांनी मला खायलाच उठली आहेत. घालून–पाडून बोललेलं बोलणं मला ऐकवत नाही. माझा अपमान मला सहन होत नाही. या जगात माझं कोणी नाही. भय्या, तुम्ही एकटे माझ्या पाठीशी आहात. येथे मला दिलासा मिळतो. आधार वाटतो, मीच दोषी आहे. माझ्या हाताने मी पायावर धोंडा पाडून घेतलाय. पपाशी विरोध केला. त्या दोघांना दुखवलं. माझ्या पपांना माझं दुःख समजलं तर त्याना फार वाईट वाटेल पण यांच्याबद्दल मी कसं वाईट सांगू ?'

राजेशनी सिगरेट पेटविली. दीर्घश्वास घेऊन धूर सोडत मनात विचार केला, उमाजवळ किती तळमळ, विचारीवृत्ती, सहनशीलता आहे. भाबडी पोर आहे अगदी ! या विषयात काही बोलण्यापूर्वी त्याला नरेशची भेट घेणं आवश्यक वाटलं. एक बाजू समजली, दुसरी बाजू समजावून घेऊन मगच तो समजावणी करणार होता. घाईचा निर्णय घेणं त्याला पसंत नव्हत.

'राजूभय्या, तुम्ही गप्प का ? चला ना ?'

'कुठं जायचं ?

'भय्या, थट्टा करू नका. आणखीन तुम्हाला काही ऐकण्याची इच्छा आहे ? मी दागिने विकणार आहे. माझ्याबरोबर बाजारात चला. यांना पैशाची जरुरी आहे. मी पपांजवळ मागू शकत नाही. एकच उपाय आहे तो दागिने विकण्याचा. तेवढंच माझ्या हाती आहे.'

'नरेशला एकदम पैशाची जरुरी का वाटली ?'

उर्मिलाने उत्तर देण्यापूर्वीच नरेश दारात उभा राहिला. राजेशचे तोंड दाराकडे असल्याने तो चटकन् उठून म्हणाला, 'ये ना नरेश आत ये.'

उर्मिलाने मान वळवून पाहिले. एक रागाचा कटाक्ष टाकून देत आत जाण्यासाठी उठली. नरेश उर्मिलाकडे जळत्या कटाक्षाने पहात उभा राहिला. राजेश समजून चुकला की नरेश फार रागात आहे.

'तू येथे का आलीस ?' रागातच नरेशनी उर्मिलाला विचारले.

उर्मिलाने एक शब्दही न बोलता रागाने तोंड वळविले.

'अरे बैस तर खरा' कटुता कमी करण्याच्या उद्देशाने राजेश म्हणाला, 'तुला माहीत नव्हते का ती येथे येणार ते !'

'बडया बापाची पोरगी ! कोण सांगणार ती कुठे जाते आणि काय करतेय ते.' दातओठ खात नरेश म्हणाला.

'यात खोटे काय आहे ?' उर्मिला आतून फणफणली.

'शट अप थोबाड फोडीन' नरेश ओरडला.

'यू शट अप' उर्मिला ओरडली.

'प्लीज प्लीज !' राजेश उभा रहात म्हणाला. त्याने नरेशचे हात पकडून त्याला कोचावर बसविले. आणि म्हणाला, 'अशा प्रकारे ओरडाओरड करून काय मिळवणार आहात ? तुम्ही दोघं यावेळी फारच रागात आहात.'

'रागात ? राजूभय्या, तुला माहीत नाही या हरामजादीने माझे आयुष्य बरबाद केलंय.'

'तोंड सांभाळून बोला' उर्मिला मोठ्याने ओरडली. इतकी मोठ्याने ओरडली की आरडाओरड ऐकून गीता आतून धावत आली.

'उर्मिला, नवऱ्याबरोबर अशी हमरी-तुमरी करणं ठीक नाही दिसत !' राज म्हणाला.

'नवरा ?' उपरोधिक स्वरात उर्मिला म्हणाली. आणि पुढे ती काही

वि...८

म्हणणार तोच राजेशने हाताने खुणावून तिला गप्प राहायला सांगितले व तो म्हणाला,

'तू गीताबरोबर स्वयंपाकखोलीत जा.'

'हिच्याबरोबर?'—असं म्हणत गीताकडे पहात तिरस्काराने तोंड फिरविलं. 'नाही. मी येथेच ठीक आहे.'

'पण लक्षात ठेव. तुम्ही दोघांनी आरडाओरड करून भांडता कामा नये.'

'मी कधी भांडण केलं, ओरडले? यांनीच शट अप म्हणून भांडायला सुरुवात केली.'

'हे पहा उर्मिला, तुला गप्प बसायलाच हवं. गीता ये ना तू सुद्धा ये. हे दोघे पतिपत्नी आज खूप जोशमें है. तू यांचे भांडण ऐक आणि निर्णय कर.'

नरेश ताडकन उठला. संतापाने लालभडक झाला. हाताच्या मुठी घट्ट आवळल्या आणि दातओठ खात एक जळजळीत कटाक्ष गीताकडे फेकला. कारण गीताला त्याने ठोकरलं होतं. तिची बदनामी सगळीकडे केली होती. तिचं लग्न ठरत आलं की यानं मोडता घातला होता. आणि तीच गीता आज मला न्याय देणार? ज्या स्त्रीवर त्यानं सर्वांत अधिक अन्याय केला होता. ती स्त्री आज त्याच्यापुढे उभी होती. एक आदर्श पत्नी म्हणून! आणि ती त्यांचा समझौता करणार ही गोष्ट नरेशला भयंकर अपमानास्पद वाटली. त्यांचा समझौता दुसऱ्या कुणी करावा याची त्याला जरूर वाटत नव्हती. कुणाचंच ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत तो नव्हता.

गीता एकेकाळी बदनाम झालेली, तिचं कौमार्य लुटलेलं, तिचं सामाजिक स्थान भ्रष्ट झालेलं, तिला कोण विचारणार असा नरेशचा समज होता. आणि तीच गीता त्याच्या जिवाभावाच्या मित्राची एकमेव सल्लागाराची पत्नी होती. एक दिवस नरेश न्यायाधीश झाला होता. त्यानं न्याय दिला होता. त्याची पत्नी होण्याला तिची लायकी नाही. पण आज तीच गीता नरेशच्या वैवाहिक जीवनाचा सांधा जोडण्याचा प्रयत्न करीत होती. आणि म्हणून तो अपमान त्याला सहन झाला नाही.

'नरेश तूच सांग, उर्मिलाविरुद्ध तुझी तक्रार काय आहे?'

'तक्रार, तक्रार? तिच्याशी लग्न करून मी पस्तावलो. झक मारली आणि हिच्याशी लग्न केलं. या चांडाळणीने माझे जीवन बरबाद केलं.' संतापाने नरेश म्हणाला.

गीताने नरेशकडे पाहिले. नंतर उर्मिलाकडं पाहिलं. आणि मनात विचार केला– 'हे शब्द बोलतोय पण त्याने माझं सर्वस्वच लुटलं होतं. आणि आज उर्मिलेचं जीवन उद्ध्वस्त करण्यास हा तयार झालाय.'

'माझी तक्रार हीच आहे. राजीवभय्या! माझ्या पापांचे ऐकले असते तर?' आणि ती रडू लागली.

'उर्मिला तू गप्प बसण्याचे Promice दिले होतेस मला' राजेश समजुतीच्या स्वरात म्हणाला, 'मी तुला खूप वेळ दिला होता. तुझ्या सर्व गोष्टी शांतपणे ऐकून घेतल्या. आता मला नरेशचे म्हणणे ऐकू दे. सांग नरेश तू काय म्हणत होतास? नरेशनी उत्तर देण्यापूर्वी गीताकडे रागाने बघितले. क्षणभर विचार केला की हिच्यासमोर आमच्या वैवाहिक जीवनाचा गुंता खुला करायचा म्हणजे हिला आयतीच संधी मिळाली. मनुष्य स्वतः-वरून दुसऱ्याचा अंदाज करीत असतो. ती मनात म्हणेल, 'हलकट माणसा तू मला वचने किती दिली होतीस? किती आणाशपथा घेतल्यास, माझं सर्वस्व लुटून मला धोका देऊन छळ केलास. माझं घर कधीही होऊ नये अशी खटपट केलीस पण पहा माझं घर झालाय, आदर्श पती मिळाला, मी सुखात लोळते आहे. आणि तू मात्र आज शांती आणि समाधान मिळविण्यासाठी वैतागून फिरतो आहेस. माझ्या घरात तुम्ही पतिपत्नी समझोता करायला आला आहात.

'कसला विचार करतोस? बोल ना?' राजेश म्हणाला.

'सांगा, सांगा तोंड मिटून गप्प का?' उर्मिला ओरडली.

'सांगण्यासारखं खूप आहे.' आणि त्याने गीताकडे पुन्हा एक जळजळीत नजर टाकली. 'आज नाही पुन्हा कधीतरी सांगेन.'

'अरे पण तू उभा का राहिलास?'

'मी निघालो आहे.' आणि तो दरवाजाजवळ आला.

'नरेश, थांब तुमचं जेवण तयार आहे.'

'नाही' असे म्हणून नरेश जिना उतरून ताडकन निघून गेला. राज मनात समजला गीताच्या समोर सांगण्याची त्याला लाज वाटते आणि तो गीतावर जळत होता. कारण गीताला सारं मिळालं होतं. ती सुखात आनंदात होती. नरेश मात्र सगळं घालवून तडफडत होता.

'सांगण्यासारखं असतं तर सांगितलं असतं' उर्मिला.

'कदाचित् घरच्या गोष्टी बाहेर सांगणं त्याला योग्य वाटलं नसेल' राजेश म्हणाला.

'राजूभय्या, तुम्ही कमाल करता आहात! काय आहे हो न सांगण्यासारखं!'

नरेश थांबला असता तर भांडण विकोपाला जाण्याची शक्यता होती. तो जाताच उर्मिलाचा राग शांत झाला आणि ती शांतपणे बोलत होती.

'भाईसाहेब, माझं आयुष्य नष्ट झालं आहे. त्यांची तक्रार काय असणार?'

'अग एवढ्या तेवढ्या क्षुल्लक कारणावरून जीवन नष्ट झाल्यावर लग्नाला अर्थ काय?' समजुतीच्या स्वरात राजेश म्हणाला.

'तुम्ही स्वतः सर्व पहाताच आहात, मी प्रेमाने आंधळी झाले होते. मला वाटलं माझ्या संसाराचं मी मंदिर उभारीन. त्या मंदिरात ते राम आणि सीता मी. वल्कलं नेसूनही मी त्यांच्या मागे जाईन. येणाऱ्या अडचणी आणि संकटं तळघरात कुलूप लावून दाबून टाकीन. संसारात प्रेम हेच सर्वस्वी मौल्यवान आहे. त्या वेळी प्रेम हेच जीवन वाटले पण ...'

'तुला घरखर्चाला नरेश पैसा देत नाही का?'

'ते देणार काय अन् त्यांना मिळतंय काय?'

'मी आजपर्यन्त नरेशला कधी खाजगी प्रश्न विचारला नाही.' राजेश म्हणाला आणि त्याने गीताकडे पाहिले.

'राजूभय्या, हेच तर कठीण आहे. ते म्हणतात मी जास्ती वावगा खर्च करते. स्त्री सगळं सहन करील पण विश्वासघात, कपट, छळ सहन करणार नाही.'

'नरेश असा त्रास तुला देतो?'

'प्रथम हे महाराज तुमचे मित्र आणि नंतर मी त्यांची पत्नी. तुम्ही पक्षपाती नाही. म्हणूनच मी तुम्हाला विचारते. त्यांनी मला खोटे का सांगितले.

की मी ५००रु. पगार मिळवतो. लग्नानंतर ३–४ महिने मिळालेल्या पैशातून आम्ही कसातरी खर्च भागवला आणि गेले दोन महिने अशी तंगी चालतेय की जमीन–अस्मान एक होतंय ही तंगी निभवताना. मला काय माहीत या बड्या साहेबाची लायकी महिन्याला ३०० रुपये मिळवायची आहे म्हणून !'

'काय फक्त ३०० रुपयेच नरेशला मिळतात ?'

'होय फक्त ३०० रुपयेच. आता तुम्हीच सांगा हा दोष माझा ? खोटं बोलून यांनी मला का फसवावं ? एकुलती एकच मुलगी असून प्रेमाखातर आई-वडिलांशी भांडले, त्यांना दुखवलं. मी स्त्री आहे. श्रीमंत बापाची मुलगी आहे. मला कष्टाची सवय नाही. तरीसुद्धा मी मनात संसार करण्याची उमेद धरली होती. चांगले कपडे, दागिने याची कुठल्या स्त्रीला हौस नसते ? पण यांच्यासाठी या सर्व गोष्टी मी लाथडल्या. लग्नापूर्वी केवढ्या बढाया मारल्या आणि आता समजतंय यांचा मोठेपणा. बढाया मारण्यात आणि सुटाबुटात–खिसा मात्र खाली.' आणि हीच त्यांची इस्टेट. पुढे ती म्हणाली, 'त्यांचे नातेवाईक आणि आईवडील म्हणतात त्याला सासुरवाडीच्या एका पैशाचीही अपेक्षा नाही. पण मी जाणते. भय्या सासरची माणसं म्हणतात, आमचा मुलगा दिसण्यात रार्जबिंडा, कमीत कमी दहा ते पंधरा हजार रुपये हुडा, मानपान नक्कीच मिळायला हवा होता. पण त्याचं कौतुक त्या मानानें काहीच झालं नाही. एखादी गरिबाच्या घरची मुलगी केली असती तरीसुद्धा त्यांनी कौतुक केलं असतं. दळभद्री मेली. फसवलं पोराला ! मोठेपणानी केवढ्यातरी वस्तू लोकांना दाखविण्यासाठी मांडल्या. अगदीच धूळ फेकली मेल्यानी आमच्या डोळ्यात ! इत्यादी वाग्बाण रोज मी ऐकते.

भाईसाहेब नरेशनी एकदातरी मला सत्य सांगायला हवं होतं. मी समजले असते की प्रीतिखातर माणूस खोटा बोलला तर क्षम्य असते. मी शिकलेली आहे, नोकरी करायला तयार आहे, असं असताना ते माझा छळ करतात याचा उघड अर्थ असाच नाही का होत की, त्यांचं प्रेम माझ्यावर नसून माझ्या पैशावर होतं आणि तेथे त्यांचा अपेक्षाभंग झाला. आता तुम्हीच मला काय तो न्याय द्या.'

'सांग. मनमोकळेपणानी बोल.'

'मी बड्या बापाची लाडकी मुलगी, वाटेल तसा पैसा खर्च करायला लाज वाटत नाही. तुझा बाप पाठवितो का पैसे? सर्वांच्या देखत असे अनेक शब्दांनी माझी रोज खेटरपूजा होते. माझ्या आई-वडिलांचा उद्धार, त्यांना उच्चारलेले अपशब्द माझ्या काळजाला घरे पाडतात. आज मी तुमच्याकडे आले आहे ती अशासाठी की तुम्हाला बरोबर घेऊन दुकानांत जाऊन माझ्या अंगावरचे आणि जवळ असलेले दागिने विकून त्यांचे सहा महिन्यात उधळलेले पैसे मी त्यांना परत देऊन मोकळी होते.'

राजेश गंभीर झाला. उर्मिलाने जे सांगितलं ते सर्व सत्य होतं. नरेशनी फार मोठी चूक केली होती. तोच अपराधी होता. गीता गप्प उभी होती. हे सर्व ऐकून तीचा जीव कासावीस झाला होता. गीताचा याच कारणासाठी त्याने विश्वासघात केला होता.

'उर्मिला, प्रथम तू जेवण जेवून घे. रात्रीची वेळ आहे. मग मी तुला घरी पोचवीन.'

'छे! छे!! मला भूक नाही.'

'मग अन्नावर का रागवतेस?'

'भय्या, असं वैवाहिक जीवन असल्यावर भूक कशी लागेल?'

'उमा, संताप आणि राग विसरून जा. पति-पत्नीमध्ये कधीकधी कुरकूर होते. पण मला विश्वास वाटतो सर्व ठीक होईल.'

'पति-पत्नी? पतीने पत्नीला धोका देणं, खोटं बोलणं, कपटानं छळणं आणि छळ करणं यानं लग्नाचा शेवट काय होतो?'

'आता अशी खुळचट बडबड बंद कर पाहू! आता कुठे सुरुवात आहे तोच तू परिणामाची भाषा बोलतेस? चल उठ, तोंड धू आणि जेवायला चल. गीता टेबलावर जेवण आण.'

गीता स्वयपाकघरात गेली. उर्मिला तोंड धुण्यास गेली. न बोलताच तिघांनी जेवण उरकलं. जेवण झाल्यावर राजेश म्हणाला,

'गीता, चल हिला घरी पोचवून येऊ!'

'नाही भय्या, मी एकटी घरी जाईन.'

'रात्रीचे दहा वाजून गेलेत तरी तू एकटी घरी जाशील पण मी जाऊ देणार नाही.'

'मग तुम्ही मला पोचवायला एकटेच चला.' उर्मिला राजेशला हळूच म्हणाली.

राजेशनी मिनिटभर विचार केला. त्याला आलेला संशय आता पक्का झाला होता. उर्मिला गीताचा तिरस्कार करते. ती गीताला कमी लेखतेय. याचेही कारण नरेश आहे हे तो समजला.

राजेश गीताला म्हणाला, 'तुझं काम आवरेपर्यंत मी उर्मिलाला सोडून येतो.'

निघते वेळी उर्मिलाने साधा व्यवहारही पाळला नाही. नमस्ते म्हणण्या-इतपतही तिचा मान राखला नाही. रस्त्याने पण दोघे गप्प होते.

'उमा' राजेशनी जड आवाजात हाक मारली.

'काय भय्या.'

'माझ्या एक गोष्ट लक्षात आली आहे. कदाचित माझा अंदाज चुकत असेल पण मी समजून घ्यावं म्हणतोय.'

'कोणती गोष्ट?'

'तू गीताचा तिरस्कार करतेस?'

'असंच काही म्हणता येणार नाही.' ती थांबली.

'थांबू नकोस स्पष्ट बोल.'

'भय्या, मला तुम्ही एक गोष्ट सांगाल?'

'कोणती?'

'लग्नापूर्वी गीता एका मुलाची आई झाली होती?' उर्मिलाने तिरस्कार दर्शवीत विचारले.

'तुला कोणी सांगितलं?'

'नरेशनी!'

'आणखीन काय सांगितलं?'

'ते म्हणाले, गीता नीच, उनाड, कलंकिनी आहे. अनेक पोरांच्या बरोबर शरीरसंबंध केलाय् आणि ...'

'घाबरू नकोस. उर्मिला, सांग आणखीन काय म्हणाला तो?'

'ती कुलटा आहे.' शब्दातील कटुता कमी करण्यासाठी तिने विचारले.

'भय्या, असल्या हलकट, नीच बाईशी लग्न करण्याची तुम्हाला काय जरुरी होती ?'

'नरेशनी सांगितलं आणि तू विश्वास ठेवलास. गीताची वर्तणूक तू कधी पाहिलीस ?'

'भय्या, विश्वास करण्यासारख्या गोष्टीवरच माणूस विश्वास ठेवतो.'

'होय ना. मग नरेशनी तुला आणखीन काही सांगितलं होतं की आपणाला पाचशे रुपये पगार आहे, पगारात वाढ मिळणार आहे, कंपनी परदेशी पाठविणार आहे. मग त्या गोष्टींवरचा तुझा विश्वास कसा उडाला ?'

'प्रथम मी या गोष्टीवर विश्वस ठेवला होता. परंतु ...'

'पण काय ?'

'परिस्थितीने मला सांगितलं !'

'मग वेळ आणि परिस्थिती या गोष्टी सांगू शकतील की गीता भटकी आणि उनाड नाही.'

'पण गीताने लग्नापूर्वी कोणावर प्रेम केलं होतं, त्याच्यापासून ती गरोदर होती. हे सर्व खोटं आहे का ?'

'हे सर्व अगदी खरं आहे !'

'तुम्ही लग्नाच्यापूर्वी तिला ओळखत होतात ?'

'हो !'

'ते कसं ?'

'कारण तो मुलगा, तो माझ्या ओळखीचा होता. या समाजात कलंक लावणारेच फार आहेत. पण तो कलंक धुऊन काढणारे क्वचितच भेटतील.'

'आपण जगाला सुधारण्याचा मक्ता घेतलाय का ?'

'या तुझ्या प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नाही. मी एकच प्रश्न तुला विचारतो त्याचं उत्तर तू दे.'

'ठीक आहे विचारा !'

'माझं आणि तुझं लग्न एकाच दिवशी झालं. वैवाहिक जीवनात मी जास्त सुखी आहे की तू ?' उर्मिला या प्रश्नांनी गोंधळून गेली. तिला काय उत्तर द्यावे ते सुचेना.

' उर्मिला तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस. ठीक आहे. मी उत्तर जाणू शकतो. ज्या मुलाला गीता जन्म देणार होती तो कर्ता, कर्तृत्ववान जन्मदाता तुला माहीत आहे ? त्याला तू ओळखतेस ? तो तुझ्या चांगला परिचयाचा आहे.'

' नाही, मुळीच नाही. मला माहीत नाही. मी त्याला ओळखत नाही.'

' नरेशनी तुला त्याचं नावं सांगितलेले दिसत नाही. ही गोष्ट त्यानं फार चांगली केली. एक गोष्ट लक्षात ठेवा उमा. चांगलं आणि वाईट कोणतं, हे अनुभवाला आल्याशिवाय, पूर्ण खात्री करून घेतल्यावरच मग स्वतःचं मत बनवावं. तुझ्या मताप्रमाणे गीता कदाचित वाईट असेलही पण आता ती तुझ्या राजूभय्याची पत्नी आहे, तिचा माझ्या इतकाच मान राखणं आवश्यक आहे. नरेशने गीताबद्दल आणखीन काय सांगितलं होतं ?'

' यांनी सांगितलं गीताचे एका मुलावर प्रेम होतं. दोघांचे सारे व्यवहार झाले होते. पाचसहा महिन्यांची गरोदर होती. डॉक्टरकडून अॅबॉर्शन करून घेतलं ... वगैरे ...'

' तू आणि नरेश लग्नापूर्वी भेटत होतात. मला चुकवून एकातांतसुद्धा काही काळ घालविलात आणि सारे व्यवहार केलेत. यात तुला धोका मिळाला असता तर ? ...'

' हे ... हे ... अगदी अशक्य !' जोरात उर्मिला म्हणाली.

' अग आज तू असं म्हणतेस पण झालं असतं तर काय करणार होतीस ? ज्या मार्गानी गीता गेली त्याच मार्गाने तुला जावं लागलं असतं !'

उर्मिला गप्प झाली, राजेश पुढे म्हणाला,

' तुला नरेशनी फसवलं असतं आणि लग्न केलं नसतं तर तू सुद्धा कुलटा, कलंकिनी ठरली असतीस होय ना ?'

' कदापिही नाही.'

' पुन्हा विचार कर. कलंक स्त्रीच्या माथी मारला जातो. वास्तविक दोघंही ही गोष्ट घडायला जबाबदार असतात. पण पुरुष त्यातून सही-सलामत सुटतो. समाजाचा पहाण्याचा दृष्टिकोन माझ्या दृष्टीने फारच अयोग्य आहे. उर्मिला, स्त्री नऊ महिने आपला गर्भ पोसत असते. तो पोसत

असताना होणाऱ्या यातना तीच जाणत असते. आणि त्यातून तिची सुटका नसते. त्या गर्भाचं मध्येच वाईट करायचं हे केवढं मोठं दिव्य आहे हे मी तुला सांगणे योग्य नव्हे. तू स्त्री आहेस.'

उर्मिलाजवळ राजेशला बोलण्यासाठी उत्तरं होतीच कुठे? ती गप्प झाली. वाद घालण्यात आपला पराभव निश्चित होणार हे ती समजून होती.

'आता तू घरी जाशील?'

'छे, शक्य नाही. मी डॅडींच्याकडे जाणार!'

'नरेश फार चिडेल!'

'ठीक आहे. मी घरीच जाते. तुम्ही जा! मी एकटी जाईन.'

'मी तुझ्याबरोबर घरापर्यंत येतो.'

'नको गीता तुमची वाट पहात असेल.'

'काही हरकत नाही. रागाच्या भरात चुकीचं पाऊल पडता कामा नये. जेव्हा तुला मदत हवी असेल तेव्हा जरूर ये. तुला मी नेहमी साथ देईन.'

राजेशनी तिला घरापर्यंत पोहचविले आणि राजेश घराच्या दिशेने चालू लागला. तो फार दमला होता. गीताबद्दल उर्मिला जे बोलली त्यामुळे तो मुळीच अस्वस्थ झाला नव्हता. तो जाणून होता. मात्र उर्मिलाला माहिती नव्हतं की गीताला कलंक लावणारा तिचाच नवरा नरेश आहे. आणि त्यामुळे गीता मात्र उगीचच दोषी ठरत होती. उर्मिलाच्या मनात गीताबद्दल उगाच अढी निर्माण झाली होती.

राजेश घरी आला तेव्हा गीता स्वयंपाकघरातील सर्व काम आटपून खिडकीशी अंथरुणावर राजेशची वाट बघत बसली होती. राजेश घरात येताच त्याने तिला प्रेमाने जवळ घेतले.

* * *

त्या संध्याकाळी राजेशनी गीताच्याबाबत उर्मिलाशी बोलताना नरेशचे नाव वगळून तिच्याबद्दलचे आपले विचार, तिचे वागणे जे सांगितलं त्यावरून तिच्या मनावर फारच परिणाम झाला. तिच्या मनात गीताबद्दल जो तिरस्कार होता तो खूपच कमी झाला. गीताचा तिनं सन्मान करावा अशी

त्या दोघांची अपेक्षा नव्हती. पण कुचेष्टा किंवा तिरस्कार करू नये इतकीच इच्छा होती.

इकडे नरेशच्या मनात असूया उत्पन्न झाली आणि त्याने विचार केला की उर्मिलाने राजेशशी संबंध ठेवता कामा नये. तिचं त्याच्याकडचं जाणं-येणं बंद केलं पाहिजे. कारण एक ना एक दिवस जर उर्मिलेला सर्व समजलं तर उर्मिला आकाशपाताळ एक करेल व आपणाला सोडून जाईल. या विचारामुळे उर्मिला आणि नरेश यांच्यामध्ये एक भिंत उभी राहिली आणि दिवसेंदिवस असूया वाढत गेली. व राजेशला तो आपला शत्रू समजू लागला. नरेश उर्मिलाशी भांडण करणं टाळीत होता कारण त्याचा परिणाम तो जाणत होता. तरीसुद्धा एक गोष्ट तो विसरू शकत नव्हता. ती म्हणजे उर्मिलाने बापाच्या घरून कांहीही आणले नाही. त्याला आशा होती की ती आपल्या पपांना सांगून चांगल्या पगाराची नोकरी देण्याची खटपट करील. पण उर्मिलाला वडिलांच्याकडे वैवाहिक जीवनाचे फाटके वस्त्र नेसून जायचे नव्हते. ती मानिनी होती. कष्टाला आणि संकटाला सामोरी जाण्याची तिची तयारी होती. बापाच्या मनाविरुद्ध तिने लग्न केलं होतं. आणि आज त्यांच्यासमोर बेघर होऊन जाण्याची पाळी तिच्यावर आली होती.

घरात अबोला. धुसफूस कमी झाली होती. बारीकशा क्षुल्लक गोष्टीवरून कलहाचा डोंब उसळे. नरेश सर्व परिस्थिती ओळखून भांडण टाळण्याची शिकस्त करी. पण एक दिवस एवढे मोठे भांडण झाले की उर्मिलाला राजूभय्याच्या सल्ल्याची जरुरी वाटली आणि ती सरळ त्याच्या घरी गेली. राजेश कामावरून परत आलेला नव्हता. गीता एकटीच होती.

'भय्या, ऑफिसमधून आले नाहीत का ?'

'एवढ्यात येतीलच. वेळ झालीच आहे. तुम्ही आत येऊन बसा ना !'

'मी थोड्यावेळाने येईन.' तिची गीताजवळ बसण्याची इच्छा नव्हती.

'काय झालंय ? पुन्हा तुमचे भांडण झालंय का ?'

'तुम्हाला कसं समजलं ?'

'तुमचं तोंड पहाताच लक्षात आलं माझ्या.'

'ओहो फारच समजूतदार आहात तुम्ही !'

'याचा अर्थ पुन्हा तुमचं भांडण झालंय.'

उर्मिला तिरस्काराने ओरडली, ' काही कारण नसताना तुम्ही का फिकिरीत आहात ? तुम्हाला त्याची जरुरी काय ?'

' छे हो ! मी कशाला फिकीर करू ?' गीता सहानुभूतीने म्हणाली.

' तुम्ही आमच्या भांडणात आनंद मानता. तुम्हाला काय मिळतंय आमच्या भांडणात पडून ?'

' मी आणि तुमच्या भांडणात आनंद मानू ?'

' मी तुम्हाला माझी धाकटी बहीण मानते. माझ्याबद्दल गैरसमज करून घेतला आहात तुम्ही !'

' का बरं आनंद मिळणार नाही ? आंधळ्या माणसाला सारी दुनिया आंधळीच वाटते.' उर्मिला तिरस्काराने म्हणाली.

' आंधळ्याला आंधळ दिसतं ? मी तर तुमच्या बाबतीत कोणतेही कठोर वर्तन केलेलं नाही आणि गैरशब्द बोलले नाही.'

त्याच कठोर आवाजात उर्मिला पुन्हा म्हणाली.

' कठोर बर्तन केलं नाही तर मग तुम्ही इतक्या बेचैन का दिसता ?'

' तुम्हाला काय बोलायचंय् ते स्पष्ट बोला.'

' तुम्हाला, तुमच्याच सारख्या कलंकिनी, उनाड मुली दिसतात.'

' कलंकिनी ! उनाड !! कुलटा !!!' गीताचा चेहरा पांढराफट्ट पडला. पण तरीही ती पुढे म्हणाली.

' तुम्ही काय म्हणता आहात याचा अर्थ मला तरी समजला नाही.'

' वेड पांघरून पेडगावला जाण्याचं ढोंग करू नका. तुमच्याबद्दल मला सर्व माहीत आहे.' उर्मिला चिडून म्हणाली.

' मला तरी ऐकवा की तुम्हाला माझ्याबद्दल काय काय माहिती आहे.' गीताचा आवाज जड झाला.

' लग्नापूर्वी आपण कोणते खेळ खेळलात, काय काय गुण उधळलेत ते सारं...'

' मी मी गुण उधळले ?' आता मात्र गीता हट्टाला पेटली होती.

' तुमच्या प्रेमाचा इतिहास मला माहीत आहे आणि हे पण मला माहीत आहे तुम्ही...' बोलता बोलता उर्मिला थांबली.

'तुम्ही थांबलात का उर्मिलाताई ? सारं स्पष्ट बोला. मनात कुठलीही गोष्ट दडवून ठेवू नका. भिण्याचं तर मुळीच कारण नाही.'

'मी, मी भिऊ ? तुम्हाला ? का म्हणून ?'

'हो मी तेच म्हणतेय. बोला मोकळेपणानी !'

'तुम्हाला दिवस गेले होते. तुम्ही आई होणार होतात, हे खोटं आहे का ?'

गीता काहीच बोलली नाही. तिच्या लग्नाला दीड वर्ष पुरं होत आलं होतं. या दीड वर्षांत या कटू शब्दांचा कोणीही उल्लेख केला नव्हता. लग्नापूर्वी ज्याच्या त्याच्या तोंडी ती हेच ऐकत होती. राजेशबाबूंनी तिच्या मध्ये या दीड वर्षांत आमूलाग्र बदल केला होता. विश्वास निर्माण केला होता. पण आज तिला ती आठवण करून उर्मिलाने पुन्हा धक्का दिला होता. सुकलेल्या जखमेवरची खपली पुन्हा निघाली होती. अपमान कोणाचा होतो की ज्याचा पहिला सन्मान होतो. राजेशनी गीताचा मान राखला होता. तिला मानाने जगवत होता. त्यात त्यानी कधीही चुकूनदेखील मागील गोष्टीचा उल्लेख केला नव्हता. म्हणून उर्मिलाच्या बोलण्याचा तिला अपमान वाटला. रडू येतयंस वाटलं पण डोळ्यातून पाणी येईना.

विजयोन्मादाने उर्मिला म्हणाली.

'गीताबाई, आपण गप्पशा बसलात ?'

'छे. छे.' गीता दुःखाने म्हणाली.

'सांगा ना, मी चुकीचे बोलले ?'

'काय ?'

लग्नापूर्वीच आपणाला मातृपद मिळणार होतं.' हेटाळणीच्या स्वरात उर्मिला म्हणाली.

'हे बरोबर आहे.'

'नाइलाज म्हणून राजूभाईमुळे मला तुमच्याशी बोलणे भाग पडतंय नाहीतर मी तुमच्यासारख्या बाईच्या सावलीपासून दूर राहिले असते.'

'तुम्ही योग्य तेच बोलता आहात. तुमचे भाई देव आहेत.'

'पण मी हे अद्याप समजू शकले नाही की राजूभय्याला तुमच्यासारख्या स्त्रीशी लग्न करण्याची जरुरी का वाटली ?'

'तुमच्या भाईंनाच हा सवाल का विचारीत नाही ? मला नीच कुलटा म्हणता, मी वाईट चालीची म्हणता, माझ्या सावलीपासून दूर रहाण्याची इच्छा करता. पण तुम्ही सुद्धा लग्नापूर्वी प्रेम करत होतात. एकांत केलेला आहे.' गीताने ठणकावून विचारले.

'पण मी गरोदर थोडीच राहिले.'

'तुमचं म्हणणं ठीक आहे. पण मला एक सांगा प्रेम करणारी मुलगी वाईट चालीची होऊ शकते ? तिच्या सावलीपासून दूर रहायचे म्हणता म्हणजे प्रेम हा संसर्गजन्य रोग होईल नाही का ?'

'खरं प्रेम किती उच्च आहे आणि हे तुमचं घडलय ते वासनेपायी !' उर्मिला.

'तुम्ही व्याख्या बरोबर केलीत पण आणखीन एक सांगाल तर फार फार आभारी होईल. तुम्हाला माझ्याबद्दलची ही माहिती कोणी सांगितली ?'

'यांनी सांगितली.'

'तुमच्या पतिराजांनी ?' आश्चर्यानी गीता ओरडली.

'होय; तुम्ही दोघं एका गल्लीत रहात होतात ना ?'

'तुमच्या मिस्टरानी तुम्हाला सांगितलं की मी वाईट चालीची, उनाड, भटकी मुलगी असून एका मुलावर प्रेम करीत होते, त्याच्या मुलाची आई होणार होते. इतकी माहिती त्यांनी तुम्हाला दिली म्हणता ना ?'

'होय, होय, होय !' उंच आणि तिरस्करणीय स्वरात उर्मिला ओरडली.

'उर्मिलाताई, तुमचे पती मनुष्य नसून देव आहेत. तुम्हाला माझ्या विषयी या सर्व गोष्टी सांगून माझ्यावर केवढी दया दाखविली आहे. यालाच चांगली माणसं म्हणतात की वाईट लोकाच्या वर ते पडदा टाकतात. जाऊ दे. मी तुम्हाला एक प्रश्न विचारू का ?' तुमचे वैवाहिक जीवन सुखी आहे का ?'

'का नाही ?'

'मला मग सांगा की तुम्ही तुमच्या भाईंकडे कोणत्या गोष्टींबाबत सल्ला-मसलत करायला येता ?' यावेळी गीताला राग आला होता.

'तुम्हाला त्याची का पंचाईत ?'

'मी तुमच्या पतिदेवांची गोष्ट बोलत होते. त्यांना लग्नात हुंडा मिळाला

नाही म्हणून तुमचे जीवन नष्ट होण्याची वेळ आली आहे. आणि त्याच पुरुषोत्तमाने तुम्हाला सांगितले की, मी नीच, उनाड आहे. पण त्यानं त्या माझ्या प्रियकरांचं नाव का सांगितलं नाही ? ज्याच्यावर मी प्रेमाची फुलं उधळली, त्याच्या शब्दावर आणि वचनावर विश्वास ठेवून आपलं सर्वस्व वाहिलं आणि त्यानं मात्र तारुण्य कुस्करून धुळीत फेकलं. आयुष्यभर कलंकिनी म्हणून माझ्या कपाळी टिळा लावला. ज्याच्या मुलाची मी आई होणार होते त्याचं नाव का सांगितलं नाही तुम्हाला ?' गीतानं संतापानं विचारलं.

'नाही सांगितलं खरं !'

तुमच्या पतिराजानी जी गोष्ट सांगितली ती बरोबर आहे पण महत्त्वाचा शब्द त्यांनी तुम्हाला सांगितला नाही.'

'कोणता शब्द ?'

'ज्या व्यक्तीवर मी प्रेम करीत होते, ज्या व्यक्तीने मला भ्रष्ट केलं त्या पुरुषोत्तमाच्या नावाची तुम्हाला उत्कंठा नाही लागली ?'

'हो तर लागलीय ना ?'

'ऐका तर...आपलेच पतिराज नरेश !'

'गीताबाई तुम्ही शुद्धीवर आहात का ?'

'मी सत्य तेच बोलतेय. तुमच्याबद्दल माझ्या मनात सतत सहानुभूती आहे व राहील. पण हे त्रिवार सत्य आहे की तुमच्याच पतिराजानी माझं कौमार्य लुटलं. माझ्या प्रेमाचा विश्वासघात केला. नीच वाईट चालीची आहे असा डंका पिटला. मला लग्नापूर्वी धोका दिला. आणि लग्नानंतर तुम्हाला ! प्रत्येकाचं आपापलं नशीब ! माझ्याशी लग्न न करण्याचं कारण, मी गरीब आईबापाची मुलगी. माझे वडील त्यांना हवा तेवढा हुंडा देऊ शकत नव्हते. आणि तेच भांडण आजही कायम आहे. आता सांगा मग ते तुम्हाला कसं नाव सांगतील ?'

'राजूभय्यांना हे सर्व माहीत आहे ?'

'हो !'

'लग्नापूर्वी त्यांना माहीत होतं का ?'

'हो हे ठाऊक असूनही त्यांनी माझ्याबरोबर लग्न केलं. एका पुरुषानं माझं सर्वस्व लुटून मला रस्त्यावर फेकली आणि तुमच्या भाईनं मला जीवन दिले. घर दिलं. आपली छाया माझ्यावर देऊन मला सन्मानित केलं.'

'पण गीताबाई अद्यापही नरेश येतात. ते कसे?'

'हो येतात. पण तुम्ही काळजी करू नका. आता मी अल्लड, अननुभवी, मूर्ख मुलगी नाही. शिवाय तुमच्या भाईची पत्नी आहे व तुमची वहिनी आहे. तुम्ही माना अगर मानू नका त्यावर काही अवलंबून नाही. आणि आता तुमच्या पतिराजांना डोळा वर करून माझ्याकडे पहाण्याची छाती नाही. त्यांची नजर आता माझ्या पायांजवळच असते. आणि ते मला स्पर्शसुद्धा करू शकणार नाहीत. तेवढं धैर्य त्या माणसाजवळ नाही. हे शरीर एका थोर गुणी पुरुषाच्या पत्नीचं आहे. हे जमीन अस्मानाचे अंतर तुम्ही जाणू शकाल?'

'का नाही? थोड्यावेळापूर्वी मी म्हणाले होते तुम्ही राजूभाईची पत्नी नसतात तर मी पळाले असते दूर पण वहिनी—' असे म्हणून उर्मिलाने तिला मिठी मारली व ती रडू लागली.

गीताने तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवला व स्वतः रडू लागली. व म्हणाली,

'रडू नका. तुमच्या बाजूला मी आहे. तुमच्यावर संकट कोसळलं आहे हे मी जाणते. पण तुम्ही धीर सोडू नका.'

'मी माझ्याबद्दल म्हणत नाही वहिनी. सुखदुःख हे नशिबाचं लेणंदेणं आहे. मी भाईच्या विशाल हृदयाबद्दल विचार करते आहे. एखादा मनुष्य इतका मोठा होऊ शकतो.'

'तुम्हीच पहा.'

'आणि नरेश माझा नवरा!'

'नाही उर्मिलाताई, पतीबद्दल असा अनादर करू नका? चूक कुणाकडून होत नाही. जाणीवपूर्वक सुधारणं हे माणुसकीचं लक्षण आहे. तुमचे एक ना एक दिवस बदलतील आणि तुमचा संसार सुखाचा होईल असा मला विश्वास वाटतो. चला स्वयंपाकघरात—मी तुमच्यासाठी चहा आणि खायला करते.'

' जरूर, जरूर मी चहा पिणार आणि खाणार.'

त्या दिवशी उर्मिलाने दोन तास वाट पाहूनही राजेश आला नव्हता. ती घरी निघून गेली आणि तो आला.

* * *

उर्मिलाची अवस्था अतिशय वाईट झाली होती मात्र गीताबद्दल तिच्या मनात तिरस्कार आणि घृणा होती. ती पूर्णपणे नाहीशी झाली होती. ती जागा आता प्रेम आणि सहानुभूतिने घेतली. गीताकडून सर्व गोष्टी समजल्यापासून तिला निश्चित माहिती झालं होतं की आपला नवरा पैशाचा लोभी आहे. भुकेला आहे. स्वत: पैसे मिळवण्याची अंगात धमक नाही पण चैन करण्यासाठी लागणारा पैसा त्याला श्रीमंत सासऱ्याकडून हवा होता. गीताशी थापा मारून, तिच्या जीवनाशी खेळ खेळून, तिचं तारुण्य लुटून झालं होतं व लग्नाचा प्रश्न येताच तिची बदनामी करून तिला बरबाद केली. पण गीताचे नशीब सिकंदर होते. राजूभय्यासारख्या गुणी व्यक्तीने स्वत: होऊन तिच्याशी लग्न केलं, कलंक धुऊन टाकला आणि तिला प्रतिष्ठा दिली. उर्मिला नवऱ्याच्या वागणुकीने वैतागली त्याच्या पशुवृत्तीचा तिला तिरस्कार वाटू लागला. हे प्रकरण कोणत्या थराला जाणार आहे याचा विचार करूनच उर्मिला घरी पोचली. नरेश व्हरांड्यात फेऱ्या मारत तिची वाट पहात होता.

' तू या वेळी कोठून येतेस ?' त्याने रागाने विचारले.

एक शब्दही न बोलता उर्मिला आत निघून गेली. त्यामुळे नरेशचा पारा आणखीच चढला. आत येत तो म्हणाला,

' मी विचारतोय ते तुला ऐकू आलं नाही का ? तुझे कान फुटलेत की काय ? इतक्या रात्री तू कोठून आलीस ?'

उर्मिला एक शब्दही न बोलता कपडे बदलू लागली. तो उर्मिलाजवळ येऊन ओरडला. तिचा दंड जोराने पकडून हिसका देऊन म्हणाला.

वि...९

'माझ्या प्रश्नाचं बऱ्या बोलानं उत्तर दे. कोणत्या गिन्हाईकाच्या गळयात पडून झक मारून आलीस ?'

उर्मिलाने जळजळीत कटाक्ष फेकला आणि आपला दंड हिसकावून घेऊन ती दूर झाली. त्या वेळी तिला दारूचा भपकारा आला. संतापाने थरथरत ती म्हणाली,

'मी कोणाच्या गळयात पडून आले ते नंतर सांगेन पण प्रथम तुम्ही दारू का घेतलीत ते सांगा. मला तुम्ही वचन दिलं होतंत आठवण आहे का ?'

'दारू ! तू कोण विचारणार ? तू दारूचा तिरस्कार करतेस. माझा, या घराचा माझ्या माणसांचा तुला राग आहे नाही का ? पण लक्षात ठेव, मी दारू प्यायलोय आणि यापुढेही पिणार. ही दारू तुझ्या बापाच्या पैशाची नाही; समजलीस !' तिच्यापुढे बाटली दाखवत त्याने ग्लासात दारू घेऊन प्यायला सुरुवात केली.

या प्रकारामुळे आगीत तेल ओतल्याप्रमाणे झालं. अधिच ती गीताने सांगितल्यामुळे पेटून निघाली होती. आणि आता नरेशचं रांगडं वागणं. बोलणं, दारू पिणं यामुळे न भडकेल तरच नवल ! ती तिरस्काराने, खोच-कपणे म्हणाली,

'माझा बाप गरीब मनुष्य ! तुम्हाला दारू पाजायला त्याच्या जवळ पैसे आहेत कोठे ?'

'आणि तो बदमाश आम्हाला देऊन देऊन काय देणार ? गरिबांचे रक्त पिऊन त्या पाजी हरामखोरांनं पैसे जमवलेत, साल्यानं इतकी इस्टेट जमा केलीय बेचाळीस पिढयाना पुरेल. पण लाडक्या लेकीच्या हातात मात्र दिली आहे करवंटी. तो चांडाळ मरतानासुद्धा पैसा पैसा म्हणत येथेच घुटमळेल. त्या हरामजाद्या आमच्या सासऱ्याला लाकडा ऐवजी नोटातचं जाळा म्हणावं. अशाप्रकारे नरेशचं दारू पिणं आणि तोंडाचा पट्टा दोन्ही चालू होतं.

'आणि म्हणून तुम्हाला दु:ख झालंय. त्यांच्याकडून तुमच्या व्यासनाना पैसा मिळाला नाही म्हणून होय ना ?'

'मला त्या नीच माणसाचे पैसे मुळीच नकोत. भूत होऊन माझ्या मानगुटीवर बसेल.'

'हे पहा तुम्हाला जे काही म्हणावयाचं आहे ते मला म्हणा. पण माझ्या पपांना निष्कारण शिव्या दिलेल्या मला चालणार नाहीत.'

'अग जा. नीच, हलकट, लुच्चा त्याला कोण चांगलं म्हणेल? मी तोंडावर सुद्धा त्याला हेच शब्द वापरीन' आणि तो मोठ्यांदा हसू लागला.

'आपल्या अतर्यामी आधी काय आहे याचा विचार करा आणि मग माझ्या पपांना शिव्या द्या.'

'हां! हां! याझ्या अंतर्यामी काय आहे याची मला पूर्ण माहिती आहे.'

'तुमचं प्रेम माझ्यावर नव्हतं. प्रेमाचा देखावा करून मला फसवणं; तुमचा हातचा मळ आहे अगदी! तुम्हाला पपाच्या पैशाची लालसा होती. पपांनी सांगितलं तेच योग्य होतं.'

'तुझ्या पपांची बरोबरी कोण करील? त्या महात्म्याने या जगात पैशाव्यतिरिक्त काय मिळवलंय? त्याच्या डोळ्यासमोर नोटांच्या पुडक्या-शिवाय आहेच काय?'

'आणि तुमच्या नजरेला दुसरं काय येतय ते तरी कळू दे. तुमच्याजवळ थापा, भांडण आणि व्यसन याशिवाय काय आहे?'

'मी–मी तुला कोणता धोका दिला? तू माहेराहून आणलेली संपत्ती मी लुबाडली का?' नरेशनी भडकून विचारलं.

'भांडणाचं मूळच मूळी हे आहे. तुम्हाला महिन्याला तीनशे रुपये पगार मिळतो. मग मला पाचशे रुपये का सांगितलांत? हे घर तुम्ही आपली प्रॉपर्टी का सांगितलीत?'

'अग जा जा तुला कोणता आय. सी. एस. मिळणारा होता? आयला हलकट साली!

'मला आय. सी. एस. नाहीत आणखी कोणी मिळाला असता अगर नसता. पण थापा मारून, खोटं बोलून तुम्ही दोन व्यक्तींचं जीवन बरबाद केलंत हे लक्षात ठेवा.'

'मी आणि दोन व्यक्तीचे जीवन नष्ट केलं. तोंड सांभाळून बोला कोणते दोनं जीव?' नरेशनी नामानिराळेपणाचा आव आणला.

'अहाहा काय पण साळसूदपणाचा आव आणलात. तुम्हीच तर मला सांगितलं की राजूभय्याची पत्नी गीता उनाड आहे. वाईट चालीची आहे. लग्नापूर्वी एक मुलावर प्रेम करत होती. त्यापासून ती गरोदर झाली. अबॉर्शन केलं. गीता तुमच्या शेजारी रहात होती ! किती सुंदर गोष्ट सांगितलीत. पण मी मात्र हे समजू शकले नाही. तुम्ही गोष्ट अपुरी सांगितलीत. तुम्ही मला हे नाही सांगितलंत की हा सज्जन माझे पतिदेव आहेत. भ्याड माणसा तुला तुझ्या कृतीची लाज वाटली की काय ?'

'साफ खोटं, बिलकुल झूट, संपूर्ण खोटी गोष्ट ! आपण सध्या भांडतोय; त्याचा फायदा कोणी तरीं दुष्ट, नीच माणसाने घेतलाय खोटं उठवलंय.'

'मुळीच नाही, मी ऐकलं हेच सत्य आहे. आणि तुम्ही सांगता आहात तेच बनावट आहे. प्रत्येक गोष्ट मला समजून चुकलीय. तुम्ही लपवू शकत नाही. गीताने मला सर्व सांगितल आहे. तुम्ही तिचं जीवन बरबाद केलंत. आणि तिला आयुष्यातून उठविण्याचा प्रयत्न करीत होतात. त्या बिचारीचा गिधाडासारखा घास घेऊन आपल्या कृत्यावर पांघरूण घालण्यासाठी तिच्यावर अनेक अरोप केले होतेत. त्या बिचारीची मोठी चूक ही होती की तुमच्या अपेक्षा पुरविण्यासाठी तिचा बाप असमर्थ होता म्हणूनच तुम्ही तिला लाथ मारलीत. तिचं सर्व ओरबाडून घेऊन स्वार्थासाठी स्वतःच्या अंकुराचा बळी घेतलात. आणि त्यानंतर आपलं मोहजाल माझ्याभोवती पसरायला सुरुवात केलीत आणि दुर्दैवाने त्यात मी सापडले. माझ्या वडिलांनी तुम्हाला काही दिलं नाही. म्हणून माझ्या आयुष्याची लक्तर लोंबवू पहात आहात. छाती असेल तर सांगा हे सारं खोटं आहे.'

'स्वतःला फार शहाणी समजतंस. या गोष्टीवर तू विश्वास ठेवतेस ?'

'का ठेवू नको. हे सर्व सत्य आहे याच्याबद्दल माझी खात्री आहे. राजूभय्या एक थोर माणूस आहे. त्यानं दुर्दैवी गीताला जीवदान दिलंय आणि तिच्या आयुष्याला एक वेगळंच वळण लावले आहे.'

'नरेश स्वतःला सावरीत मनाशी म्हणाला, 'गोष्ट फार बिघडली आहे. जरा सांभाळून, सावधपणे पाऊल उचलायला हवंय'

'हे साफ खोटं आहे उर्मिला !'

'खोटं आहे काय खोटं आहे ?'

'मी गीताचे आयुष्य बरबाद केलंय असं ती जे म्हणतेय त्यात काहीही सत्य नाही.'

'मग खरं काय ?'

'मी तुला सांगतो त्याच्यावर तूं विश्वास ठेव अगर ठेवू नकोस. हा राजूभय्याचा डाव दिसतोय. त्यानं गीताला माझ्यापासून दूर केलं. 'तो तिच्यावर प्रेम करीत होता; म्हणून त्यानं गीताच्या विरुद्ध मला वाटेल ते सांगून माझं मन भडकवलं आणि गीताशी लग्न होऊ दिलं नाही. कारण त्याला स्वत:ला तिच्याशी लग्न करायचं होतं. ?

'हे बोलायला तुमची जीभ कशी धजते ? राजूभय्यावर तुम्ही आरोप कसे करू शकता ? तो महापुरुष दुधासारखा निर्मळ, स्वच्छ आहे. खोटं बोलणं, लुबाडणं, दुसऱ्यांना धोका देणं, थापा मारणं, ह्याला त्याच्या आयुष्यात स्थान नाही.'

'ओहो ! राजूभय्याचं वकिलपत्र तुम्ही घेतलेलं दिसतय.'

'वकिली करण्याचा प्रश्न येतोच कुठे ? सत्य तेच बोलतेय. तुम्ही एका स्त्रीचं जीवन उद्ध्वस्त केलंत. आपल्या मुलाचा खून केलात. तुम्ही पापी आहात, दुष्ट आहात. आणि राजूभाईवर आरोप करताहात—वा रे न्याय !'

उर्मिलेच्या शब्दाशब्दात नरेशबद्दल घृणा आणि तिरस्कार होता. नरेश समजून चुकला. परिस्थिती आपल्याविरुद्ध गेली होती. डाव अंगाशी आला होता. तो एक शब्द बोलला की, त्याच्यावर दहा शब्दांचा मारा होई. उर्मिला अंगार ओकत होती आणि त्याच्या पदरात पुरेपूर माप घालीत होती. हे समजूनसुद्धा तो स्वत:ला आवरू शकला नाही. आणि पुन्हा तिला म्हणाला,

'तू इतक्या रात्री त्या महापुरुषाच्या मिठीतूनच आलेली दिसतेस. आणि आता आपलं पाप लपविण्यासाठी स्वत:च्या नवऱ्यावर आकांडतांडव चाललेलं आहे हे मी समजू शकतो.'

'शुद्धीवर आहात का ?'

'का नाही ? तो आज महापुरुष झालाय ना ? गीताला माझ्यापासून हिरावून घेतलं आणि आता माझ्या बायकोवर प्रभाव पाडतोय. आणि माझी मूर्ख बायको माझ्यावर उचलली जीभ लावली टाळघाला अशी बडबडते आहे.'

'साफ चूक आहे. राजूभाईवर निष्कारण तुम्ही आग पाखडता आहात. तुमच्या मनाला लाज वाटायला हवी.'

'तुला राजूभय्याबद्दल एवढी सहानुभूती वाटते? त्याच्याबद्दल काही ऐकून घेत नाहीस. आत्ता माझी खात्री झाली की त्या भवऱ्यांत, त्या भड-व्याच्या प्रेमात तू सापडलीस' नरेश तणतणत म्हणाला.

'खबरदार–तुम्ही तोंड आवरा! माझ्यावर केवढा आरोप तुम्ही करताहात आणि आपल्या प्रिय मित्राला घाणेरडया शिव्या देताहात. याची काही जाणीव आहे का? तुमचे डोकं ताळ्यावर आहे ना?'

'आरोप?' तुच्छतेनं नरेश पुढे म्हणाला, 'सत्य गोष्टीला आरोप म्हण-तेस? त्या सज्जन माणसाला मी चांगलाच ओळखतोय. तू आणि गीता दोघीच नाही–उष्टा माल चघळण्यात तो चांगलाच तरबेज आहे. अशीच एक वेश्या व्यवसाय करणारी स्त्री–तिचं नाव शुभांगी ती तुझ्या राजूभय्याच्या बिछान्यात नेहमी असते.'

'तुम्हाला मी बजावतेय तुमची जीभ आवरा' उर्मिला राग न आवरून रडू लागली.

'का माझी जीभ बंद करू? लाडक्या भाईची गोष्ट ऐकून तुला दु:ख झालंय?'

'पुन्हा बजावतेय याचा परिणाम वाईट होईल.'

'जा, जा जाऊन सांग त्या साल्याला. मी मुळीच भीत नाही.'

'बस्स बस्स फार झाले. मी या घरात एक मिनिटभरही थांबू शकत नाही.' असं म्हणून उर्मिला दार उघडून निघाली.

'तू कुठे निघालीस?'

'मसणांत!'

नरेश तिच्या पाठीमागून पळत दरवाजामागे गेला व हात पसरून तिचा रस्ता अडवला. 'तू काय समजलीस. हे घर म्हणजे धर्मशाळा आहे. जेव्हा मनाला येईल तेव्हा यावे आणि मनाला येईल तेव्हा कुठेही जावे.'

'माझा रस्ता सोडा.' उर्मिला रडत पण निर्धाराने म्हणाली.

'जा आत जाऊन बैस' नरेशनी दरडावून सांगितले.

उर्मिलाने त्याचा हात झिडकावरून बाहेर जाण्याचा प्रयत्न केला. पण नरेशनी सारी शक्ती एकवटून तिच्या २।३ थोबाडीत मारल्या.

'हेच तेवढं बाकी होतं–मारा आणखीन मारा. जीव घ्या एकदाचा माझा.' असे म्हणत तिने तोंड पुढे केले. त्याचवेळी नरेशनी आणखी दोन तडाखे हाणून ओढत आणून खोलीत ढकलली. आरडाओरड ऐकून आजूबाजूचे लोक जमले. नरेशचे आईवडिल वरून खाली आले. आणि ती संधी साधून गर्दीतून उर्मिलाने पळ काढला. नरेशही तिच्यामागे बेभान होऊन धावला पण लोकांनी त्याला घट्ट पकडून ठेवले. इतक्यात उर्मिलाला टॅक्सी मिळाली व ती आपल्या आईकडे गेली. इतक्या अपरात्री अशा अवतारात उर्मिला टॅक्सीतून रडत घरी येताच घरातली सर्व मंडळी आश्चर्यचकित होऊन एकत्र गोळा झाली. 'एवढ्या रात्री बेटा तू एकटीच आलीस. आणि एवढे लालभडक तोंड का झालंय? काय झालंय माझ्या लेकराला' तिची आई तिला मिठी मारून रडत म्हणाली.

उर्मिलेला आईच्या मायेची उब व आधार मिळताच जोरात रडू आले. तिचे पपासुद्धा झोपेतून उठून खाली आले. त्यांनीही तिला प्रेमानी जवळ घेतली.

उर्मिलाने गीताचा नरेशशी संबंध, अॅबॉर्शन, लग्नात काही न मिळाल्यामुळे चाललेलं भांडण–रात्रीची घटना सर्व रडत रडत आई-वडिलांना व भावाना सांगितले.

'पपा, तुम्ही सांगितलंत ते खरं होतं. नरेशचे प्रेम माझ्यावर नव्हते. तो आपल्या पैशावर प्रेम करीत होता. आणि पैसा मिळाला नाही म्हणून माझा जीव घेत होता.'

'पण बेटी आता खूप उशिर झाला आहे. तुझा हट्ट होता म्हणून मी नाईलाजाने होकार दिला. लग्नात कुठलीही गोष्ट मी मनापासून केली नाही. लग्नानंतर मी तुला विसरण्याचा प्रयत्न करीत होतो. पण तुझी आई तुझ्या आठवणींनी आणि तुझ्या परिस्थितीनं तळमळते आहे. रोज अश्रू गाळते आहे. बेटा तू एकक पैशासाठी तडफडत होतीस, कष्ट करीत होतीस हें मला कळत नव्हते का? पण आम्ही तरी काय करणार? तू तुझा हट्ट पुरा केलास आणि आम्ही आमचा स्वाभिमान जपत होतो.

तळहाताच्या फोडासारखी तुला जपली. जरा तुला पडसं आलं, अंग गरम झालं तर रात्ररात्र आम्ही दोघांनी हाताचा पाळणा करून जाग्रणं केली. अजूनही काही बिघडलं नाही. नरेशरावांना मी समजावीन. आपल्या कारखान्यात त्यांना चांगल्या जागेवर कामाला ठेवून भरपूर पगार देतो. आणि चांगला फ्लॅट सजवून देतो म्हणजे मग सर्वकाही ठीक होईल. हसा पाहू आता दोघी मायलेकी ! उमाच्या आई, लेकीला जेवायला घाला पोर भुकेलेली आहे.'

'नाही पपा आता नाही. मला इतकं सगळं माहीत नव्हतं. माझा नवरा हा एक हलकट माणूस आहे. त्याच्या डोक्यावर एका मुलाच्या खुनाचा आरोप आहे आणि एका स्त्रीला त्यानी आयुष्यातून उठवलय. मी त्याच्या-बरोबर माझा संसार निभावू शकणार नाही.'

'यावेळी तू फार रागात आहेस. उर्मिला, आता तू तोंड धू. जेव आणि शांतपणे झोपी जा. सकाळी आपण काय ते ठरवून त्यातून मार्ग काढू या.' असं म्हणत पपा झोपायला गेले.

उर्मिलाने उत्तर दिले नाही. परंतु तिने आपला निर्णय, आपला रस्ता निश्चित ठरवला होता.

* * *

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे पपा कामावर गेले. ऑफिसमध्ये जात असतानाच त्यानी विचार केला लहानसहान कुरबूर नवराबायकोत होतच असते. आणि ती नाहीशी होते. पण उर्मिलाने केवळ लग्नाच्या बाबतीतच नव्हे प्रत्येक गोष्ट आपली तीच खरी केली. तिचा स्वभाव हट्टी आहे. शिवाय एकुलती एकच लाडकी मुलगी, श्रीमंतीत वाढलेली, त्यांतून हुशार आणि आतां सर्वच परिस्थितीत जमीन–अस्मानाचा फरक. तरी बरं स्वतःच्याच हातांनी पायावर धोंडा पाडून घेतलाय. ना त्या मुलाला शिक्षण, ना डिग्री कपडे, छान छोकी पाहून फसली पोर !

* * *

संध्याकाळीं पपांचे मित्र चंद्रचूड वकील यांच्याकडे उर्मिला गेली. तिला पाहताच ते म्हणाले,

'उर्मिला, बेटी तू माझ्या ऑफिसात आणि यावेळी सर्व कुशल आहे ना?' वकिलकाकांनी साशंकमुद्रेने विचारले.

तोंडावर उसने हास्य आणून उर्मिला म्हणाली, 'होय.'

'लग्नानंतर तुला आज प्रथमच पहातोय. काय म्हणाताहेत तुमचे पतिराज ? '

'फार छान आहेत. '

'सांग. आज इथं कशी काय वाट चुकलीस ? '

तुमच्याकडे एक काम आहे !'

'कोणतं ? '

'तुमच्याकडे माझं काम कोणतं असणार ? काका, तुम्ही माझी केस हाती घ्याल ? '

'केस आणि तुझी ? जरूर घेईन. माझ्या उर्मिला बेटीची केस– अग तुझा पपा आणि मी लंगोटीवर हसलो, खेळलो, भांडलो, शिकलो आम्ही एकत्र ! आणि आता एकाच गावात राहतोय. तुझ्या बापाची सर्व कामे वकील या नात्याने मीच पहातोय. मग त्याच्या लाडक्या लेकीचं काम माझ्याशिवाय कोण पाहाणार ? अग वरचा परमेश्वर आला तरी तुझा काका उर्मिलेसाठीच लढेल त्याला मुळीच भिणार नाही. सांग कसली केस आहे ? तुझ्या नवऱ्याच्या इस्टेटीसंबंधी काही भानगड आहे. का ? आणि काय ग जावयाला का नाही घेऊन आलीस ? '

'काका, केस दुसरी कुठलीही नाही. त्यांची आणि माझी आहे. प्रथम मला सांगा फी किती पडेल ? '

'फी–फी ? ' चंद्रचूड हसू लागले 'तू आपल्या काकाला सुद्धा फी देणार ? माझ्यासारखा म्हातारा किती दिवस जिवंत रहाणार आहे ? माझ्या मुलीसारखी तू आणि असल्या गोष्टी मला ऐकाव्या लागाव्यात ना ? वेडी पोर. तुझी आणि तुझ्या नवऱ्याची केस माझ्या दृष्टीने एकच आहे. आणि जावयाकडून मी फी घेणार ?'

'या गोष्टी राहू देत.' उर्मिला घुश्श्यात म्हणाली, 'असल्या कुठल्यातरी फालतू गोष्टी नकोत. फालतू वकिलाला घेऊन केस चालवावी असं मला वाटत नाही. काका म्हणून केस तुम्हालाच चालवावी लागेल व तुम्हालाच चालवावी लागेल व तुम्हाला फी सुद्धा घ्यावी लागेल.'

'फारच उत्तम. फी घेतो मी. पण पोरी केस कोणत्या स्वरूपाची आहे ते तरी प्रथम सांगा.'

'केसचे स्वरूप नंतर सांगेन. प्रथम फी सांगा' उर्मिला हटूनच बसली.

'फी मी तुझ्या पपांकडून दामदुप्पट वसूल करीन.'

नाही. फी पपांच्याकडून मी नाही घेऊ देणार.'

'अच्छा. बेटी मी हरलो. नव्या रक्ताला हरवायला माझ्या अंगात ताकद नाही.'

'काका, आपला वेळ फार मौल्यवान आहे. बाहेर डझनावरी वकील घोटाळताहेत चार-दोन रुपयांसाठी तोंड वेंगाडताहेत. आपली फार मोठी योग्यता आहे हे जाणते.'

'बस बस काकाचे कौतुक. केसचे स्वरूप तर ऐकू दे.'

पहिली फी सांगा.

'अग केस ऐकल्यावर फी सांगेन. जसं काम तसं दाम.' हसतच चंद्रचूड म्हणाले.

'डायव्होर्स केस आहे' उर्मिला म्हणाली.

'डायव्होर्स? कोण घेणार आहे?' आश्चर्याने चंद्रचूडांनी उर्मिलाकडे पाहिले.

'मी!'

'तू— तू– माझी म्हाताऱ्याची चेष्टा चालविलीस होय?'

'नाही काका, सत्य आहे.'

'पण उमा तू आपल्या पसंतीने प्रेमविवाह केलास. तुझा पपा डोक्यात राख घालून बसला होता तेव्हा मीच त्याला समजावलंय'

'माझी निवड दुर्दैवानं चुकीची ठरलीय काका.'

चंद्रचूड दीर्घश्वास घेऊन मिशीवर हात फिरवू लागले. गंभीर विचारात

असले की मिशांना कुरवाळीत त्यांची तंद्री लागे. त्यांची ही संवय सर्वांच्या परिचयाची होती.

'काका, आपण कोणत्या विचारात आहात ?' ते गप्प बसलेले पाहून उर्मिलाने विचारले. 'आणि केस घेणार नसाल तर तसे सांगा म्हणजे मी दुसरा मोठा वकील पाहीन. खूप मोठे वकील आहेत गावात!' आणि ती रडू लागली.

'उर्मिला, तुझ्य पपांनी या गोष्टीला परवानगी दिली आहे ?'

'डायव्होर्स मी घेणार आहे. पपा नाही!' एकदम डायव्होर्स मिळत नसतो. प्रथम सेपेरेशनसाठी अर्ज करावा लागतो. तीन वर्षांनंतर डायव्होर्स मिळतो. चंद्रचूड म्हणाले.

'मला डायव्होर्स पाहिजे केस कशी चालवायची ते काका तुमचं काम. दोघांच्या संमतीने आजकाल लगेच डायव्होर्स मिळतो. नुकताच माझ्या मैत्रिणीचा डायव्होर्स झाला. काही तीन वर्षं थांबण्याची गरज नाही. शिवाय माझ्या जवळ पुरावा भरपूर आहे नरेशच्या विरुद्ध.'

'तू विसरलीस हे लग्न तू त्याच्या मनाविरुद्ध केलंस आणि त्याला विचारल्याशिवाय तू डायव्होर्स घेतेस?'

'हा माझ्या मताचा प्रश्न आहे.'

'अरे राम' चंद्रचुडानी एक दीर्घश्वास घेला आणि फोनचा रिसिव्हर हाती घेतला.

'काका, तुम्ही पपांना फोन करताहात.'

'होय!'

'नको नको काका त्यांना फोन करू नका प्लीज. हा माझा आयुष्याचा प्रश्न आहे'

'हा तुझा अखेरचा निर्णय आहे.'

'होय काका.'

'अंहं– आता काका नाही वकीलसाहेब म्हण' आणि त्यांनी हातातला रिसिव्हर खाली ठेवत विचारले,

'कांय तुझी तक्रार आहे बोल.'

तिने सांगायला सुरुवात केल्यावर लिहिण्यासाठी कागद पुढे ओढले पंधरा मिनिटांच्या आतच उर्मिलाने आपली कैफियत मांडली ' वकिलकाकानी सर्व पाईंट नोटडाऊन केले व उर्मिलेला वाचून दाखविले.

'आता फीचा आकडा सांगा.'

'तुझ्या इच्छेला वाटेल तेवढी फी तू दे.'

'नाही. तुम्ही सांगा.'

'ठीक, १५ रुपये दे.'

'नाही काका, आपण माझी चेष्टा करताहात. मी गंभीरपणे तुम्हाला विचारते आहे. ५०० रुपयांपेक्षा कमी फी तुम्ही स्वीकारीत नाही हे मला माहीत आहे.'

'ती माझ्या मनाची मर्जी. कधी ५००, कधी हजार, कधी १५-२० रुपये तर कधी काहीसुद्धा घेत नाही.' हंसतच चंद्रचूड म्हणाले.

'बरं ठीक आहे. तूर्त हे तरी ठेवा' असे म्हणत उर्मिलाने पर्समधून शंभर रुपयाची नोट काढली.

'अग माझ्याजवळ मोड नाही उद्या दे.'

पण त्यावर उर्मिला काहीच बोलली नाही व नोट परत घेतली नाही. उभी रहात म्हणाली,

'पुन्हा मी केव्हा येऊ !

'उद्या संध्याकाळी. मी रात्री केस तयार करून, सकाळी टाईप करून घेइन संध्याकाळी तू येऊन केस पहा व सही करून जा.'

'ठीक आहे. मी येते. नमस्ते' म्हणून तिनें निरोप घेतला.

उर्मिला जाताच चंद्रचुडांनी उर्मिलाच्या वडिलांना फोन केला. ते घरीच आलेले होते.

'नमस्ते दोस्त आत्ताच उर्मिला येऊन गेली.'

'तुझ्याकडे.'

'होय. आणि १०० रु. ची नोट देऊन गेली.

'ती कशाला ?'

'ती काकाला भेटायला नव्हती आली. चंद्रचूड वकीलाला भेटायला आली होती.'

'म्हणजे काय ? कशासाठी ?'

'ती नवऱ्यापासून डायव्होर्स घेणार असं म्हणतेय आणि त्याचं वकिलपत्र मला दिलंय.'

'काय ?' आश्चर्यानं अवाक होऊन ते क्षणभर गप्पच झाले.

'होय !'

'चंद्रचूड अरे या मुलीचे डोकं फिरलंय. प्रथमपासूनच मी या लग्नाच्या विरुद्ध होतो हे तुला ठाऊकच आहे. पण या माथेफिरू पोरीने सारं घर दणाणून सोडले म्हणाली, 'लग्न करीन तर याच्याशीच नाहीतर जीव देईन' आठवतंय ना ? तिच्यावर माझा फार जीव आहे रे ! त्यामुळे कितीही रागावलो तरी प्रत्येक गोष्ट तिच्या मनासारखीच करतो आहे. तिचं चांगलं व्हावं अशी माझी इच्छा. या मूर्ख मुलीनं मला त्या वेळी शत्रू मानलं. तिचं लग्न झालं त्या रात्री मी पोटभर रडून घेतलं. काल रात्री ती एकाएकी आली आणि आता ऐकवतोयस की ती डायव्होर्स घेणार आहे. या पोरीनं माझं खेळणं बनवलंय.'

'अरे बाबा, तू घाबरू नकोस. मी तिला समजावतो. म्हणूनच तिला मी चुचकारलं. तिचं म्हणणं ऐकून घेतलं. मी नाही म्हटलं असतं तर ती नक्कीच दुसऱ्या वकिलाकडे गेली असती आणि तुला माहीतच आहे, आम्हा वकिलांची इमानदारी.'

'धन्यवाद चंद्रा. किती आभार मानू तुझे ?'

'आभार कसले मानतोस लेका ! हे माझे कर्तव्यच आहे. दोनचार दिवसांत तिचा राग थंड होईल. मी खोटं खोटं काम करतो. कैफियत वगैरे मांडत नाही.'

'मित्रा हे फार छान करतोस.'

'तू सुद्धा तिला समजाव आणि तुझ्या जावयाला एकदा जावून भेट.

'होय जरूर भेटतो' आणि त्यांनी फोन बंद केला.

* * *

उर्मिलाच्या वडिलांना आपल्या मुलीसाठी नमते घेणे भागच होते. ते स्वत: नरेशकडे गेले व त्यांनी समझौता करण्याचा खूप प्रयत्न केला. उर्मिलाची तक्रार होती की नरेशनी खोटे बोलून आपणाला फसवले आहे. त्याला पगार फक्त तीनशेच मिळत असताना त्यांनी पाचशें रुपये सांगितला. एका मोठ्या फर्ममध्ये नोकरीला आहे. बढती मिळणार आहे. पुढील शिक्षणासाठी परदेशीसुद्धा पाठविणार आहेत अशा थापा मारल्या. गीताला त्याने लाथ मारून उर्मिला श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी तिच्याकडून आपल्याला खूप मिळेल या अभिलाषेनंत्याने तिच्यावर प्रेम केलं. परंतु लग्नात त्याला कांहीही मनासारखं मिळालं नाही. दारू, सिगरेट वगैरे व्यसनं असणाऱ्या नरेशला पैसा पुरेना व त्याचे रूपांतर भांडणात होऊ लागले.

उर्मिलाच्या आईवडिलांनी मुलीसाठी विचार केला त्याला कंपनीत नोकरी द्यावी. तिच्या नावे जी काही रक्कम ठेवली आहे त्याचे व्याज दरमहा तिला मिळावे अशी व्यवस्था करावी. व्याजाची रक्कम महिना चारशे रुपये होत होती. त्यामुळे दोघेही मजेत राहातील.

पण उर्मिला कोणत्याही परिस्थितीत नरेशशी संबंध ठेवण्यास तयार नव्हती. तिच्या मनात त्याच्याबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला होता. तिच्या अंतःकरणात गीताला दिलेल्या धक्क्याची जखम वाहात होती. गीताचे जीवन उद्ध्वस्त करून आता आपले जीवन नष्ट करण्यासाठी हा अधम उभा होता. अशी तिची मनोमनी खात्री झाली होती. कितीही पैसे आणि कितीही चांगली नोकरी मिळाली तरी नरेशजवळ इमानदारी शून्यच होती. अंतःकरण ही काय चीज आहे हे त्याला माहीतच नव्हते. याची तिला खात्री पटली होती.

उर्मिला जिद्दीला पेटली होती. अनेक जवळच्या लोकांनी तिचं मत बदलण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ आणि शेवटी केस कोर्टात दाखल केली गेली. नरेशला समन्स आले. त्याने समन्स स्वीकारले नाही. त्याला स्वप्नातही वाटले नाही. की उर्मिला आपल्याला कोर्टाची पायरी चढवील. लग्नाच्या वेळी जे मिळालं नाही ते तिचा बाप स्वत:हून पाया पडत आला आणि वाटेल ते देण्यास तयार झाला आणि त्यामुळे नरेश खूष झाला. आणि इकडे उर्मिलाने ते अमान्य करून डायव्होर्ससाठी कोर्टात केस केली.

नरेश उर्मिलेला भेटण्यासाठी चार–पाचवेळा तिच्या घरी गेला परंतु तिने त्याची भेट घेतली नाही.

नरेशवर सर्वांनी हल्ला केला. भरपूर तोंडसुख घेतले. पैशाच्या लोभाने बायको जाण्याची वेळ आली. डायव्होर्स घेण्यापूर्वी उर्मिला आई झाली असती तर तिने शंभरवेळा विचार केला असता. आई-बापांना एकत्र जोडणारा दुवा म्हणजे मूल. आणि या ठिकाणी तीच कमतरता होती.

या चमत्कारिक परिस्थितीत तो एकांगी झाला होता. कोणी त्याला सल्ला देणारं नव्हतं. राजेशला तर तो शत्रूच समजू लागला होता. त्याचे घर त्याने कधीच व्यर्ज केले होते. त्यामुळे हे सर्व विसरण्यासाठी त्याला दारूचा आश्रय घ्यावा लागला. दारूच्या सानिध्यात त्याचे विचार अधिकच भडकू लागले आणि माशासारखा तो तडफडू लागला. एक महिना होऊन गेला आणि एक दिवशी त्याच्या दारावर समन्स चिकटवले गेले. तरीसुद्धा तो कोर्टात गेला नाही. केस एकतर्फी चालली होती. एकदिवस न्यायालयाकडून पेपरात बातमी जाहीर झाली आणि ती नरेशनी वाचली. त्या दिवशी तो बेसुमार पिऊन उर्मिलाच्या बंगल्यावर गेला. पण तिने त्याची भेट घेणं साफ नाकारले.

नरेशला उन्माद चढला होता. तो जाणत होता. तिच्या केसचा विजय होणार होता. आपल्या पापाचं प्रायश्चित्त आपणाला पुरेपूर मिळणार आहे. पापाचे घडे भरले होते. त्याला उर्मिलाचं कोणतंच नुकसान करता येत नव्हतं.

त्या बेभान अवस्थेतच तो घरी आला. विचार करू लागला पण विचार करण्याची ताकदसुद्धा आता त्याच्या जवळ शिल्लक राहिली नव्हती.

* * *

निकालाच्या दिवशी उर्मिला कोर्टात गेली. तिच्या केसचा नंबर दुसरा होता. ती अस्वस्थपणे आजूबाजूला पहात होती. छाती भीतीने धडधडत होती. अचानक नरेश येथे न येवो. म्हणून ती देवाची प्रार्थना करीत होती. कारण त्याच्या येण्याने आत्तापर्यंत केलेला प्रयत्न फुकट गेला असता. ऐनवेळी त्या

नीच माणसाने वाटेल ती माघार घेतली असती आणि डायव्होर्स होऊ दिला नसता. आतापर्यंत एकतर्फी काम झाले होते. आणि आज शेवटचा दिवस होता. आणि तो न आला तर निश्चित डायव्होर्स मिळणार ही तिची खात्री होती.

नरेश गप्प बसून तिला मानसिक पराजय देत होता. तर ती कायदा हातात घेऊन त्याचा पराजय करणार होती. म्हणून ती या वेळ फार अस्वस्थ होती. तिची केस पुढे येताच तिच नाव पुकारल गेलं. पूर्वी न्यायालयात तरुण मंडळी, घरातील स्त्रिया फार कमी दिसत. पण हिंदू मॅरेज ॲक्ट पास झाल्यापासून मोठमोठ्या घराण्यातील सुशिक्षित स्त्रिया न्यायालयात येऊ लागल्या. 'उर्मिला' म्हणून कोणतरी मोठ्याने हाक मारली. घाबरून तिने ज्या दिशेनी हाक आली तिकडे पाहिले आणि म्हणाली,

'नमस्ते भय्या,' यावेळी त्याला पहाताच तिला आनंद तर झालाच पण त्याचा फार मोठा आधार तिला वाटला.

'उर्मिला, तू येथे का उभी आहेस?'

'मी–मी' तिच्या तोंडातून शब्द उमटेना. घशाला कोरड पडली राजेशनी तिच्या डोळ्यात निरखून पाहिले व विचारले, 'कसला विचार करतेस?'

'नाही भय्या, कसलाही विचार करत नाही' दीर्घ उसासा टाकीत ती म्हणाली,

'आज माझ्या केसचा निकाल आहे.'

'तुझ्या केसचा निकाल?' राजेशनी आश्चर्यानी विचारलं. 'कोणी तुझ्यावर केस चालविली आहे?'

'नाही रे बाबा–मीच कोर्टात केस केली आहे.'

'तू–आणि कोणावर?'

'नरेशवर'

'नवऱ्यावर?'

'होय.' आणि तिच्या डोळ्यातून अश्रू ठिबकले.

'मी डायव्होर्स घेतेय.'

'तू...तू...आणि डायव्होर्स?'

'भय्या' अतिशय दु:खाने तिने हाक मारली. तिचा गळा दाटून आला आणि तिला पुढे बोलवेचना.

'तू आणि नरेश सहा–सात महिन्यांत भेटला नाहीत. मला वाटले तुमचे भांडण मिटले. तुम्ही मजेत असणार म्हणूनच माझ्याकडे येण्यास वेळ झाला नसेल. याच समजुतीत होतो मी ? तुमचं भांडण इतक्या विकोपाला गेलं आहे. केस दाखल करण्यापूर्वी तुला आपल्या भाईची आठवण झाली नाही ? इतका परका मला कधीपासून समजतेस ?'

'नाही भय्या, साक्षीपुराव्यात जरूर लागली तर माझ्या यादीत तुमचं आणि गीतावहिनींचं नाव घातलं आहे. तुम्हा दोघांना विसरणं कसं शक्य आहे ?'

'माझं आणि गीताचं नाव साक्षीदार म्हणून तू यादीत घातलेस ? उर्मिला, तू हे काय करतेस ? अग प्रथम मला नुसतं विचारायचंस तरी ! नरेशशी भांडण झालं आणि तू सरळ न्यायालयापर्यंत पोचलीस ? पहिले दिवस विसरलीस ? लग्नाच्यापूर्वी तुम्ही दोघ माझ्या घरी येत होतात. माझा सल्ला घेत होतात. प्रत्येक गोष्टीत माझी तुम्हाला जरुरी होती. आणि आता लग्न मोडण्याच्या वेळी माझ्या सल्ल्याची तुम्हाला जरुरी वाटली नाही का ? निदान नुसती सूचना करण्याचीही गरज वाटली नाही काय ?'

'भाई, मला क्षमा करा. वास्तविक मी तुम्हाला भेटायला येणार होते.'

'हेच सांगायला तू येणार होतीस का की आम्ही डायव्होर्स घ्यायचं ठरवलय.'

'नाही. मला आपली साक्ष हवी होती.'

'शाब्बास ! तू असा विचार केला असावास की केवळ घर उभं करण्यासच तुला मदत करत नसून ते मोडण्याचाही सल्ला तुला देतोय.'

'भय्या, तुम्ही मला का लाजवताहात ? तुम्हाला माहीत नाही का की नरेशनी मला वाईट तऱ्हेने वागवून मारपीटही केली आहे.'

'त्या भेटीनंतर मला परत कधी भेटलीस ?'

'कांही झालं तरी नरेश माझा पती म्हणवून घेण्यास मी तयार नाही आणि आता मी माघारही घेणार नाही.'

वि...१०

'तुझ्यासारख्या भावनाप्रधान मुलीचं जीवन क्षुल्लक कारणावरून बिघडून जातं आणि नाही त्या गोष्टी या थरापर्यंत पोचतात. बरं ते जाऊ दे. नरेश कुठे आहे ?'

'ते येथे आले नाहीत.'

'मग एकलफींच केस चालली आहे ?'

'होय.'

'आणि आज न्यायसुद्धा एकतर्फीच दिला जाणार ?'

उर्मिला खाली मान घालून म्हणाली, 'होय.'

'पुरे झाला हा वेडेपणा आणि हे नाटक. नवरा-बायकोच्या भांडणात न्यायालयात न्याय मिळत नाही. लग्न हे दोन व्यक्तींचा मिलाप आणि आत्म्याचा संबंध आहे. कायद्याचा नाही. असा कोणता कायदा आहे का की जो दोन व्यक्तींच्या अंत:करणांत प्रेम पैदा करील ?'

'पण भाई आज...'

'काही होणार नाही. कोण वकील आहे तुझा ?' मी भेटतो आणि हे काम स्थगित करतो. यापूर्वी एकदा जरी भेटली असतीस तरी मी काहीतरी मार्ग काढू शकलो असतो. न्यायालय—न्यायालय म्हणे न्याय देणार—'

'पण भय्या, आता पुष्कळच वेळ झाला आहे.'

'मुळीच झाला नाही.' राजेश रागाने म्हणाला.

'मूर्ख बडबड बंद कर आणि तुझ्या वकिलाकडे चल. नाव सांग त्यांचे.'

'नाही. भय्या आता काही उपयोग नाही.'

'मी फक्त काम स्थगित करायला सांगणार आहे. मला तुला काही सांगायचं आहे. तुला पसंत पडले नाही तर न्यायालय तुझ्यासाठी उघडंच आहे केस परत घे. म्हणून मी तुला सांगत नाही. फक्त मुदत मागून घेणार आहे. तीसुद्धा फक्त दोन आठवड्यांची ! जे आज घडणार होतं ते आणखी दोन आठवड्यांनी घडेल. हा माझा तुला आग्रह आहे.'

इतक्यात समोरून चंद्रचूड येत होते. उर्मिलाने खुणेने त्याला दाखविले.

'मी आता आलोच' म्हणत राजेश वकिलाच्या दिशेकडे पटकन गेला, त्यांची भेट घेतली.

'माझं नाव राजेश, मी... उर्मिलेचा मानलेला भाऊ, हितचिंतक आहे.' असे म्हणत त्याने हात पुढे केला.

'तुम्हाला पाहून मला आनंद झाला.' शिष्टाचाराला धरून चंद्रचूड म्हणाले.

'उर्मिलाने सांगितले की आपण तिची केस चालवीत आहात ?' एवढ्यात उर्मिला तेथे आली.

'होय !' चंद्रचूड उर्मिलाकडे पहात म्हणाले.

'वकीलसाहेब आपणाला माझी एक विनंती आहे.'

'सांगा'

'उर्मिला म्हणाली आज तिच्या केसचा निकाल आहे. माझी विनंती आहे केस स्थगित करावी.'

'स्थगित ?' चंद्रचूड म्हणाले.

'होय.'

'का बुवा ?'

'माफ करा. वकीलसाहेब मी इथे माझ्या एका केसच्या कामासाठी आलो होतो, आणि अचानक उर्मिलेला पाहिले आणि मला धक्काच बसला. शिवाय आत्ताच समजलं की ती डायव्होर्स घेते आहे. मला दुःख वाटते की ही वेडी मुलगी गेल्या ७।८ महिन्यांत मला भेटली नाही. यांचं भांडण इतक्या विकोपाला जाईल असं मला कधीही वाटले नव्हते. यापूर्वीच मला ही गोष्ट समजली असती तर तिला मी येथे येऊच दिलं नसतं.'

'मला स्वतःलासुद्धा हे पसंत नव्हत. ही माझ्या दोस्ताची मुलगी आहे. प्रथम मी तिची चेष्ट केली. तिच्या पपांनीसुद्धा तिला खूप समजाविले. पण ही कुणाचंच ऐकायला तयार नाही. मिस्टर राजेश मी म्हातारा माणूस. सर्व हयात न्यायालयात घालविली. पण आता काळ बदलला आहे. मी न्याय करण्यासाठी कायद्याचा अभ्यास केला. पण माझ्या स्वप्नातही नव्हतं की म्हातारपणी माझ्या मुलीचे प्रथम लग्न आणि त्याच हातानी डायव्होर्स-साठी न्यायालयात न्याय मागावा लागेल. उर्मिला ही माझ्या मुलीसारखीच मला आहे म्हणून नाइलाजाने मला हे करणे भाग पडतंय. ही आजची

तरुण मंडळी माझ्या पांढऱ्या केसांची सुद्धा पर्वा करीत नाहीत. विचारा विलाच मी किती प्रकाराने तिला समजावलं !'

'वकीलसाहेब ती आपल्या पपांच्याविरुद्ध विरोध करील ती तुमची गोष्ट मानू शकणार नाही. पण माझ्याबाबत हे होणं शक्य नाही. आपण केस स्थगित करावी ही माझी प्रार्थना आहे. या वेडया मुलीला मी समजावितो.'

'काय उर्मिला बेटी, मिस्टर राजेश बरोबर म्हणाले ना ?' चंद्रचुडांनी विचारले.

'ती काय म्हणेल ?'

'मी उर्मिलाचा वकील आहे मिस्टर राजेश.'

'उमा, तुझा नकार आहे ?'

'तुमच्या इच्छेला येईल ते करा.'

'वकीलसाहेब आपण जाऊन केसचं पहा.

'मिस्टर राजेश, धन्यवाद ! आत्ताच जातो. तुम्हाला शाबासकी देतो. तुम्ही फार मोठी काळजी दूर केलीत.'

दहा मिनिटातच केस पुकारली गेली. उर्मिला आणि राजेश न्यायालयात आले होते. चंद्रचुडांनी केस स्थगित करण्याचा अर्ज केला.

'समझोत्याची आशा आहे काय ?' असे जज्जसाहेबांनी विचारले.

'कदाचित' चंद्रचूड म्हणाले.

'फार फार उत्तम गोष्ट.'

पंधरा दिवसांनी तारीख मिळाली. तिघेही न्यायलयांतून बाहेर पडले.

'मि. राजेश तुम्ही या पतिपत्नीचा समझौता करण्यात यशस्वी झालात तर मी तुम्हाला पार्टी देईन.' चंद्रचूड म्हणाले.

'पार्टी आपण तर द्यालच पण उर्मिलानीच प्रथम पार्टी द्यायला हवी. काय ग ?'

'ती तर फारच आनंदाची गोष्ट होईल.' चंद्रचूड त्यांना बेस्ट ऑफ लक म्हणून निघून गेले.

राजेश उर्मिलेला घेऊन जवळच्याच हॉटेलमध्ये गेला आणि हसत म्हणाला

'गीताचा तू तिरस्कार करतेस हे मला ठाऊक आहे. काही गोष्टी बोलायला माझे घर तुला पसंत नाही. म्हणून मी तुला येथे आणले आहे. सर्व गोष्टी मनमोकळेपणाने बोलायला मी तुला येथे घेऊन आलोय.'

'नाही भय्या, मी गीताचा तिरस्कार मुळीच करत नाही.'

'केव्हापासून ?'

'मला सर्व गोष्टी कळून चुकल्या आहेत.'

'काय म्हणालीस ?'

'तुम्ही लपविण्याचा खूप प्रयत्न केलात. त्या दिवशी रात्री तुम्ही मला सोडायला आलात तेव्हां मी गीतावहिनीबद्दल वाट्टेल ते बोलले. तुम्ही गप्पच बसलात. मी बोलल्याबद्दल माझ्यावर रागावलातदेखील नाही; आणि गीता कोण आहे हेही मला सांगितलं नाहीत.'

'गीता माझी पत्नी, बायको आहे. तिच्याबद्दल मी आणखीन काय सांगायचं ?'

'पण सगळं मला समजलं. लग्नापूर्वी तिचा प्रियकर कोण होता हे देखील समजलं !'

'कोण होता प्रियकर ?'

'तो महापुरुष आज माझा नवरा आहे.'

'खोटं आहे हे !'

'कुणीतरी सूडबुद्धीने तुझे मन कलुषित केलंय.'

'नाही भय्या. तुम्ही कितीही लपवलेत तरी मी माझ्या नवऱ्याला देव बनवू शकणार नाही. त्याच्या नीच कृत्यावर पडदा पडू शकत नाही.'

'उर्मिला नवऱ्याबद्दल असं बोलू नये.'

'जे सत्य आहे तेच बोलतेय ना ?'

'पण या खोटया गोष्टी तुला कुणी सांगितल्या ते सांग पाहू अगोदर !'

'गीतावहिनीनेच मला सर्व सांगितले आहे. तुम्हाला आता त्यावर पांघरूण घालण्याची जरुरी नाही.'

'ठीक आहे. गीताबद्दल तुझं मत बदलले आहे ना ? मग माझ्या घरीच तू चल. तेथे आरामात स्वस्थपणे बोलू. गीता पण तेथे भेटेल.'

'चला' म्हणत ती उठून उभी राहिली. चहाचे बिल देऊन दोघंजणं हॉटेलातून बाहेर पडत टॅक्सीत बसली. व राजेशच्या घराच्या दिशेने टॅक्सी धावू लागली.

* * *

नरेश जीवनात हरला होता. रात्रीची झोप, दिवसाचे स्वास्थ्य तो घालवून बसला होता. सर्व स्वप्न भंगून तो कोलमडला होता. गीतावर प्रेम केलं, तिचं आयुष्य बरबाद केलं. इतकेच नव्हे तर तिला वंचितही केलं. हे केलं ते ज्या गध्दे पंसविशीत, ज्या वयात अविचारालाही काही सीमा असते. हा होता पुरुष सर्व दोष माफ. पण गीता स्त्री होती. तिच्याजवळ तारुण्य होतं. खूप सौंदर्यवती नसली तरी दहाजणीत उठून दिसण्याइतकी सुरेख होती. विनयशील व गुणी होती. तिच्या तारुण्याशी तो मनोसोक्त खेळला आणि त्याने तिला सोडून दिले.

राजूभय्याच्या सहवासाने तो बराचसा निवळला होता. आणि सावरलाही होता. त्यानं प्रेमाचा नवा डाव खेळायला पुन्हा सुरुवात केली. उर्मिला श्रीमंत घरातली एकुलती एक मुलगी. देखणी व शिकलेली. तेही लग्न राजच्या मध्यस्थीने झाले. पण त्याला फक्त उर्मिलाच मिळाली. धनदौलत मिळाली नाही. गीताला सोडून दिलं, उर्मिला निघून गेली. ना प्रेयसी, ना पत्नी, ना धनदौलत. उर्मिला डायव्होर्स घेऊन कायमची फारकत घेत आहे नरेश या सर्वांचा घरी बसून विचार करीत होता. आज निकालाचा शेवटचा दिवस. त्यानं नोटिस दोनतीन वेळा वाचली होती आणि त्याच्या डोळ्यासमोर जीवनाचं भेसूर चित्रं नाचू लागलं. तो न्यायालयात गेला नव्हता. यानं तोंड लपवले म्हणून निर्णय एकतर्फीच लागणार होता. त्याच्या डोक्यात अनेक विचार थैमान घालीत होते.

उर्मिला देखणी; शिकलेली, श्रीमंताची मुलगी. काही दिवसांनी तिचं एखाद्या श्रीमंत मुलाशी लग्नही होईल. कारण तिला अद्याप मूल झालेलं नाही. त्यामुळे तिच्या लग्नाला कुठलीच अडचण येणार नाही. नियतीने नरेशला चांगलाच धडा शिकवला होता. करावं तसं भरावं या न्यायाने त्याला

चांगलाच फटका मिळाला होता गीताला विधात्यानं वाचवलं होतं ती एक आदर्श पत्नी-गृहिणी म्हणून तिने मानाचं स्थान पटकावले होते. पण गीताने उर्मिलाला सगळी हकिगत सांगून माझं जीवन उद्ध्वस्त करून टाकलं होतं. या नाटकाच्या शेवटचा सीन आज न्यायालयात चालू होता. आज अखेरचा पडदा पडणार होता.

या सगळ्या गोष्टी नरेशच्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. तो खोलीत एकटाच व्हिस्कीची बाटली उघडून बसला होता. गीता त्याच्या कृत्याचा जाब विचारते आहे, त्याला हिणवते आहे, म्हणते आहे– घेतलाच की नाही मी तुझ्या कृत्याचा बदला आणि खो खो हसत सुटली, असा त्याला भास झाला. त्याचं डोकं गरगर फिरू लागलं. पुन्हा नोटिस आठवली. कोर्टातली शेवटची तारीख, डायव्होर्स आणि गीताचा संसार, राजूभय्याचा आनंद, उर्मिला, उर्मिलाचे दुसरं थाटातलं लग्न, मनासारखा जावई मिळाल्यामुळे त्याला दिलेली आपल्या आवडीप्रमाणे अमाप धनदौलत. नवऱ्याच्या शेजारी गाडीत बसून आपल्याकडे उपहासाने पहात हसतेय, हे सारे त्याला असह्य होऊन ती आग विझविण्यासाठी त्याने व्हिस्कीची बाटलीच तोंडाला लावली. दोन्ही हातांनी डोकं दाबून धरलं. तोच सीन त्याला पुन्हा दिसू लागला. गीता कोर्टातील पिंजऱ्यात उभी आहे. राजूचा–गीताचा पाठिंबा. मी कोर्टात जाऊन केस थांबवावी तर छे· गीताने कोर्टात माझ्याविरुद्ध साक्ष दिली तर...कोणताही वकील गीताची कहाणी ऐकल्यावर मला न्याय देणार नाही.

गीता–गीता–गीता–दातओठ खात मुठी आवळून त्याने घड्याळात पाहिले. दुपारचे बारा वाजले होते. निकाल लागूनही गेला असेल. नरेशने ग्लास पुन्हा रिकामा केला कपाळाला आठ्या चढवीत त्याने काही विचार केला. पुन्हा एकदोन व्हिस्कीचे घोट घेऊन तो उभा राहू लागला पण पाय लटपटू लागले. डोळे तारवटले. चांडाळणीने माझं जीवन बरबाद केलं. तो हसू लागला व मनाशी म्हणाला–सगळं माझं लुटलं, हरामजादी एक नंबरची बदमाश साली. आपण ऐटीत बसलीय संसार मांडून–हलकट साली आणि आमच्या केसमध्ये साक्ष देतेय. माझ्या विरुद्ध–आणि त्या रागाच्या भरात आणि व्हिस्कीच्या नशेतच तो तसाच घराच्या बाहेर पडला.

उन्हाचे चटके बसत होते. त्यानं आतापर्यंत भर दुपारी इतकी व्हिस्की कधीच घेतली नव्हती. त्याला आवरणारं कोणीच नव्हतं. यावेळी कुठं गेला असता ही मनाची आग विझेल? कोर्टाच्या आवारात? उर्मिलाचं अभिनंदन करायला उर्मिलेच्या घरी? की गीताच्याकडे? त्यानं टॅक्सी थांबवली आणि ड्रायव्हरला म्हणाला, 'जल्दी करो' डोकं गरगरत होतं, रस्त्यातली प्रत्येक वस्तू मागे जात होती. त्याचबरोबर त्याच्या डोक्यातल्या विचारांनाही गती मिळत होती. राजेशचे घर येताच त्याने टॅक्सी थांबवण्यास सांगितली. हातात आलेली दहाची नोट ड्रायव्हरला देऊन तो पळाला, तो राजेशच्या घराच्या पायऱ्या चढून वरती आला. बेल वाजविण्यापूर्वी सिगरेट पेटवली आणि बेल दाबली. दरवाजा उघडला गेला.

'तुम्ही!' गीताने विचारले.

'हो; मी!'

'हे यावेळी घरात नाहीत.'

'काही हरकत नाही. त्याची मुळीच जरुरी नाही. तू तर आहेस.' त्याने आत येऊन दरवाजा बंद केला

गीताला दारूचा वास आला आणि ती दोन पावले मागे सरकली.

'दरवाजा का लावलात?' गीताने घाबरून विचारले.

'मला तुझ्याशी बोलायचे आहे.'

'पण ते यावेळी घरात नाहीत.'

'हे मी मघाशीच ऐकलं आहे. मी त्याच्याशी नाही–तुझ्याशी बोलू इच्छितो. आणि मला हेही माहीत आहे की दुपारी यावेळी तू एकटीच घरी असशील, म्हणूनच मी आता आलो.'

'काहीही काम असो. तुम्ही ते असताना या' गीता मागे सरकत म्हणाली.

'तुला माझी भीती वाटते होय ग? मला तू ओळखत नाहीस?' नरेश एकदम हसतच सुटला. तिच्याकडे निरखून पहात म्हणाला,

'ओहो, तू राजूभय्याच्या मुलाची लौकरच आई होणारसं दिसतंय. पण याच तुझ्या पोटात माझेही पोर एकदा वाढत होतं नाही का?' नरेशनी तिच्या पोटाकडे टक लावून पाहात खोः खोः हसत विचारले.

'मी सांगते–तुम्ही इथून जा.

'काय म्हणून ?'

'विवाहित स्त्रीला तिच्या पतीच्या अपरोक्ष भेटणं योग्य नव्हे.'

'तूं जे सांगितलंस ते योग्यच आहे. त्याबद्दल धन्यवाद. तू केव्हापासून पतिव्रता झालीस ? मला हे ठाऊकच नव्हतं !'

'मी तुम्हाला सांगते दरवाजा उघडा आणि तुम्ही येथून जा. नाहीतर मी आरडाओरडा करीन.' गीताने धमकीच्या सुरातच सांगितलं.

'मी जाण्यासाठी येथे आलो नाही. आणि तू दंगा ओरडा आरड करू शकत नाहीस. मी तुझ्याशी गप्पा मारण्यासाठी आलोय. लक्ष देऊन ऐक निष्कारण आरडाओरड करून लोकांना गोळा केलंस तर मी प्रत्येक व्यक्तीला सांगेन की तू कोणत्या चालीची आहेस आणि तुझे–माझे काय संबंध होते !' नरेशनी तिला धमकी दिली व पकडण्यास तो धावला.

'मी सांगते तुम्ही येथून जा. तुम्ही शुद्धीवर नाही आहात. खूप दारू पिऊन आला आहात.'

'नाही. कदापिही मी जाणार नाही. माझं सुख स्वास्थ्य आणि शांती तू लुटली आहेस. तुला मी आरामात राहूं देणार नाही. माझं घर, माझं जीवन उद्ध्वस्त करून चांडाळणी. हलकटे तू आपलं घर केलंस. यापुढे तू आरामात चैनीत राहू शकणारच नाहीस.' आणि दात ओठ खात तो तिच्या अंगावर धावला.

'तुमचं घर उद्ध्वस्त मी केलं ?'

'करून सवरून नामानिराळी होतेस ? उर्मिलाला कुणी सांगितलं माझ्यापासून तुला दिवस गेले होते ?'

'ही गोष्ट खोटी आहे काय ?'

'हो ! हो !' दातओठ खात तो म्हणाला.

'तुला अजून आठवतेय तर–माझ्या मिठीत मी तुला–तुझ्या या फुटबॉलला कुस्करल्याची आठवण आहे तर–आणि माझ्या मुलाची आई होणार होतीस हेही आठवतंय तर–हरामजादी, अवदसा, नीच, कुलटा, बदफैली–' बेफामपणे मग नरेशनी बडबड चालू केली. आणि स्वतःचे कपडे भराभर

त्याने काढले. फक्त अंडरवेअर तेवढी होती. गीताचे कपडे काढण्यासाठी तो तिच्या अंगाशी झोंबू लागला.

'मी अखेरचं सांगतेय तुम्ही चालते व्हा, झाल्या गोष्टी विसरून जा. हे शरीर आता एका महान पुरुषाची संपत्ती आहे. तुमचा अपवित्र स्पर्श त्याला होऊ शकणार नाही.' रागाने बेभान होऊन गीता ओरडली.

'अरे वा : रे पवित्रवाली! तुझ्या शरीराला माझे अपवित्र हात लागता कामा नयेत! केवढा सती–सावित्रीचा आव आणतेस? कित्येक रात्री ज्या स्त्रीचा भोग मी भोगला. हे शरीर माझ्यासाठीच आहे. जेव्हा पाहिजे तेव्हा मी भोग घेऊ शकतो. मुकाट्याने तयार हो नाहीतर... ...'

'अजून वेळ गेलेली नाही– सावध हो, चांडळा शुद्धीवर ये आणि निमूट-पणे चालू लाग. अरे या शरीराचा भोगच काय पण तुझा स्पर्शसुद्धा होऊ शकणार नाही.'

असे म्हणत ती मागच्या गॅलरीत आली. ऊन रणरणत होतं. पुरुष मंडळी कामावर गेली होती. रात्र पाळीचे लोक दारं लावून खोल्यांतून झोपले होते. बायकाही विश्रांती घेत होत्या. आरडाओरड करावी तर आपलीच अब्रू वेशीवर टांगणार होती. क्षणभर काय करावे हेच तिला सुचेना.

नरेश बेभान झाला होता. त्याने तिचा पदर पकडला. पदराला हिसका मारून गीताने पदर सोडवून घेतला.

'हे साहस तुझ्या अंगात?' नरेश ओरडला आणि त्याने तिला परत पकडले.

'वाचवा–वाचवा' गीता किंचाळू लागली.

'कोण येतय तुला वाचवायला पहातोच मी...' आणि त्याने इतक्या जोरात तिच्या थोबाडीत मारल्या–तिला वाटले आपण बेशुद्ध होणार आणि हा नराधम आपली राक्षसी भूक भागवून घेणार. तिने त्याच्या हाताला कडकडून चावा घेतला त्यामुळे त्याच्या हाताची मिठी सैल पडली.

'तुला या क्षणी मी सोडू शकणार नाही. माझं पेटलेलं मन तृप्त केल्या-शिवाय मी राहाणार नाही.' असं म्हणून त्याने पुन्हा तिच्याकडे झेप घेतली आणि पदर पकडला.

गीता व्हरांड्यात धावली आणि म्हणाली,

'दूर हो, नाहीतर मी जीव देईन.

'अग जा ही धमकी तूं कोणाला देतेस ?' असं म्हणून त्याने तिचा पदर जोरात खेचला. आणि त्याच्या डोळयाचे पाते लवते न लवते तोच नरेशच्या हातात फक्त साडीच राहिली. गीताने नराधमाच्या हातून सुटका करून घेण्यासाठी पाचव्या मजल्यावरून कधीच उडी घेतली होती आणि तिचे पंचप्राण एका श्वासाबरोबर विलिन झाले होते.

तिचा छिन्नविछिन्न अर्धनग्न देह रस्त्यावर पडला होता. नरेश पळून जाऊ लागला. परंतु लोकांनी त्याला खूप मारला व पकडून ठेवला होता.

* * *

कोर्टातून बाहेर पडून टॅक्सी पकडून गीताला भेटण्यासाठी उर्मिला व राजेश घरापर्यंत आले. घराजवळ येताच गर्दी पाहून टॅक्सीचे बिल देऊन पुढे आले.

'भय्या, ही इतकी गर्दी कसली ?' लोक का जमा झालेत ?'

'थांब मी पुढेच जाऊन पहातो.' त्याने अेका व्यक्तीला विचारले, 'ही गर्दी कसली हो ?'

'एका स्त्रीने पाचव्या मजल्यावरून उडी घेतली.'

'कोठून ?'

'या इमारतीच्या वरच्या फुलाच्या कुंडीच्या खोली जवळून !' एका माणसाने बोटाने दाखविले. तो व्हरांडा राजच्या खोलीचा होता. तो माणूस म्हणाला,

'बिचारी गर्भवती होती !'–

'गर्भवती–' राजेशच्या पायाखालची जमीन सरकू लागली. त्याने फक्त 'उडी का घेतली '

'कुणी चोर घरात शिरला होता. तिची अब्रू लुटू लागला.' त्याने फक्त विचारले, 'कुठे आहे तो चोर.'

'तो पळून जात असतानाच लोकांनी त्याला पकडलं, 'खूप मारलं.' गर्दी बाजूला करून राजेश पुढे सरकला. तोच त्याच्या दृष्टीला गीताचे शव

अर्धनग्न अवस्थेत पडलेले दिसले. उर्मिलाने धावत येऊन गीताच्या अंगावर चादर घातली.

सारी चाळ शोकाकुल झाली होती, पोलिसांनी ज्याला पकडले होते, तिकडे राज आणि उर्मिलाचे एकदम लक्ष गेले. तो चोर नसून उघडाबंब अंडर चड्डीमध्ये असलेला माणूस नरेश होता, त्याला पहाताच उर्मिलाने कपाळावर हात मारून घेतला, आणि राजेशच्या गळघात मिठी मारून हुंबरडा फोडला.

'भय्या'

राजेशने उर्मिलाला सावरले, स्वत:शीच म्हणाला 'अजब न्याय !' मी माझ्या अंगणात हे लहानसं रोप लावलं, त्याला चांगली फळंफुलं येतील, मित्रप्रेमाला मी जागलो, त्याच्या दुष्कृत्याचा चुकूनही उल्लेख न करता त्यावर झाकणच घालत गेलो. त्याच्यावर विश्वास टाकला, माझं घर त्याच्यासाठी उघड ठेवलं, आणि ह्या अखेरीस विषवृक्षच निघाला ना ?' 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ठरावा, माझाच नाश यात करावा केवढा दैव दुर्विलास ! पोलिसव्हॅन गेली त्या दिशेला शून्य नजरेन पहात तो कितीतरी वेळ उभा होता. असं व्हायला नको होतं ! तळपता सूर्य नारायण ढगाच्या आड कधीच गेला होता.

●●●